# हिमालयाच्या कुशींत


स्वामी अखंडानंद

१८५८
म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. नं. २५३

REFBK-0010784
REFBK-0010784

श्रीरामकृष्ण आश्रम,
नागपूर

# हिमालयाच्या कुशींत



स्वामी अखंडानंद

# हिमालयाच्या कुशींत

स्वामी अखंडानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 24382 दि: 25-4-1971
क्रमांक 9105 नों: दि: 23/3/80
243

REFBK-0010784
REFBK-0010784

श्रीरामकृष्ण आश्रम,
नागपूर

प्रकाशक—
स्वामी भास्करेश्वरानंद,
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम,
धंतोली, नागपूर–१

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प २० वें
( श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूरद्वारा सर्वाधिकार सुरक्षित )

किमत २.५०

मुद्रक—
मा. र. साखरे,
प्रकाश प्रिंटिंग प्रेस,
सुभाषरोड, नागपूर–२.

# निवेदन

पूजनीय स्वामी अखंडानंदजी हे भगवान् श्रीरामकृष्णदेवांचे अंतरंग संन्यासी शिष्य असून, पूज्यपाद स्वामी विवेकानंदांचे विशेष आवडते गुरुबंधु होते. 'रामकृष्ण संघ' आज जीवनाच्या नाना क्षेत्रांत आणि विशेषत: रोग-दुष्काळ-पूर इत्यादींनी पीडिलेल्यांची जी सेवा करीत आहे, तिची मुहूर्तमेढ पूजनीय स्वामी अखंडानंदजींनी असीम स्वार्थत्यागपूर्वक मुर्शिदाबाद विभागांत दुष्काळपीडितांची सेवा करण्यास सुरुवात करूनच रोविली आहे. त्यांची गभीर आध्यात्मिकता, सुविशाल हृदय आणि बालकासारखा सरल, निरागस स्वभाव यांमुळे ते सर्वांनाच हवेहवेसे वाटत. वयाच्या तेरा-चौदाव्या वर्षीच ते भगवान श्रीरामकृष्णांच्या चरणांजवळ उपस्थित झाले होते. स्वामी अखंडानंदजी 'रामकृष्ण-संघा'चे तिसरे अध्यक्ष होते.

स्वामी अखंडानंदजींनी जनसेवेचें व्रत घेण्यापूर्वी कित्येक वर्षे जन-कोलाहलाचा त्याग करून हिमालयांत आणि तिबेटच्या परिसरांत खडतर तपश्चर्येत घालविलीं होतीं. इ. स. १८८७ सालीं ते प्रथम तिबेटला गेले. त्या वेळीं त्यांचें वय सुमारें सतरा असेल.

स्वामीजींच्या तोंडून त्यांची भ्रमणकहाणी जे ऐकत ते मुग्ध होऊन जात. सर्वांच्या आग्रहाखातर त्यांनी बंगालींत आपल्या भ्रमणस्मृति लिहिल्या होत्या.

ह्या पावन स्मृतींच्या, श्री. नरेंद्रनाथ पाटील, एम्. ए., यांनी केलेल्या अनुवादाचा कांही भाग, नागपूर येथील श्रीरामकृष्ण आश्रमातर्फे निघणाऱ्या "जीवन-विकास" नामक मराठी मासिकाच्या वाचकांना वानगी म्हणून सादर करण्यांत आला होता. अनेकांनी तो साकल्याने पुस्तकरूपांत प्रसिद्ध करण्याची आग्रहाची सूचना केली. तदनुसार तो 'हिमालयाच्या कुशींत' या नांवाने पुस्तकरूपाने अवशिष्ट भागासहित पूर्ण स्वरूपांत वाचकांच्या हातीं देतांना आनंद वाटत आहे.

नागपूर,

ता. १५-९-१९५९

—प्रकाशक



स्वामी अखंडानंद

अनु. २५३९२
भूप्रवास
२३/३/५०
क्रमांक २५३

# हिमालयाच्या कुशींत

गतकाळांतील कांही पुसट अशा आठवणी वगळल्या तर आतापर्यंत केलेल्या प्रवासाचें इतिवृत्त लिहिण्यास उपयोगी पडतील अशीं इतर कोणतींहि साधनें मजजवळ नाहीत. त्या अंधुक अशा आठवणींच्या अनुरोधानेच हा सर्व वृत्तान्त लिहायला पाहिजे. ह्या सर्व प्रवासाचें आपण पुढे एक पुस्तक प्रकाशित करूं, असें मनांत ठरवून मी कांही कुठे फिरलों नाहीं, वा भ्रमन्तीचे कोणतेहि प्रसंग कुठे लिहून ठेवले नाहीत. इतकेंच नाही, तर उलट ज्या ज्या गोष्टी पाहण्यांत येत त्या सर्व विसरून जाण्याचा माझा प्रयत्न असे. कांहीजणांनी खूपच आग्रह केला म्हणून आता मीं हें पुस्तक लिहायचें हातीं घेतलें. ह्याच्या वाचनाने देवभूमि हिमालयांतील पुण्यक्षेत्रांविषयी कुणाला असलेल्या माहितींत आणखी भर पडली व त्यांच्या जिज्ञासेचें आंशिक का होईना पण निवारण झालें तर, माझी ही सेवा रुजू झाली असें मी समजेना

भगवान् श्रीरामकृष्णदेवांनी आपली मानवलीला संपवून सातआठ महिने झाले असतील. महाराणी व्हिक्टोरिया हिच्य सुवर्णजयंतीचें तें वर्ष होतें. बहुतेक इ. स. १८८७ साल असावें' फेब्रुवारीच्या अखेरीस, आमच्या त्या वेळच्या 'वराहनगर' मठांतून मीं यात्रेसाठी प्रस्थान केलें. गया, काशी, अयोध्या व नैमिषारण्य हीं पवित्र स्थळें पाहत पाहत ( ह्या तीर्थस्थानांव्यतिरिक्त मार्गांत मी फक्त लखनौ व सीतापूर येथे उतरलों होतों. ) हरिद्वारला येऊन पोहोचलों.

१०७

### हृषीकेशच्या परिसरांत

कलकत्ता सोडल्यानंतर हरिद्वारला येऊन पोहोचेपर्यंत मला दोन तीन महिन्यांपेक्षा जास्त अवधि लागला नाही. वैशाखांतील संक्रांतीच्या अगोदरच मी हरिद्वारला येऊन ठेपलों होतों असें आठवतें. तेथून तीनचार दिवसांनी हृषीकेशला गेलों. किती दिवसांपासून मनांत बाळगलेली इच्छा आज सफल झाली होती. आणि त्यामुळे अत्यंत प्रसन्न वाटत होतें. हिमालयाच्या पायथ्याशीं हृषीकेशसारखें रमणीय व पवित्र असें दुसरें तपोवन नाही. बद्रिकाश्रमयात्रेचें हेंच मुख्य द्वार आहे. कार्तिक महिन्यापासून ज्येष्ठांतील दशहऱ्यापर्यंत हृषीकेश निरनिराळ्या अनेक संप्रदायांतील साधूंच्या सम्मीलनाने फुलून जात असतें. पुष्कळ श्रीमत लोक दरवर्षी माघ महिन्यांत हृषीकेशला येऊन, भक्तिभावाने सर्व साधूंना मिष्टान्नांचें भोजन देऊन पुण्यार्जन करतात.

हृषीकेशच्या जवळच 'तपोवन' नांवाचें एक गाव आहे. या गावाच्या परिसरांतील कांही विशिष्ट शेतांत, 'वासुमती' नांवाचा तांदूळ पिकतो. त्या तांदळाचा दाणा दिसायला खूप बारीक, पण शिजल्यावर चांगलाच फुगतो. शिजलेला भात पांढरा शुभ्र होतो, आणि त्याचा इतका सुगंध सुटतो की ज़ेवल्यानंतरहि सारा दिवसभर तो सुवास जाणवतो. तेथील लोक म्हणतात की कुणा एका ऋषीच्या वरदानाने तपोवनांतील त्या विशिष्ट शेतांमधेच हा अमृततुल्य तांदूळ उगवतो. हिमालयांतील सर्वच ठिकाणीं ह्या सुगंधी वासुमती तांदुळाचें खूप माहात्म्य आहे. केदारनाथ व बद्रीनारायणाच्या वाटेवर रुपयास चार शेर या भावाने हा तांदूळ विकत मिळतो. गेल्या सोळा सतरा वर्षांत कांही फरक झाला असेल तर सांगतां येत नाही. तें कसेंहि असो,

उत्तराखंडांतील तांदुळाची दुसरी कोणतीहि जात सुगंधाच्या बाबतींत वासुमतीची बरोबरी करूं शकत नाही. हृषीकेश येथील भरतमंदिर हें सर्वांत मुख्य मंदिर होय. टिहरीच्या राजानें तपोवन हें गाव भरतमंदिरांतील नित्यनैमित्तिक पूजेसाठी दान दिलें आहे. मंदिराच्या महंताकडून ऐकलें की त्यांना दरवर्षी पंजाबांतील कांही राजा-महाराजांसाठी थोडाफार वासुमती तांदूळ पाठवावा लागतो.

नगाधिराजाच्या चिरंतन हिमाच्छादित अशा उत्तुंग शिखरांतून प्रस्रवित झालेला पुण्यतोया भागीरथीचा वेगवान प्रवाह प्रचंड प्रस्तरांना भेदून आपल्या गंभीर गर्जनेने आजूबाजूचीं अरण्यें सतत निनादित करीत, ह्याच मार्गाने असंख्य भक्तांच्या उद्धाराकरिता धांव घेत सपाट भूभागाकडे वळला आहे. हृषी-केशला पोहोचतांच उत्तराखंडाचें माहात्म्य माझ्या देहांतील कणाकणाला जाणवलें. विमल स्वर्गीय सुखाने हृदय जणु काठो-काठ भरून आलें. मनांत विचार आला, उत्तराखंडांत पाऊल टाकतांच जर इतका आनंद, तर पुढे आणखी किती असेल ? मुमुक्षु साधकाच्या बाबतींत हृषीकेश हा एक स्वर्गच आहे. हृषीकेश-माहात्म्य ऐकून सिद्धपुरुष देखील आल्हादित होतात. ह्या असल्या पावन हृषीकेशक्षेत्रीं बैराग्यांच्या पर्णकुटींत मी कांही दिवस राहिलों. इथेच कांही त्यागी पंजाबी महापुरुषांबरोबर माझा घनिष्ठ संबंध जडला. त्यांच्या सरळ व दिलदार स्वभावा-मुळे हृषीकेश येथील माझें वास्तव्य खूपच आल्हादकारक झालें. केवळ आत्मध्यान, आत्मचर्चा, उपनिषदादि शास्त्रांचें वाचन ह्या व्यतिरिक्त इतर कोणत्याहि गोष्टी तेथील देवदुर्लभ अशा पवित्र वातावरणांत आमच्या तोंडून निघत नसत. माझ्या जीवनांतील

हृषीकेशची ही पवित्र आठवण अवर्णनीय तर आहेच पण माझ्या दृष्टीने अविस्मरणीय देखील आहे. हृषीकेशयेथून डेहराडून-मसूरीमार्गे, यम्नोत्री, गंगोत्री व केदार-बद्रीनारायणयात्रेला जाण्याचा संकल्प केला. एक सढळ हाताचा पंजाबी साधु, बद्रीनारायणाची यात्रा मीं त्याच्याबरोबर करावी म्हणून खूप आग्रह करूं लागला आणि जवळ पैसा नसला तर उत्तराखंडांतील या पहाडी प्रदेशांत यात्रेचा अतोनात त्रास होतो वगैरे सांगून थोडें भेवाडण्याचा प्रयत्नहि करूं लागला. त्याच्याजवळ रगड पैसा होता आणि सोबत एक दशनामी नागा चेलाहि होता. त्या साधूनें त्या वर्षीं माघ महिन्यापासून दररोज कितीतरी वेगवेगळीं पक्वान्नें करून, हजार-बाराशे साधूंच्या पंक्ति सतत उठविल्या होत्या. असो. त्याच्या कोणत्याच आमिषाला न भुलतां मीं हृषीकेश सोडलें व एकाकी डेहराडूनची वाट चालूं लागलों.

हिमालयांतील यात्रेमधे जीं जीं ठिकाणें पाहून मी अगदी मोहित झालों होतों, त्या त्या शांत नि पुण्यमय स्थानांचें आता नुसतें स्मरण केलें तरी चित्तवृत्ति स्थिरावतात, व हृदयामध्ये गोड पवित्र स्पंदन सुरू होतें. बद्रीकाश्रमयात्रेची स्मृति असल्याच प्रकारची आहे, आणि म्हणून तीविषयी येथे थोडेसें लिहिलें पाहिजे.

### बदलतें स्थानमाहात्म्य

गेल्या कांही वर्षांपासून बंगालांतीलहि बरेच लोक दरवर्षी बद्रीकाश्रमाची यात्रा करून येतात. त्याअगोदर बंगालमधील यात्रेकरू फार थोडे नि पंजाबमधील खूप जास्त असत. बंगालमधील सुशिक्षित संन्यासी परिव्राजकांनी व कांही तरुण प्रवासी मंडळींनी लिहिलेलीं प्रवास-वर्णनेंहि आजकाल निरनिराळ्या

मासिकांतून पाहायला मिळतात. तीं सर्व वर्णनें वाचून हिमालयांतील मुख्य मुख्य क्षेत्रांविषयी आजकाल वरीच माहिती पुष्कळ लोकांना झालेली आहे. परंतु एकाच उत्तराखंडाबद्दल निरनिराळ्या काळच्या साधु-महात्म्यांच्या तोंडून वेगवेगळी माहिती ऐकायला मिळते. कालमानेंकरून एकाच स्थानामध्ये कितीतरी फेरबदल होतो. शिवाय पाहणाराच्या वयोमानानुरूप व त्याच्या दृष्टिकोणानुसार एकाच वेळीं पाहिलेलें एकच स्थान प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाशीं निरनिराळ्या प्रकाराने संलग्न होऊन भिन्न भिन्न रीतीने वर्णिलें जातें. आणि म्हणूनच प्रत्येक यात्रेकरूकडून त्याच उत्तराखंडाबद्दल कांहीतरी नवीन ऐकायला मिळेल अशी आपल्याला आशा वाटत असते. बऱ्याच जुन्या काळीं ज्यांनी 'मनभंग व चित्भंग' या मार्गाने बद्रीकाश्रमाची यात्रा केली असेल, त्यांच्या यात्रेचें वर्णन आजकालच्या केदार-बद्रीनारायणाची यात्रा करणाऱ्यांच्या हकीगतीपेक्षा अगदी वेगळें राहणार. त्या जुन्या काळीं यात्रेकरूंना किती दुर्गम व उंच उंच पाहाडावरील निसरड्या वाटांनी जावें लागत होतें याची कल्पना आजच्या यात्रेकरूंना मुळीच यायची नाही. त्या मार्गाची बिकटता 'मनभंग व चित्भंग' या नांवावरूनच कळण्यासारखी आहे. इतक्या जुन्या काळची गोष्ट कशाला, हरिद्वारला रेल्वे होण्यापूर्वी, जे तेथे पाहाडी मार्गाने गेले असतील, त्यांना आता रेल्वेने गेल्यास ती पूर्वीची शोभा आणि तें सृष्टिसौंदर्य आढळणार नाही. बद्रीकेदार व गंगोत्रीच्या वाटेवर हल्ली पूर्वीसारखे सतत हलणारे व वाटसरूंना भयभीत करणारे दोराचे पाहाडी पूल नसून, जिकडे तिकडे पक्क्या सडका आणि मजबूत पूल बांधण्यांत आले आहेत. त्यामुळे आता बद्रीकाश्रम-यात्रा पूर्वीपेक्षा कितीतरी सुलभ

झाली आहे. परिणामतः आता दरवर्षी, वेगवेगळ्या चालीरीतींच्या व भिन्न भिन्न स्वभावांच्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी तेथे लोटतात. आणि ह्या सर्व गर्दीमुळे पूर्वीचें स्थानमाहात्म्य आता पालटलें आहे. पूर्वी उत्तराखंडांतील पाहाडी लोकांमध्ये कुणी चोर म्हणून आढळत नसे. आता, यात्रेकरूंचा जेथे संपर्क येत नाही अशा अगदी आडरानांतील कांही खेड्यांतच अशी स्थिति आढळते. हे पाहाडी लोक जसजसे इकडील लोकांच्या सहवासांत येतात तसतसा त्यांच्या चालचलणुकींत व स्वभावांत फरक पडतो. मीं देखील पूर्वी हृषीकेश व उत्तराखंडांतील इतर कांही ठिकाणच्या लोकांमध्ये जो एक स्वभावाचा गोडवा पहिला होता, त्यांत आता बराच बदल झाला आहे असें ऐकतों. असो.

जे यात्रेकरू केवळ देवदर्शनाच्या निमित्ताने, पक्क्या सडकेने सरळ जाऊन, बद्रीनारायणाला नमस्कार करून आल्या-वाटेने आपल्या घराकडे परततात, त्यांना हिमालयाच्या परि-सरांतील कितीतरी गोष्टी अज्ञातच राहतात. त्यांना हिमालयाच्या गाभाऱ्यांतील अत्यंत रमणीय, परम पवित्र, प्रशांत व एकान्त तपोवनाविषयी अंधुकशीदेखील कल्पना येत नाही. जे यात्रेनंतर बद्रीकाश्रमीं कांही काल निवास करतात, आणि असल्या स्थानांचा शोध घेतात त्यांनाच कधीमधी ह्या पुण्यस्थळांचें दर्शन घडतें.

### प्रभुचरणीं संपूर्ण निर्भयता

हृषीकेशहून डेहराडूनला निघतांना एका साधूने, उत्तरा-खंडांत प्रवेश करायच्या अगोदर एक जोडा विकत घेण्याचा सल्ला दिला होता. हृषीकेशहून दोन दिवसांतच मी डेहराडूनला पोहोचलों. त्या साधूने सांगितल्याप्रमाणे वाटेंतील एका गावांत जोडा विकत घेतला. डेहराडूनला दोन दिवस विसावा घेऊन

तेथून अंदाजें सहा कोस दूर असलेल्या राजपूर गावीं जाऊन थडकलों. मसूरीपर्वताच्या पांयथ्याशींच हें गाव आहे. राजपूरला येईपर्यंत माझ्याजवळ फक्त कांही आणेल्या शिल्लक होत्या. येथे त्या सर्व खर्च करून टाकल्या आणि दोन्ही हात झटकून, कांहीच शिधा-सामुग्री वा शिदोरी जवळ न बाळगतां उत्तराखंडाची यात्रा पूर्ण करायची असा निश्चय केला. कोण्या साधूबरोबर वा गृहस्थ यात्रेकरूबरोबर प्रवास करायचा नाही, आणि भुकेची वेळ सोडून भिक्षा मागायची नाही वा पुढल्या जेवणासाठी म्हणून कांही संचय करायचा नाही असा मनोमन संकल्प केला. एका भगवंतालाच तेवढें शरण जायचें आणि त्याच्यावर सर्व भार टाकून संपूर्ण उत्तराखंड फिरून यायचें असें मनांत पक्कें करून राजपूर सोडलें व मसूरीची चढण चढूं लागलों. मसूरीला आल्यावर पाहतों तों जिकडे तिकडे गोऱ्या साहेबांचेच बंगले. लन्टौर नामक बाजार-ओळींत मात्र एक शिवमंदिर होतें, आणि त्याच्या आवारांत साधुसंन्यासी मोठ्या कष्टाने एखाददुसऱ्या रात्रीपुरता आसरा घेत. दक्षिणेंतील एक लिंगायत जंगम साधु ह्या देवळाच कारभारी होता. या ठिकाणीं एकसुद्धा रात्र काढणें मला कठीण गेलें होतें. पण दुसरी जागा तरी होती कुठे ? मंदिरापुढील बाजारांत उभे राहून जिकडे नजर फेकावी तिकडे गोरासाहेब. असो. लन्टौरच्या मंदिरांत पाय ठेवतांच त्या जंगम साधूने मोठ्या अगत्याने मला जागा दिली. त्या वेळीं मजजवळ कपडे म्हणाल तर घोंगडीची कफनी व एक लोकरीची ओढणी इतकेच होते. उत्तराखंडाच्या यात्रेसाठी आवश्यक असे कपडेलत्ते मजजवळ नाहीत, व जवळ पैसाहि कांही नाही हें पाहून त्या साधूने मसूरींतील एका धनाढ्य व्यापाऱ्याकडे मला नेण्याचा व एक

घोंगडी व रुपया मिळवून देण्याचा, त्याचा विचार सांगितला. मसूरीमार्गे जे सर्व साधुसंन्यासी उत्तराखंडाच्या यात्रेला जात त्या सर्वांना हा व्यापारी एक रुपया व घोंगडी दान देत असे. मीहि ह्या दानाचा स्वीकार करावा म्हणून जंगम साधु पुन्हा पुन्हा आग्रह करूं लागला. म्हणाला की "मसूरीपासून टिहरीपर्यंत जवळजवळ तीस मैलांची मजल आहे. रस्त्यांत तीनचार दुकानें आहेत, गाव नाही की कांही नाही. आणि हे दुकानवाले कुणाला मुळीच भिक्षा देत नाहीत. म्हणून वाटेंत खाण्यापिण्याचे खूप हाल होतील." उत्तराखंडाच्या यात्रेंत पैशाला शिवायचें नाही हा माझा निश्चय ऐकून तो खूपच हळहळला आणि मला वाटेंत कांही त्रास होऊं नये अशी आंतरिक सदिच्छा त्याने व्यक्त केली. ह्या जंगम साधूला माझ्याबद्दल इतकी आपुलकी वाटण्याचें कारण बहुधा माझें लहान वय असावें. मी त्याच्याजवळून या डोंगराळ मुलखांत चढाउतरायला उपयोगी पडेल अशी एक मोठी काठी तेवढी घेतली.

### नगाधिराज हिमालयाचें प्रथम दर्शन !

असो तर, भावी कोणत्याहि अडचणीच्या कल्पनेने न खचतां, उलट आता आपल्या इष्ट स्थानीं पोहोचायला वेळ नाही या विचाराने मीं मसूरी सोडली आणि मोठ्या उत्साहानें टिहरीचा मार्ग धरला. दोन तीन कोस गेलों असेन, एक दुकान लागलें. दुकानदार आपणहून दुकानांतून उठून आला आणि मोठ्या आतिथ्यपूर्वक मला आंत घेऊन गेला. आग्रह कर-करून त्याने फराळ करविला. लवकरच पुनश्च मी आपल्या वाटेला लागलों. आणखी कांही कोस पुढे गेल्यावर उत्तरेकडे नजर टाकली आणि अख्या पृथ्वीला आपल्या विस्ताराने मापणाऱ्या नगराजाचें

हिमधवल रूप दृष्टीसमोर साकारलेलें दिसलें ! निसर्गाचें तें अपरूप असामान्य सौंदर्य पाहून माझे पाय आपोआप स्थिरावले व मी होतों तिथेच खाली बसलों. अपार हिमराशींनी सजलेल्या त्या पर्वतश्रेणींकडे डोळे एकटक पाहूं लागले. सारें शरीर पुलकित झालें. उत्साह ओसंडूं लागला. मनांत आलें, भगवान श्रीरामकृष्ण ज्याचें दर्शन घ्यायला प्रत्येकाला सांगत असत तोच ना हा पुण्यदर्शन हिमालय? हेंच का तें "गिरिराजशृंगीं महादेवासंगें प्रकृति पार्वती सतीचें मीलन?" हेंच कां तें जगन्माता उमेचें माहेर? होय, हेंच. हेंच माझें चिरवांच्छित गन्तव्य स्थान हिमालय ! अनेक योजनें विस्तृत नि विशाल अशा हिमालयाच्या प्रथम दर्शनाने माझ्या मनांत असा कल्लोळ उठेल असें मला वाटलें नव्हतें. मला खरोखरच वाटूं लागलें की मी मर्त्यलोक सोडून स्वर्गाच्या राज्यांत येऊन ठेपलों आहें. त्या अनंत हिमप्रदेशांत शिरण्यासाठी माझें मन तडफडूं लागलें. निस्तब्ध, गंभीर व घनदाट अरण्याने वेष्टिलेली ती हिमाच्छादित पर्वतश्रेणी पाहिली आणि भगवंताच्या अपार महिम्याने अभिभूत होऊन गेलों. चित्त आनंदाने विव्हल होऊन गेलें. यच्चावत् सौंदर्याचें विभवशाली, विचित्र आगर अशा त्या गिरिराजाच्या चरणीं पुन:पुन: नमस्कार करूं लागलों. हिमालय-दर्शनाच्या आनंदोर्मींत सर्व कांही विसरून जाऊन, आठदहा कोसांची मजल अशीच पार पाडली. कळलेंहि नाही. थकवा मुळीच वाटला नाही. मसूरी सोडल्यापासून डोंगराळ मुलखांतलें एकदोघेच वाटसरू वाटेंत भेटले. रस्त्याच्या दुतर्फा फुललेल्या लालभडक फुलांचे गुच्छचे गुच्छ तोडून ते त्यांतील मकरंद चोखत चोखत चालले होते. आणि मकरंद संपला की फुलांच्या गुच्छाचाहि ते चट्टामट्टा करून टाकत. पुढे

विचारपूस केली असतां कळलें की पाहाडी लोक या फुलांना, 'बोरास' म्हणतात. हिमालयांतील त्यांतल्या त्यांत उंच प्रदेशांत ह्या जातीचीं बरींच झाडें आहेत. झाड चांगलें मोठें असतें आणि त्याच्या बुंध्यावर व लहानमोठ्या फांद्यांवर शेवाळासारखी मऊ मखमल पसरलेली असते. एका एका गुच्छांत अनेक फुलें असतात आणि त्यांचा रंग जास्वंदीसारखा गर्द लाल असतो. मध्यभागीं मकरंद भरलेला असतो. पाहाडी लोक मीठ-मिरच्यांबरोबर ठेचून या फुलांची छान स्वादिष्ट चटणी करतात. ती भाकरी-बरोबर खायला खूप चांगली लागते. मींहि बोरास फुलांच्या चटणीबरोबर पहिल्यांदा इथेंच भाकरी खाल्ली. हिमालय-भ्रम-णाच्या पहिल्याच दिवशीं मिळालेला हा बोरास फुलांचा उपहार चाखून हरखून जाऊन मनांत म्हटलें, ह्या राज्यांतील सर्वच अद्‌भुत !

### अन्नपूर्णेचा प्रसाद

मसूरी सोडल्यापासून दहा कोसांच्या वर मजल झाली होती. समोरील एका विशाल पाहाडावर एक दुकान पाहिलें. तेथें पोहोचल्यावर दिसलें की एक प्रौढ पाहाडी बाई दुकानाच्या जवळच बसली आहे. थोडेसें पुढे जाऊन मींहि जवळच्याच एका झाडाखाली हुश्श म्हणत टेकलों. डोंगरांतला प्रवास व हिमा-लयाचा शीतल वायु यांमुळे माझा जठराग्नि झळाळून पेटला होता. मला पाहून ती बाई जवळ आली नि मी कुठून आलों, कुठे जाणार वगैरे चौकशी करूं लागली. मीं अजून कांही खाल्लें नाही हें कळल्यावर, मला बसायला सांगून ती तशीच दुकानांत गेली आणि थोड्याच वेळांत गरम गरम भाकरी नि मीठमिरच्या टाकलेली बोरासफुलांची चटणी घेऊन आली. तिची ही अतिथि-

सत्काराची तत्परता पाहून मी चकित झालों. मनांत आलें, जंगम साधु म्हणत होता की या मार्गांतील प्रवासांत कोणी कुणाचा आदरसत्कार करीत नाही. मग हें काय ? मी भाकरी खायला बसलों आणि ती बाई एकीकडे मला आईवडील आहेत की नाही, मीं इतक्या लहान वयांत संन्यास कां घेतला इत्यादि प्रश्न विचारत होती. मीहि तिच्या प्रश्नांचीं तिच्या मनासारखीं उत्तरें देत होतों. इतक्यांत तिने डोक्यावर मोळी घेऊन येत असलेल्या आपल्या नवऱ्याला दुरून पाहिलें. त्याला पाहतांच ती अतिशय गांगरली आणि मला म्हणूं लागली, "हें पाहा, माझा नवरा खूप निर्दय आणि कमालीचा चिक्कू आहे. कोण्या साधुसंन्याशाला वा भुकेल्या वाटसरूला तो कधी एक मूठभरदेखील भिक्षा देत नाही. तो दुकानावर असला म्हणजे इच्छा असूनहि मी कोणाला कांही देऊं शकत नाही. मी तुला सांगून ठेवतें, त्याने जर तुला विचारलें की भाकर कुणीं दिली तर खुशाल सांग की पीठ तूंच विकत घेतलें आणि भाकऱ्या तेवढ्या मीं करून दिल्या. त्याला जर कां कळलें मी आपणहून तुला जेवायला दिलें तर तो माझ्यावर खूप खवळेल." असें म्हणून ती तडक तेथून निघून गेली. तिचें तें बोलणें ऐकून मी भराभर गळ्याखाली घास लोटूं लागलों. वाटलें, तो यायच्या अगोदर खाणें संपलें तर ठीक, नाहीतर तो कांहीतरी विचारेल आणि मी गडबडून जाईन. एकीकडे खोटें बोलण्याचें पाप आणि खरें बोललों, तर तिकडून, जिने आईच्या वात्सल्याने खाऊं घातलें त्या अन्नपूर्णेचा अपमान. तो आला तेव्हा डोक्यावरल्या भाऱ्यामुळे त्याचें माझ्याकडे लक्ष गेलें नसावें. तो सरळ दुकानांत शिरला आणि मग बराच वेळ बाहेर आलाच नाही. माझेंहि सर्व आटोपलेंच होतें. लवकरच त्या बाईचें

मराठी ग्रं. संग्रहालय, ठाणे.
२८३९२ वि. भू-प्रवास

निर्व्याज प्रेम व दयाळूपणा मनांत आणीत मीहि तेथून निघालों.

## टिहरी राजधानींत

याप्रमाणे टिहरीपर्यंतच्या प्रवासांत खाण्यापिण्याचा मला कुठेच त्रास झाला नाही. मसूरी सोडल्यावर तीन दिवसांत टिहरीला पोहोचलों. टिहरी ही संस्थानी गढवालची राजधानी आहे. गढवाल जिल्हृयाच्या पश्चिमेला तिथे संस्थानी राजवट असल्यामुळे संस्थानी गढवाल म्हणतात व पूर्वार्धाला खालसा गढवाल असें म्हणतात. टिहरीचे राजे हे क्षत्रिय आहेत. तेव्हाचा राजा कीर्तिसहाय हा अज्ञान होता. मी टिहरीला पोहोचतांच कां कुणास ठाऊक, मला कांही दिवस अटकेंत ठेवण्यांत आलें, डेहराडूनला जातांना मीं जो नवीन जोडा विकत घेतला होता. तो घालून मी दोन तीन दिवस फिरलों, पण तो दोन्ही पायांना चावला आणि चांगले टपोरे फोड उठले. टिहरींतील सरकारी दवाखान्यांतून मलम, औषधें वगैरे लावून पाय दुरुस्त होण्यास जवळ जवळ आठ दहा दिवस लागले. पूर्वी टिहरीचे राजेच संपूर्ण गढवाल जिल्ह्याचे सार्वभौम स्वामी होते, आणि सध्याच्या ब्रिटिश हद्दींतील श्रीनगर हीच पूर्वीची राजधानी होती. श्रीनगरचा भग्नप्राय झालेला विशाल दगडी राजमहाल तेव्हाहि ह्या गोष्टीची साक्ष देत होता. ब्रिटिशांच्या आक्रमणानंतर भागीरथी-तीरावरील या टिहरींत राजधानीची प्रतिष्ठा झाली. संस्थानी गढवालमधे टिहरीसारखें समृद्ध शहर दुसरें नाही. येथे राजांनी बांधलेलीं अनेक देवमंदिरें असून नगरांत ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य वस्ती बरीच आहे. संस्थानी गढवालमधील सर्वसाधारण जनतेला टिहरीचाच बाजार सोयीस्कर पडतो.

टिहरी सोडतांना राजघराण्यांतील एका सज्जनाने, यम्नोत्री व गंगोत्रीच्या रस्त्याने जळूंचा खूप त्रास आहे असें सांगून मला पुन: एक जोडा तयार करवून दिला. एकदा जोडा पायांत घालून मीं जे हाल भोगले होते ते ऐकून त्याने या वेळेस तेल हळद माखून जोडा किंचित् नरम करविला. पूर्वीप्रमाणे याहि खेपेस मी तो पायांत घालूं शकलों नाहीं. उत्तराखंडाची यात्रा संपवून तिबेटास पोहोचेपर्यंत मी पुन्हा मग जोड्याला शिवलोंहि नाहीं. हिमालयासारख्या अत्युच्च थंड प्रदेशांत जोड्याशिवाय पाय बचावणें जसें कठीण, तसेंच पालापाचोळ्याचा खच पडलेल्या निसरड्या डोंगराळ वाटेवरून जोडा घालून चालणें देखील कठीणच. थंडीच्या दिवसांत अनवाणीं चालल्याने फार तर थंडीमुळे दोन्ही पाय करपून निघतील, पण जर का पाचोळ्याने झाकलेल्या पाहाडाच्या निसरड्या चढणीवरून पाय घसरला की मग तो माणूस फिरून दृष्टीस पडायला नको. मी दोनदा अशा भयंकर संकटांत सापडतां सापडतां बचावलों. या असल्या वाटेने, मोकळ्या पायांनी आंगठा रोवून चालणेंच सुरक्षित असतें.

### रानांतील एक रात्र

टिहरीहून गंगोत्रीच्या पक्कया सडकेने सुमारें अठरा कोस पुढे गेल्यावर थरासू नांवाचें कानफाट्या साधूंचें एक छोटेसें खेडें लागलें. ह्या खेड्यापासून यम्नोत्रीला एक पाऊलवाट गेली आहे. नवख्या माणसाने त्या पाऊलवाटेने जाणें म्हणजे अगदी भयंकरच काम आहे. एकतर ती पाऊलवाट हिंस्र श्वापदें असलेल्या निबिड अरण्यांतून जाते, आणि दुसरें म्हणजे दोन दिवसांच्या ह्या वाटेने जातांना जंगलांत एक देखील माणूस दिसण्याचा संभव नसतो. चारी बाजूंनी किर्र अरण्य, पायाखालची पाऊलवाट

चुकली की मग ती दाखवायलाहि कुणी नाही. अशा बिकट मार्गानें एकटें कसें जावें याचा विचार करीत दुपारी भर बारा वाजतां मी धरासूला येऊन पोहोचलों. तिथें डोक्यावर उंच गोल टोपी घातलेलीं दहाबारा पाहाडी माणसें विश्रांति घेत पहुडलेलीं दिसलीं. चौकशीअंतीं कळलें की ते सर्व यम्नोत्रीच्या पठारावरील 'जामदग्न्यजी मकाम' गावचे रहिवासी असून डेहराडूनला बाजारहाट उरकून आता गावीं परत चालले होते. त्यांची ओळख होतांच माझी चिंता दूर झाली. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. मला वाटलें होतें की बरोबर सोबती नसल्यामुळे यम्नोत्रीला जाणें जमणार नाही. पण भगवंताला भक्ताची काळजी होती. त्यानें साहाय्य करायचें ठरवलें की मग भक्ताला कशाची उणीव ? त्याच्या इच्छेनुसार, त्या भीषण नि एकाकी अरण्यांतून जायच्या वेळेला एकदम इतक्या लोकांची सोबत मिळाली. मी यम्नोत्रीलाच जाणार असल्याचें ऐकून त्या पाहाडी लोकांनाहि अतोनात आनंद झाला.

यम्नोत्री पठारावरील लोकांचा वेष बराचसा रामपूर बेसहरीच्या * लोकांसारखा असतो. डोक्यावर तीच उंच, गोल घोंगडीची टोपी, जाळीदार जोडा, आणि लांब अंगरखा. गढवालच्या पूर्वेकडील लोकांचा पोशाख मात्र यांच्या पोशाखापेक्षा बराच भिन्न वाटतो. धरासूहून जामदग्न्यजीचें मकाम सुमारें दोन दिवसाच्या वाटेवर आहे. ह्या दोन ठिकाणांमधे एखादें गाव किंवा लोकवस्ती मुळीच नाही. रस्त्यांत वाटसरू ठिकठिकाणीं मोठा

---

* सिमला पर्वताच्या उत्तरेकडील भागाला रामपूर बेसहर म्हणतात. रामपूर बेसहर व यम्नोत्रीचा हा भाग गढवालच्या पश्चिमेस असल्यामुळे दोन्ही ठिकाणच्या पोषाखांत बरेंच साम्य आढळतें.

जाळ करून रात्र काढतात. वाटेने ह्या खुणा बऱ्याच दिसल्या. वाटेंत आम्ही जिथे एक रात्र काढली तिथे 'चिड' झाडाचे मोठमोठे ओंडके पडलेले होते. हिमालयाच्या उतरणीवरील, त्यांतल्या त्यांत जरा उष्ण प्रदेशांत 'चिड' झाडांचीं बरींच रानें आहेत. हीं झाडें पाहायला बरीचशीं सरूच्या झाडासारखीं दिसतात. बरोबरीच्या पाहाडी मंडळींनी, चिड झाडांचीं चार ओंडकीं एकत्र करून विस्तव पेटविला आणि म्हणतां म्हणतां एक मोठें अग्निकुंड तेथे तयार झालें. आणि त्याच्या दोन्ही बाजूला रांगेने बसून आम्ही भाकऱ्या शेकायला सुरुवात केली. कोदो धान्याच्या दोन दोन भाकऱ्या दडपून माझ्या त्या पाहाडी सोबत्यांनी अंगावरील आपले कपडे काढले व त्या लखलखणाऱ्या उजेडांत उवा मारायच्या उद्योगाला प्रारंभ केला. ह्या थंड प्रदेशांत अंगावरील कपड्यांवर खूप उवा राहतात आणि अंगांतील गरम गरम रक्त त्या सतत शोषण करीत असतात.

डास, चिलटें, झुरळें यांच्यापेक्षा उवांचा उपद्रव खूपच तापदायक असतो. त्या अंगावरील कपड्यांवर चिकटून राहतात, आणि सतत रक्त शोषीत असतात. थोडा जरी वेळ मिळाला तरी पाहाडी लोक अंगावरील कपडे काढून उवा मारीत बसतात. आमच्या त्या धगधगत्या अग्निकुंडाजवळ येण्याची कोणत्याच जंगली श्वापदाची हिंमत झाली नसती. आम्ही निश्चिंतपणें ती रात्र काढली. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं यमुनेच्या तीरावरील जामदग्न्य मकाम गावीं पोहोचलों. या गावीं एका प्राचीन देवळांत बऱ्याच जुन्या देव-देवींच्या जुन्या मूर्ति आढळल्या. दोन दिवस या गावांत काढल्यावर तिसऱ्या दिवशीं मीं यम्नोत्रीकडे प्रयाण केलें.

## यम्नोत्रीच्या वाटेने

यम्नोत्रीचा मार्ग यमुनेच्या काठाकाठानेच आहे. जामदग्न्य मकाम सोडल्याच्या दुसऱ्या दिवशीं वाटेंत एक दशनामी नागा संन्यासी व एक वैष्णव साधु असे दोघेजण भेटले. दोघेहि जम्बूहून डोंगराळ वाटेने तेथे येऊन पोहोचले असून यम्नोत्रीदर्शनानंतर बद्रीनारायणला ते जाणार होते. अनायासें आमचा तिघांचा मेळ जुळला. एकमेकांच्या सहवासामुळे सर्वांना आनंद झाला. असा आपसुख प्राप्त झालेला साधुसंग सोडून एकटयानेच पुढे यम्नोत्रीला जाणें मला जमलें नाही. आम्हीं तिघांनी मिळून यम्नोत्रीपर्यंतचा प्रवास केला.

यम्नोत्री गढवाल जिल्ह्यांतील रमौली परगण्यांत आहे. या भागांतील रहिवाशांत आतिथ्यशीलता जवळ जवळ नाहीच. आम्ही दररोज सकाळीं सूर्य उगवण्यापूर्वी चालायला सुरुवात करीत असूं, आणि दोन प्रहर दिवस वर येईपर्यंत चालत असू. त्यानंतर जेवणखाण वगैरे आटोपून पुन्हा वाटचाल सुरू होई. संध्याकाळीं कोण्याहि गावांत आपल्या पथाऱ्या पसरून रात्र काढायची. रस्ता यमुनेच्या तीरातीरानेच पुढे गेला होता. वाटेंत कधी भला मोठा पाहाड चढावा लागे, आणि पलीकडची उतरण उतरल्यावर पुन्हा यमुनेच्या तीरास पाय लागत. अशा रीतीने असले कितीतरी पाहाड चढावे लागले नि उतरावे लागले ह्याची गणती नाही. वाटेने रहदारी बरीच होती, पण ती सर्व ह्या मुलुखांतील पाहाडी लोकांचीच. यम्नोत्रीच्या यात्रेकरूंसाठी जाण्यायेण्याची कांहीच व्यवस्था नाही. यमुनेच्या काठाकाठाने लङ्गूवा व काप्रा नांवाची भाजी बरीच आढळते. आम्ही चालतां चालतां ती तोडून घेत असूं. सूर्य माथ्यावर आला की

जवळपासच्या गावांत जाऊन आमचा सोबती वैष्णव साधु मिळेल ती भिक्षा घेऊन येई. झंगोरा व श्यामाक या धान्याबरोबर ती भाजी तो साधु आपल्या लोटयांत शिजवी. चालून चालून दमलेल्या व भुकेल्या अवस्थेंत त्या रानभाजीचें तें जेवणहि खूप गोड लागायचें. या विभागांतील प्रत्येक खेडयांत धर्मशाळा आहे. रात्रीं अशा धर्मशाळांचा आम्ही आसरा घेत असूं.

### लठ्ठाबगैर देता नहीं !

यम्नोत्रीच्या प्रवासांत आमच्यासारखा प्रसंग सर्वांवरच येत असेल की नाही कांही सांगतां येत नाही. या डोंगराळ मुलुखांतील लोकांच्या दारोदार भिक्षा मागूनहि, एक दिवस आम्हां तिघांना पुरेल अशी भिक्षा कधी मिळाली नाही. अशी दारोदार भिक्षा न मागतां जर कोणी थकलाभागला साधुसंन्यासी, वा यात्रेकरू एखाद्या धर्मशाळेंत दिवसभर भुकेला बसून राहिला तर कोणीहि अयाचितपणें विचारपूस करून त्याला खाऊं घालायला रिकामा नाही. त्यानें दारोदार फिरून "भिक्षा द्या, भिक्षा द्या" असें ओरडून म्हणायला हवें. गढवालमधील सर्वच रहिवासी असे. नाही म्हणायला पूर्वेकडील दशौली परगण्यांतील बद्रीनारायणाकडील लोक तेवढे त्या मानानें आतिथ्यतत्पर आहेत. गढवाली लोकांच्या सहजासहजीं अतिथिसत्कार न करण्याच्या स्वभावाबद्दल एक म्हण प्रसिद्ध आहे. "गढवालीसरीखा दाता नहीं, लठ्ठाबगैर देता नहीं" अर्थात् लठ्ठालठ्ठी केल्यास गढवाली माणसासारखा दाता नाही !

बऱ्याच दिवसांनी पुनश्च गढवालमध्ये फिरण्याचा प्रसंग आला असतां एक मजेदार घटना घडली. तीवरून या वरील म्हणीचें मर्म चांगलें ध्यानांत येईल. या लिहिण्याच्या ओघांत ती

घटना आपोआपच आठवली म्हणून सांगतों. मी, स्वामी विवेकानंद व सारदानंद असे तिघेचौघेजण टिहरीवरून श्रीनगरला जावयास निघालों होतों. वाटेंत संध्याकाळ झाली नि एका गावांत आम्ही येऊन थडकलों. गावांत जो दिसेल त्याला सौम्य व आर्जवी स्वरांत मीं दोनचार लाकडें व विस्तव मागितला. पण कोणी लक्षच देईना. गावांतील प्रत्येकाच्या दाराशीं जाऊन विनवण्या केल्या पण कांही फायदा झाला नाही. अखेरीस ही म्हण आठवली ! मग गावांतल्या एका चौकांत आम्ही उभे राहिलों, आणि मोठमोठ्याने "लाकडें आणा, विस्तव आणा" अशी गर्जना करूं लागलों. पाहतों तो थोडयाच वेळांत कोणीं लाकडें आणूं लागला, कोणीं विस्तव आणला, कोणीं दूध तर कोणी भाजी नि भाकर आणली, आणि अगदी सच्छील, सोज्वळ माणसांसारखे ते सर्वजण नम्रपणें आमच्या भोवती उभे राहिले ! त्यानंतर मग आम्हांला काय पाहिजे काय नाही हें त्यांना वेगळें सांगायची आवश्यकताच राहिली नाही. त्यांनी धुनी पेटवून दिली आणि गुपचूप अंग चोरून उभे राहून आमच्याकडे पाहूं लागले. जणु मघापर्यंतच ज्यांच्याकडे याचना केली, आर्जवें केलीं, तीं हीं माणसें नव्हतच ! दोनचारदा आरडाओरड केल्याबरोबर त्यांची जी ही घाबरगुंडी उडाली त्यावरून वाटलें की आणखी थोडें दटावलें असतें तर हे सगळे आपापलीं घरेंदारें टाकून धूम पळाले असते !

### विषारी मक्षिकेच्या तडाक्यांत

असो. यम्नोत्री विभागांतील या पाहाडी जमातींत का कुणास ठाऊक जवळजवळ सर्वांच्याच गळ्याला गंडमाळा झालेल्या आढळल्या. असला प्रकार इतरत्र कुठे आढळला नाही. तसेंच

ह्या भागांतील एका भयंकर माशीबद्दलहि येथे सांगितल्याशिवाय राहवत नाही. ही माशी हिमालयांत सर्वत्रच असते, पण यम्नोत्री-च्याच वाटेवर तिच्या दंशनाचें सुख व तिच्या विषाचा प्रभाव माझ्या विशेष अनुभवास आला.

ही माशी दिसायला अगदीच लहान, रंगाने निळसर डासासारखी, पण डासाप्रमाणे लांब सुईसारखी सोंड नसलेली अशी असते. हिचे पायहि डासासारखे नसतात. ही जिथे चावते तिथे रक्ताचा बारीकसा थेंब बाहेर येतो. आणि तिने दंश केल्याबरोबर अंगांत एखादी लहान शिळक घुसल्यासारखें वाटतें. त्यानंतर थोड्या वेळाने त्या जागीं खाज सुटते. खाजवतां खाजवतां तो लहानसा रक्ताचा थेंब नाहीसा होतो आणि दुसऱ्या दिवशीं तेथे मोठा फोड येतो. देवी काढल्या म्हणजे काढतांना विशेष कांही वाटत नाही पण नंतर त्या चांगल्याच फुगतात, ह्या माशीचा दंशहि तसाच. मला याबद्दल कोणीं अगोदर कांही सांगितलें नव्हतें. त्यामुळे पहिल्या दिवशीं माझ्या पायाला माशी जिथे जिथे चावली तिथे तिथे मी मनसोक्त खाजवीत सुटलों. दुसऱ्या दिवशीं पाहतों तर पायावर ठिकठिकाणीं गरगरीत फोड आले होते आणि ठणाण दुखत होते. एकाएकी पायावर असे फोड कां आले म्हणून विचारलें तेव्हा सोबत्यांनी सांगितलें की ती जहरी पाहाडी माशी चावली असेल म्हणून. त्यांनीच खाजवूं नका म्हणून सांगितलें आणि अगदीच खाजवावेसें वाटेल तेव्हा वाळक्या गोवरीच्या तुकड्याने खाजवायची परवानगी दिली. ह्या यःकश्चित् क्षुद्र माशीच्या ठायीं किती जालीम विष हें! अंगावर वसून निमिषार्धांत ती हें भयंकर विष माणसाच्या शरीरांत सोडते. माझ्या एका संन्यासी गुरुबंधूला, ह्या माशीच्या दंशामुळे बरेच दिवस इस्पितळामधे काढावे लागले होते.

असो. झालें एवढें विषयान्तर पुरें झालें ! अशा रीतीनें दोनतीन दिवस गेल्यानंतर मला चांगलें कळून आलें की, यम्नोत्रीच्या यात्रेंत जर या साधूंची सोबत जुळली नसती, तर खाण्याच्या बाबतींत निःसंशय अतोनात हाल झाले असते. ती उकडलेली पालेभाजी तरी नशीवीं आली असती की नाही कुणास ठाऊक ! एक नारळाचा कमंडलू सोडून माझ्याजवळ भांडीकुंडीं कांहीच नव्हतीं. पण माझ्या त्या दोन्ही सोबत्यांजवळ प्रत्येकीं दोन दोन मोठाल्या झोळ्या होत्या. आणि त्या विचित्र झोळ्यांमधे काय नव्हतें हाच प्रश्न आहे ! कणीक, डाळ, मीठ, मिरच्या, गडवे, प्याले, वाट्या, तवा, ताटें, सराटे, पळ्या, कागद, पेन्सिली, दऊत, टाक, काय काय अन् किती तरी सटरफटर चिजा होत्या त्यांत. त्यांच्याजवळ थोडासा पैसाअडका देखील होता असें नंतर दिसून आलें.

यम्नोत्रीच्या यात्रेंत पैशांची गरज पडेल याची मला मुळीच कल्पना नव्हती. केदार, बद्रीनारायण व गंगोत्री हीं स्थळें जशीं यात्रेकरूंनी दरवर्षी गजबजून जातात तसें यम्नोत्रीला कांही नसतें. यम्नोत्रीला स्थायीरूपानें पूजाऱ्यांचीहि मुळीच सोय नाही. आणि यम्नोत्रीचा मार्गहि खूपच बिकट आहे. आम्हां तिघांशिवाय त्या वेळीं वाटेनें आणखी कुणीहि यात्रेकरू नव्हता. वाटेवरील शेवटच्या गावीं यम्नोत्रीचे पंडे राहतात. वाट इतकी दुर्घट आहे की येथील कुणी पंडा वाटाड्या म्हणून घेतल्याशिवाय नवख्या माणसाला यम्नोत्रीस पोहोचणें अतिशय कठीण. थोडी थोडी दक्षिणा देऊन त्या गावांतील (गावचें नांव खरशाली होतें असें आठवतें) एक दोन पंड्यांना बरोबर घेणें भाग पडलें. पंडे इतके दरिद्री की दक्षिणेची चवली हातीं पडल्याशिवाय कुणाहि

यात्रेकरूला रस्ता दाखविण्यास राजी नसतात. मसूरीखालच्या राजपूर गावापासूनच तर मी पैशाच्या बाबतींत हात झटकून मोकळा झालों होतों. आणि मी एकटाच जर या गावाला येऊन पोहोचलों असतों तर, पंड्यांपैकी कुणाला माझी दया येऊन त्याने मला यम्नोत्रीचें दर्शन करविलें असतें असें म्हणवत नाही. माझ्या सोबत्यांनी दोनचार आणे पैसे देऊं केल्यावर दोन पंडे आम्हांला यम्नोत्रीस नेण्याला तयार झाले.

### हर-गौरी मीलन

पश्चिमेकडील गिरिशिखरावर विलंबित अशा सूर्यबिंबाच्या किरणांमुळे बर्फाच्छादित हिमालयाने धारण केलेले हेमोज्ज्वल रूप, यम्नोत्रीच्याच वाटेने मला प्रथम दिसलें. धवल हिमराशींनी सदासर्वदा नटलेल्या हिमालयाची ती गौरांग मूर्ति तप्त कांचनाप्रमाणे लखलखत असलेली पाहून मी अत्यंत विस्मित झालों. मुग्धपणें त्या अति सुंदर दृश्याकडे पाहत असतांना मनांत विचार आला, "चाफ्यांच्या फुलासारखी कांहीशी पिवळी व कांहीशी शुभ्र असलेली ही विराट प्रतिमा कोणाची असावी बरें !" सूर्यास्ताच्या वेळीं हिमगिरी खरोखर हेमगिरी दिसत होता. त्या अपरूप दृश्याला द्यावयास उपमा देखील सापडणार नाही. त्या अपार सौंदर्यराशीचें वर्णन करणें माझ्या आटोक्याबाहेरचें काम आहे. नगाधिराज हिमालयाचा अर्धा भाग जणु रुप्याचा, कर्पूरखंडाप्रमाणे अत्यंत शुभ्र असा भासत होता, तर उरलेला अर्धा भाग सुवर्णाप्रमाणे झळाळत होता. एकाच ठिकाणीं सौंदर्याच्या विभिन्न अशा त्या दोन मूर्ति संलग्न झालेल्या पाहून मनांत आलें, हेंच का तें हर–गौरीचें दिव्य मीलन ! "चाम्पेयगौरार्धशरीरकायै, कर्पूरगौरार्धशरीरकाय"? एकाच आधाराठायी

प्रतीयमान झालेलें हर-गौरीचें तें अपूर्व मीलन हिमालयांतच पाहावयास मिळालें. त्या विशालकाय दिव्यमूर्तीच्या पावन दर्शनाने मनांत विचार आला की, उमेला प्राणापलीकडे जपणारा हिमालय जणु अर्धनारीश्वर हर-गौरीचें सतत ध्यान करून करून तन्मय व तदाकार झाला आहे आणि कधीकाळीं झालेलें आपल्या अलोकसामान्य कन्येचें विरहदु:ख जणु पार विसरून गेला आहे!

मनाला उल्हसित करणारें व डोळ्यांचें पारणें फेडणारें जगन्मातेचें प्रशांत लावण्य व भूतभावन भोलानाथाच्या प्रलयकालीन भीषण मूर्तीचें रौद्र स्वरूप, एकत्र घनीभूत होऊन हिमालयाच्याच ठायीं दृग्गोचर झालें. नर-नारायणांनी सेविलेला, महर्षिगणांनी वंदिलेला, पुण्यसलिला अलकनंदेच्या परिसरांतील पावन बदरिकाश्रम, ज़ीवन्मुक्त ऋषि-मुनि व सिद्धचारणगणांनी आपल्या निवासाने पुनीत केलेली व देव-दानव, यक्ष-रक्ष, गंधर्व-किन्नर गणांचीं आवडतीं निवासस्थानें बनलेलीं विस्तीर्ण तपोवनें व गिरिकंदरें, चित्रविचित्र पानांनी नटलेली व वेगवेगळे सुवास उधळणाऱ्या फुलाफळांनी लवलेली दिव्यौषधींची वृक्षराजी; जीवनदायी सोमवल्लीसारख्या लतावेलींनी परिपूर्ण असलेली, रंगीबेरंगी अशा असंख्य पाखरांच्या सुमधुर कंठांतून निघालेल्या कलरवाने मुखरित होणारी, कस्तुरीमृगांच्या कळपांनी विशेष विलोभनीय दिसणारी, आपोआपच गळून पडलेल्या वनकुसुमांमुळे सुगंधित झालेल्या जलप्रवाहांनी व लहानमोठ्या नद-नद्या, तलाव, धबधबे, झरे, सरोवरें इत्यादिकांनी आर्द्र व शीतल असलेली ती नयनमनोहर नंदनवनतुल्य वनश्री पाहून मला वाटलें की पृथ्वीवरील यच्चयावत् सुखाचें, ऐश्वर्याचें व सौंदर्याचें आगर असलेला हिमालय जगज्जननी सर्वमंगला गौरीच्या रूपाने अखिल जगतावर

शांतिमय आशीर्वाद वितरण करीत आहे. पुन्हा दुसऱ्या क्षणाला वाटलें की प्राणिमात्रांना अगम्य व महाश्मशानाप्रमाणे भयाण असलेली ही भूमि, गगनाला जाऊन भिडणारीं व अनंत काळापासून बर्फाळलेलीं हीं उत्तुंग गिरिशिखरें, आपल्या प्रचंड वेगानें खडक फोडणारे व धो धो गर्जना करणारे हे धबधबे, तळाचा ठाव न लागणारी व पाय घसरला की खोल खोल नेणारीं हीं सरोवरें, समोर ठाण मांडून बसलेल्या डोंगरांच्या अजस्र भिंती व समोर आ वासून पडलेल्या दऱ्या, आंत मानवी सांगाडे व कवटया इतस्ततः पडून असलेल्या भयानक गुहा ह्या सर्व वस्तु म्हणजे साक्षात् रुद्राचाच अवतार. तोच जणु आपल्या प्रलयकालीन तांडव नृत्याचे गुरुगंभीर पदविक्षेप करीत, व थरारून सोडणारे झंकार छेडीत छेडीत आकाशमंडळाला आरपार भेदून टाकणाऱ्या असंख्य स्वयंभू लिंगांच्या रूपाने चराचर सृष्टीला भय दाखवीत आहे !

हिमालय-दर्शन घडलेल्या प्रत्येक डोळस व्यक्तीला असें म्हणावें लागेल की हा विराट देह धारण करून पार्वती-परमेश्वर दर्शनेच्छूंचीं हृदयें विस्मयाच्या, भयाच्या व आनंदाच्या उर्मींनी परिपूर्ण करतात. हिमालय सोडून इतर कोणत्याहि स्थळीं मीं असलें विभिन्न भावांचें सम्मेलन पाहिलें नाही. हिमालय जितका मनोरम तितकाच भीषण आहे. असल्या ह्या विरोधी भावांचा एकत्र समावेश शिव-गौरीच्या या हिमालयरूपी विराट देहांतच दिसून येतो.

सदा शिवानां परिभूषणायै,
सदाशिवानां परिभूषणाय ।
शिवान्वितायै च शिवान्विताय,
नमः शिवायै च नमः शिवाय ॥

मधुर-उग्र भावयुक्त उमा-महेशाच्या ह्या अभेदात्मक अपूर्व मूर्तीचें साक्षात् दर्शन झाल्यामुळे मला धन्य वाटलें.

### यम्नोत्री

आणखी वर्णन करण्याची आवश्यकता नाही. वाचकवर्गांतील ज्यांनी आजपर्यंत हिमालय मुळीच पाहिला नाही ते निदान एकदा तरी जाऊन त्याचें दर्शन घेतील व आपल्या जीवनाचें सार्थक करतील अशी आशा आहे. सध्यातरी चलावें त्यांनी माझ्याबरोबर कल्पनावारूवर स्वार होऊन, यम्नोत्रीच्या त्या अलीकडील गावांत.

या गावापासून यम्नोत्रीची वाट आणखीनच बिकट झाली आहे. वाटेंत भैरवघाटी नांवाची एक जागा आहे. तेथून थोडेसें पुढे गेल्यावर भूर्जपत्रवृक्षाच्या फांद्या धरीत धरीत मोठ्या कष्टाने आम्ही यम्नोत्रीला येऊन पोहोचलों. ठिकाण फारच निरुंद असून अति उंच व मोठाल्या बर्फाळ सुळक्यांनी घेरलेलें आहे. त्या गिरिशृंगावरूनच झर झर उड्या टाकीत व आपल्या प्रवाहाचे उद्दाम पदविक्षेप करीत, श्रीकृष्णाच्या व्रजलीलांना पूर्णता आणण्याच्या अत्युत्कट उत्कंठेनेच जणु यमुना वृंदावनाकडे धांव घेत आहे. यम्नोत्री येथे एक मोठें मंदिर असून तेथे श्रीयमुनेच्या दोन मूर्ति आहेत. एक चांदीची व दुसरी पाषाणाची. यम्नोत्रीला एक उष्ण पाण्याचा झरा व एक उबदार भुयारहि आहे. हिमालयांत बऱ्याच ठिकाणीं गंधकमिश्रित पाण्याचीं तप्तकुण्डें मीं पाहिलीं पण येथलें हें कुण्ड कांही औरच होतें. कांगड्याच्या वर मनिकरणेंतहि एक असेंच उष्ण कुंड आहे असें ऐकलें.

### उबदार भुयारांत

गरम झऱ्याजवळच आम्हीं वरण, भात, भाकरीचा स्वयंपाक केला आणि जेवलों. आम्हांला त्या दिवशीं तिथेच सोडून

पंडे निघून गेले. आम्ही तिघांनी ती रात्र त्या उबदार भुयारांत काढली. बाहेर इतकी थंडी होती पण भुयारांत छान वाटत होतें. दुसऱ्या दिवशीं आम्ही तेथून निघालों आणि त्या पंड्यांच्या गावीं येऊन पोहोचलों. उत्तराखंडाच्या ह्या भ्रमंतींत जवळजवळ सहा-सात दिवस मी ह्या दोन साधूंच्या बरोबर काढलेत. पुढे यम्नोत्रीहून परत फिरून, उपरिकोटच्या रस्त्याने ते दोघेजण गंगोत्रीकडे निघाले व मी जामदग्नी मकामहून गंगोत्रीकडे जाणाऱ्या रस्त्याने गंगाकाठच्या उत्तरकाशीला येऊन पोहोचलों. जामदग्नीमकामहून उत्तरकाशीपर्यंत दोन दिवसांचा रस्ता आहे. रस्त्यांत अस्वलांचें भय फार. पाहाडी लोक देखील या रस्त्याने सहसा एकटें जाण्याचें टाळतात. वाटेंत एक लहानसें खेडें लागलें. येथील लोकांस चोरी कशास म्हणतात तें कळत नाही. गावांत कोणाच्या घरादाराला वा चीजवस्तूला कडीकुलुपाचा स्पर्श नाही. असो. दोन दिवस मी या निबिड अरण्यांतून वाट चालत होतों. सुदैवानें कोणा हिंस्र श्वापदाच्या तावडींत सापडलों नाही.

### पाहाडी अस्वलांचें शिकार-तंत्र

लहानपणीं 'कथामालेंत' अस्वल व दोन वाटसरू यांची गोष्ट वाचली होती. पाहाडी लोकांच्या तोंडून जें कांही ऐकलें त्यावरून वाटतें की ती गोष्ट अगदीच बनावट नसावी. पाहाडी लोक म्हणाले की दाट अरण्यांतून जातां जातां समोरून एखादें अस्वल आलें की डोळे झांकतील अशा रीतीनें तोंडावर फडकें बांधावें आणि मढ्याप्रमाणें गुपचुपपणें जमिनीवर कांही वेळ पडून राहावें. मग कांही भीति नाही. अस्वलाची खोड अशी की माणूस दिसतांच तें अगोदर आपला मोठा पंजा मारून नखानें डोळे फोडून तोंड ओरबडून काढतें. म्हणून सावध होऊन तोंड

बचावून ठेवलें की मग अस्वलापासून विशेष कांही त्रास होण्याचा संभव नाही. असो. अस्वलाच्या हल्लयापासून बचावण्याचा उपाय माहीत करून ठेवला. जामदग्नीमकामहून एका पाहाडी वाटाड्यानेंहि माझी एक दिवसपर्यंत साथ केली.

### भटवारी

उत्तरकाशीलाच पाहाडी लोक 'बरहाट' असें म्हणतात. येथे भागीरथीचा प्रवाह उत्तराभिमुख झाला असून गावांत काशींतील विश्वनाथाचें व इतर देवदेवतांचीं मंदिरें आहेत. त्यामुळे जणु महान् समृद्धिशाली वाराणसी नगरीच या जनशून्य पर्वतमय प्रदेशांत येऊन तपस्येंत निमग्न झाली आहे असें वाटतें. उत्तरकाशीहून निघाल्यावर मी एकाच दिवसांत अठरा-एकोणीस मैलांची मजल मारून भटवारी नांवाच्या एका गावांत पोहोचलों. वाटेंत कांही महाराष्ट्रीय यात्रेकरू भेटले. त्यांच्या जवळून थोडी भिक्षा ग्रहण केली. सूर्य माथ्यावर आला तेव्हा थांबून जेवण केलें, व थोडी विश्रांति घेतल्यावर पुन्हा चालायला सुरुवात केली तो दिवसभर चालतच होतों.

### भटवारीजवळ

दिवस मावळायला आला होता. भटवारी गाव अजून मैलभर लांब होतें. थोड्या दूरवर कुणी एक संन्यासी भगवें कापड अंगावर ओढून रस्त्यांत पडलेला आढळला. पाऊस टप् टप् पडायला सुरुवात झाली होती. गाव इतकें जवळ असतां, त्या निर्जन रस्त्यावर पडून राहण्याचें कारण त्याला विचारलें तेव्हा कळलें की दुखण्यामुळे त्याला खूप थकवा आला होता आणि आपलें बोचकें-बाचकें घेऊन तो थोडेंदेखील चालूं शकत नव्हता. दुसरें कांही न सुचल्यामुळे तो तेथेच पडून राहिला होता. त्या

साधूला तशा निर्मनुष्य ठिकाणीं तशा अवस्थेंत सोडून माझ्याने एक पाऊलहि पुढे टाकवेना. पण तेथून त्याला भटवारी गावा-पर्यंत न्यावयाचें तरी कसें ? त्याचें बोचकेंहि जवळजवळ एका माणसाचें ओझें होतें. तें जर कोणीं घेतलें असतें तर मी कसा-तरी त्याला आधार देत गावांत घेऊन जाऊं शकलों असतों. मी उभ्या उभ्या, आता कसें करावें हा विचार करीत होतों इतक्यांत जणु देवाने धाडल्यागत एक ब्रह्मचारी यात्रेकरू तेथे आला. तो भटवारीच्या दिशेने झपाझप पावलें टाकीत चालला होता. मीं त्या संन्याशाची दुरवस्था त्याला सांगितली. कांही एक न बोलतां त्याने मुकाट्याने तें गाठोडें घेतलें व भटवारीकडे तो चालता झाला. मीं हळूहळू त्या संन्याशाला आधार देऊन उठविलें.

### जलसमाधि टळली !

संन्यासी चांगलाच धिप्पाड होता. उठून उभा राहिला तेव्हा उंचीने जवळजवळ माझ्या दुप्पट दिसत होता ! मीं माझी वेळूची लांब काठी त्याच्या हातीं दिली, व त्याच्या कमरेला माझ्या हाताच्या विळख्याचा आधार देऊन एक एक पाऊल पुढे टाकूं लागलों. वाट निरुंद असून एका बाजूला खूप खोल अंतरावर गंगेचा प्रवाह वाहत होता, थोडें दूर जातांच पुन्हा तो घेरी येऊन खाली कोसळला. थोडक्यांत बचावलें, नाहीतर आम्ही दोघेहि त्या पाहाडी कड्यावरून साडेचार हजार हात खाली कोसळून गंगाप्रवाहाशीं एकजीव झालों असतों ! संन्यासी महाशय तर पडल्या पडल्या भीतीने थरथर कांपूं लागले व म्हणाले—"आता येथून हलणेंहि माझ्याने होत नाही." पाठंगुळीस बसविल्याशिवाय त्यांना गावांत नेतां आलें नसतें. प्रसंग पाहून मी तडक भटवारी गावांत गेलों व गावांतील

माणसांना त्या साधूची दशा सांगून गावांत घेऊन येण्याची काकुळतीने विनंती करूं लागलों. परंतु तशा रात्रीं कोणीहि तिकडे यायला तयार होईना. पुष्कळ विनवण्या केल्यावर बीजू नांवाचा एकजण तयार झाला, आणि म्हणाला, मी चलतों, मला नंतर चार आणे द्या. मींहि हो म्हटलें व त्याला घेऊन निघालों.

**दुखणाईत साधूला गावांत नेलें.**

बीजूला तसाच निघालेला पाहून मीं त्याला एक कंडी घ्यावयास सांगितलें. कंडी म्हणजे एक प्रकारची पाठीवर वाहून नेण्याची मोठी टोपली. पाहाडी लोक या कंडींतूनच मोठें सामान वा माणूस बसवून नेतात. बीजूला मीं कंडी घ्यायला सांगितलें, पण त्याने कांही ऐकलें नाही. तो म्हणाला की, मी पाठीवरच त्या साधूला आणूं शकेन. त्यानंतर आम्ही तेथे जाऊन पोहोचलों. तो दीर्घकाय पुरुष हातपाय पसरून रस्त्यांत पडलाच होता. बीजूने त्याचे दोन्ही हात धरून त्याला आपल्या पाठंगुळीस बसविलें आणि तो चालूं लागला. पण तशा अवस्थेंत त्या साधूचे दोन्ही पाय जमिनीवर फरफटत होते ! त्याला तसेंच फरफटत नेलें असतें तर तो कांही वांचता ना ! गावहि चांगलें मैलभर दूर होतें. बीजूलाहि आता जाणवलें की कंडीशिवाय हें काम होणारें नाही. पुन्हा त्या साधूला तेथेच रस्त्यावर सोडून गावांत येऊन आम्ही कुठे कंडी मिळते की काय तें पाहूं लागलों. गावांत कांही यात्रेकरूंनी टिनाच्या डब्यांमध्ये गंगोत्रीचें पाणी भरून कंडीने आणलें होतें. आम्हीं थोडचा वेळेपुरती एक कंडी त्यांच्याजवळ मागितली. पण त्यांना आमचा विश्वास वाटेना. तीर्थस्थानांच्या ठिकाणीं अशा रात्रीच्या वेळीं बहुतेक कुणी कुणाचा विश्वास बाळगीत नाही. अखेरीस माझ्याजवळचें एक घोंगडें

मी त्यांच्याजवळ गहाण म्हणून ठेवलें. तेव्हा कुठे त्यांनी एक कंडी आम्हांला दिली. शेवटीं त्या साधूला आम्ही गावांत घेऊन आलों. रात्र बरीच झाली होती. पण चांदणें स्वच्छ पिठासारखें पडलें असल्यामुळे त्या डोंगराळ रस्त्यावर आम्ही अशा येरझारा घालूं शकलों.

### नागा साधूंच्या लाखोल्या

गावांत पोहोचल्यावर पुन्हा एक अडचण आमच्यापुढे उभी राहिली. गावच्या वेशीजवळ रस्त्याच्या कडेला, कांही घरट्टे (एक प्रकारची पाणचक्की), एक धर्मशाळा, टिहरीच्या राजाचा एक वाडा, आणि यात्रेकरूंसाठी बऱ्याचशा खोल्या आहेत. दुखणाईत साधूला रात्रीचें उघड्यावर ठेवणें ठीक झालें नसतें. म्हणून मी त्याच्यासाठी आसरा शोधूं लागलों. यात्रेकरूंच्या इतक्याहि खोल्या भरल्या होत्या. बीजू मला म्हणाला, "धर्मशाळेकडे चला. साधुबावांना तेथेच ठेवूं" धर्मशाळेजवळ येऊन पोहोचतों न पोहचतों तोंच आंतून "दूर व्हा, दूर व्हा" असे बरेच आवाज एकदम येऊन कानांवर आदळले. आंत अंधार होता. तेव्हा आंत कोण बोलत आहेत तें कांही कळलें नाही. थोड्या वेळानें दिसलें की धर्मशाळेंत वैष्णव नागा साधूंचा एक जथ्था उतरला आहे. आंत शिरायलाहि रीघ नव्हती. दारांतूनच मी त्यांना, त्या दुखणाईत साधूला तेवढी, थोडीशी जागा देण्याविषयी काकुळती करूं लागलों. पण कोणी माझें म्हणणें ऐकायला तयार नव्हतें. उलट मी जितक्या विनवण्या करूं लागलों तितकें ते लोक माझ्यावर उलटूं लागले व मला अद्वातद्वा शिव्या देऊं लागले. इकडे उशीर होऊं लागल्यामुळे बीजू आपल्या पाठीवरचें ओझें खाली टाकण्यास उतावीळ झाला होता. मी आपला मधेच

रगडला जात होतों. अखेरीस कसेंहि करून साधूला आंत जागा मिळवून द्यायचीच ह्या निश्चयाने मी त्यांच्याशीं तंडूं लागलों. माझी शांति ढळूं न देतां, आणि त्यांच्या त्या शिव्यांच्या लाखोल्याकडे लक्ष न देतां मी पुन्हा पुन्हा त्या साधूला आंत घेण्याविषयी त्यांना सांगूं लागलों.

पण काय, पालथ्या घड्यावर पाणी ! माझ्या इतक्या विनवण्यांचा त्यांच्यावर कांही एक परिणाम झाला नाही. शेवटीं मी मागे हटणार नाही असें दिसल्यावर जवळजवळ सोळा-सतरा गलेलठ्ठ नागा साधु माझें जणु भस्म करून टाकतील असे आपले तांबडेलाल डोळे माझ्यावर रोखीत "राहा तुम्हीच आंत, तुम्हीच राहा आंत" असा तळतळाट करीत व शिव्यांची सरबत्ती आणखी जोरांत वाढवीत बाहेर पडले. त्यांचा तो वैताग पाहून मला अतोनात नवल वाटलें. त्यांनी मनावर घेतलें असतें तर इतकी तोंडची वाफ न दवडतां, उगाच त्रागा न करतां, सुखासुखी एका माणसाची जागा ते आंत देऊं शकले असते. ते सर्वजण बाहेर निघून गेल्यावर मीं थोडाहि विलंब न करतां साधूला कंडींतून उतरविलें व त्या प्रशस्त खोलीच्या एका कोपऱ्यांत निजविलें. इतक्या कष्टाने त्या साधूला जागा मिळवून दिल्यावर मला निश्चित वाटलें. आता रात्रीचे दहा वाजले होते. त्यानंतर मग मीं कंडी परत केली व माझें घोंगडें घेऊन आलों. वीजूला दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझ्याकडे येण्यास सांगितलें.

### नागा साधूंचा हृदयपालट !

ते नागा साधु धर्मशाळेच्या चारहि बाजूने असलेल्या पडवींत झोपले व मी पलीकडील एका झाडाखाली झोपलों. ती रात्र तर अशीच निघून गेली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून

पाहतों तो कांही नागा साधु माझ्याकडे टकमक बघत होते. त्यांच्यापैकी कुणी कुणी आंत जाऊन त्या रुग्ण साधूला पाहून येत होते. त्यांच्या मुखावर विस्मय उमटला होता. त्यांच्यांतला एकजण मला उद्देशून म्हणाला, "आरे, यह तो परमहंस है, नहीं तो इतनी गालीगालौज क्योंकर सह सकते ?" (अरे, हे तर परमहंस आहेत. एरवी इतकी शिवीगाळ यांनी कशी सहन केली असती ?) मग त्यांच्यापैकी कोणी कोणी मजजवळ येऊन आदल्या रात्रीं घडलेल्या प्रकाराबद्दल दिलगिरी दाखवू लागला. असो. मी त्या बाबतींत कांहीएक न बोलतां अगोदर, रुग्ण साधूच्या समाचारास आंत गेलों. आंत जाऊन पाहतों तो साधु बसून होता. रात्रीपेक्षा त्याला आता पुष्कळच बरें वाटत असावें. मीं कांही लाकडें गोळा करून आणलीं व त्याच्यासमोर धुनि पेटवून दिली. त्यानंतर त्याने आपल्या झोळींतून पीठ काढून मला भाकऱ्या करावयास सांगितलें. मी स्वयंपाकास बसलों. बोलतां बोलतां एवढेंच कळलें की साधु मूळचा मारवाडचा. बद्रीकेदारच्या यात्रेसाठी निघाला असतां वाटेंत मूळव्याधीने आजारी पडला. त्याचे कांही पैसेहि चोरीस गेले होते.

### दमडी न जाय !

मी साधूशीं बोलत होतों, इतक्यांत बीजू येऊन उपस्थित झाला व त्या साधूला आदल्या रात्रीची मजूरी म्हणून चार आणे मागूं लागला. त्याने पैसे मागतांच तो साधु एकदम बिथरला ! माझ्याजवळ कांही नाही व मीं कांहीच देऊं शकत नाही असें म्हणूं लागला. त्याच्याजवळ कापडचोपड व भांडीकुंडीं इतकीं होतीं की त्यांतलें एखादें कांही त्याने बीजूला दिलें असतें तर तो खूष झाला असता. पैसे नाहीत तर त्याबदलांत एखादी चीजवस्तु

मिळावी म्हणून बीजूनेंहि खूप आग्रह केला. पण साधूचें मन कांही केल्या वळेना. उलट बीजूवर तो जास्तच चिडूं लागला व शेवटीं शेवटीं कशाला या माणसाच्या पाठीवर बसवून मला आणविलें म्हणून माझ्यावरहि तडतडूं लागला. अशा त्राग्याने त्याचा आजार वाढेल असें वाटून मीं बीजूला म्हटलें "तूं आता जा. मी माझ्यापरीने नंतर तुला कांहीतरी देईन." त्यावर तो आपला मुकाट्याने निघून गेला.

भाकऱ्या झाल्यावर मी त्या साधूला खायला दिलें. नंतर स्नान करून मी गावांत भिक्षेसाठी गेलों. त्या दिवशीं गावांतील लोक माझ्याशीं खूप सहानुभूतीने वागले. माझी हकीगत ऐकून एकाने बीजूला दोन आणे दिले व दुसऱ्या एकाने दुपारीं आणखी दोन आणे देईन असें म्हणून मला ऋणमुक्त करण्याचें आश्वासन दिलें.

### दुखणाईत साधूचा ग्रंथ आटोपतो

गावांतून धर्मशाळेंत परत आल्यावर पाहतों तो साधूची घटका अगदी भरत आलेली दिसली. घशांत घरघर सुरू झाली होती व माशांचे पुंजकेच्या पुंजके त्याच्या तोंडाभोवती घोंगावत होते. गावांत जायच्या अगोदर एकदम असें कांही होईल असें मला वाटलें नव्हतें. मी मोठमोठ्याने त्याला हांक मारूं लागलों. पण आता कोण कोणाला उत्तर देणार ? थोड्या वेळापूर्वी हाच माणूस आपल्याजवळच्या लहान सहान वस्तूंना कवटाळून बसला होता, उपकाराबद्दल थोडीदेखील कृतज्ञता त्याच्याजवळ नव्हती, इतकेंच नव्हे तर उपकारकर्त्याला शिव्या देण्याला व त्याचा अपमान करण्यालाहि त्याला मुळीच कांही वाटलें नव्हतें. ज्या त्याच्या देहावर अगोदर एक माशी बसल्यानेहि त्याला

कमालीचा त्रास होत होता तो त्याचा धिप्पाड देह—त्याच्या ममत्वाचा एकमेव आधार—त्या घोंगावणाऱ्या असंख्य माशांनी आता आपल्या पूर्णपणें ताब्यांत घेतला होता. प्राणाहून प्रिय वाटणारी त्याची सारी चीजवस्त आता थेट सरकारजमा होणार होती ! मी मत्रा गावांत गेलों असतां, माझ्या मागें, टिहरी राजाचा एक पटवारी येथे येऊन गेला होता व त्याने साधूच्या साऱ्या सामानाची एक यादी करून नेली होती. त्या शेवटच्या घटकेला मीं साधूच्या तोंडांत थोडेसें गंगाजल टाकलें व देवाचें नांव ऐकविलें. कांही क्षणांत साधूने प्राण सोडले. थोड्या वेळाने बातमी कळतांच पटवारी आला व साधूचें सर्व बोचकें गोळा करूं लागला. नवलाची गोष्ट म्हणजे त्या बोचक्यांत एक दोन आण्याचें नाणें आढळलें ? मीं तें मागून घेतलें व बीजूचे उरलेले पैसे चुकवून त्याच्या ऋणांतून मुक्त झालों. साधूचें प्रेत तेथून हलविणें माझ्या शक्तीबाहेरचें काम होतें. मला वाईट वाटलें. गावांतील कुणी ब्राह्मण वा रजपूत प्रेताचा अंत्यसंस्कार करायला तयार नव्हता. अखेरीस दुसरा उपाय न सापडल्यामुळे खालच्या जातीच्या दोघाजणांच्या मदतीनें तें प्रेत गंगेच्या प्रवाहांत सोडून देण्यांत आलें. त्या पहाडी भागांत हीच अंत्यसंस्काराची सोपी पद्धत आहे. असो. या अनपेक्षित घटनेमुळे भटवारींत माझे दोनतीन दिवस मोडले.

### गंगोत्रीच्या वाटेने

भटवारी सोडल्यावर चार दिवसांनी मी गंगोत्रीस येऊन पोहोचलों. गंगोत्रीच्या रस्त्यावरील शेवटचें गाव म्हणजे 'धरारी'. या गावापासून गंगोत्री जवळजवळ बारा कोस आहे. अर्धेअधिक अंतर आल्यावर 'भैरव झोला' नांवाचें एक ठिकाण लागतें.



अनुक्रमांक २६३९२ भू-प्रवास
क्रमांक १७४ २३।३।६०

भैरवजीचें ठाण म्हणून गंगोत्रीचे यात्रेकरू येथेहि पूजाअर्चा करतात व मगच पुढला मार्ग धरतात. भैरवजीचें देऊळ फार लहान आहे. या लहान देवळाशिवाय वाटेंत दुसरी कोणतीच वस्ती नाही वा दुकान नाही. भैरवघाटीला पोहोचल्यावर मी मुख्य रस्ता सोडून दुसरीकडे भटकलों. इथेच भोटगंगा नांवाचा दुसरा एक प्रवाह येऊन गंगेच्या मूलधारेंत मिळाला आहे. वाट चुकल्यामुळे कांही वेळ इतस्तत: भटकून मी पुन्हा मूळ रस्त्याला लागलों. असो. आता जसा जसा मी गंगोत्रीच्या वाटेने पुढेपुढे जात होतों तसें तसें हिमालयाचें तें विराट अपरूप सौंदर्य माझ्या दृष्टीसमोर उलगडत होतें. समोर तोच बर्फ पांघरलेला कासवाच्या पाठी-प्रमाणे फुगीर दिसणारा प्रचंड पर्वत. ह्याच पर्वतावरून त्रिभुवनपावनी भागीरथी, नागमोडी वळणें घेत घेत व कानठाळ्या बसतील इतक्या मोठ्याने 'हर हर' असा निनाद करीत करीत आपल्या फेनधवल प्रवाहरूपाने मर्त्यलोकीं अवतरली आहे. गंगोत्रीला गंगामैय्याचा प्रवाह आहे बारीक, पण त्याला ओढ इतकी की शंभर ऐरावतांना देखील क्षणांत फरफटत नेईल. गंगामाईचा तो पांढराफेक पवित्र प्रवाह असंख्य जीवांच्या उद्धा-राच्या उत्कंठेनेच जणु कुठेच न खोळंबतां इतक्या द्रुत गतीनें उद्दाम नृत्याच्या तालाने भूलोकीं प्रवेश करीत आहे. भागी-रथीच्या दोन्ही तीरावरील उत्तुंग पर्वतराजीचा वरील भाग बर्फाच्या मोठमोठ्या ढिगाऱ्याखाली झाकला आहे तर खालचा भाग गडद हिरव्या देवदारु वृक्षांच्या अधोवस्त्रांत लपेटलेला आहे. प्रवाहाच्या दोन्ही बाजला मधन मधून पांढरे शुभ्र व गुळगुळीत शिलाखंड वेदिकेप्रमाणे आपोआप रचल्या गेल्यासारखे आढळतात. ते इतके सुंदर दिसतात की त्यांचें वर्णन करणें

कुणालाच साधणार नाही. मी तर त्या सभोवार पसरलेल्या प्राकृतिक सौंदर्याच्या राशीच्या राशी पाहून अजीबात देहभान विसरून गेलों. मला खरोखरच वाटूं लागलें की मी जणु आता मृत्युलोकांत नाहीच. ठिकठिकाणच्या विस्तृत शिलाखंडांवर बसूं लागलों. जें पाहिलें तें कांही पुन्हा दिसणार नाही, असें वाटून मन आणखीच अधीर नि व्याकुळ होऊं लागलें. आणि सारें डोळे भरभरून पाहायचें असें ठरवून कितीतरी ठिकाणीं पुन: पुन: बसून मीं त्या निसर्गसौंदर्याचें आकंठ पान केलें.

संध्याकाळ होत आली आहे हें माझ्या लक्षांतच आलें नाही ! तें ठिकाण सोडून एक पाऊलहि माझ्याने पुढे टाकवेना. माझी ती अवस्था एका साधूच्या ध्यानांत आली व कसेंतरी मला बरोबर घेऊन तो गगोत्रीकडे निघाला. भैरवझोल्याजवळ त्या साधूची व माझी प्रथम भेट झाली होती, आणि त्यानेच वाटेंत भाकरी करून मला जेवूं घातलें होतें. दिवस मावळल्यावर आम्ही गंगोत्रीला येऊन पोहोचलों. येथील गंगामैय्याच्या धातु-मयी सुंदर मूर्तीच्या दर्शनाने अतोनात प्रसन्न वाटलें. गंगोत्रीला गंगामाईचें एक पाषाणाचें मंदिर असून यात्रेकरूंसाठी व पंड्यांसाठी कांही घरें आहेत. त्यांच्याच दैनंदिन गरजेच्या वस्तूंचीं एकदोन दुकानेंहि आहेत. गंगोत्रीच्या घाटावरील एका गुहेंत एकजण साधु राहत होता. तो धरारी व जवळपासचीं एकदोन गावें फिरून भिक्षा गोळा करून दरवर्षीं गंगोत्रीला येणाऱ्या साधुसंन्याशांची चांगली सेवा करी. गंगोत्रीला तेव्हा सदावर्त वगैरे कांही नव्हतें. त्या साधूने जर अशी भिक्षा मागून इतरांची सेवा केली नसती तर माझ्यासारख्या निष्कांचन माणसाला गंगोत्रीला एकदोन दिवस काढणेंहि शक्य झालें नसतें.

## गंगोत्री-मंदिर व भगीरथ-शिला

या ठिकाणापासून मूळ गंगोत्री वा गोमुखी जवळजवळ बारा कोस असेल. गंगेच्या दोन्ही तीरावरील येथील हिमाच्छादित पर्वतराजी चढायला इतकी कठीण आहे की पुष्कळ प्रयत्न करूनहि आजपर्यंत कुणी त्यांच्यावर चढूं शकलेला नाही. असें ऐकण्यांत आहे की कांही वर्षांपूर्वी एक युरोपियन प्रवासी येथून थोडेंबहुत अंतर चढून गेला होता, पण तो कांही परत फिरला नाही, तिकडेंच त्याचा अंत झाला. त्याशिवायहि आणखी बऱ्याच इंग्रज प्रवाशांनी अनेकदा चढण्याचे प्रयत्न केले पण ते सर्व फसले. मी मोठ्या कष्टाने सरासरी एक मैल वर जाऊं शकलों. या पहाडांच्या रांगा अगोदरच अति उंच व त्यावर बर्फाचे थरच थर सांचलेले. त्यांत पुन्हा उन्हाळ्यांतील सूर्य जेव्हा प्रखरपणें तळपूं लागतो तेव्हा बर्फाचे ढीग वितळूं लागतात व पहाडाचें सर्वांग इतकें निसरडें होतें की त्यावर पाय ठरूं शकत नाही. असें आहे म्हणून फार प्राचीन काळापासून येथेच गंगोत्री-स्नान आटोपण्याचा प्रघात आहे. भगवान् आद्य शंकराचार्यांनीहि येथेच स्नान करून गंगोत्री-मंदिराची प्रतिष्ठापना केली. येथे यात्रेकरू ज्या घाटावर स्नान करतात त्याला "भगीरथशिला" म्हणतात. श्री गंगोत्री-मंदिराबाहेर एक अति सुंदर असें पांढरें शुभ्र स्फटिक लिंग पाहिलें. पंडे लोक तें शिवलिंग नेहमी एका तांब्याच्या आवरणाखाली झाकून ठेवतात. केदारनाथ व बद्रीनारायण या क्षेत्रांशीं तुलना करतां गंगोत्री येथील यात्रेकरूंची संख्या फारच रोड म्हणावी लागेल. त्यांतहि महाराष्ट्रीय यात्रेकरूच अधिक असतात. बहुतेक सगळे यात्रेकरू येथे एखादी रात्र राहून परततात. वर्षांतून साधारणतः सहा महिनेच येथे गंगामाईची पूजा होते व यात्रेकरू

जाणेंयेणें करतात. पूजानैवेद्यादिकांची विशेष व्यवस्था नाही. प्रसादेच्छु साधु-संन्याशांना तिसऱ्या प्रहरीं पिंडाएवढा एकेक भाताचा गोळा प्रसाद म्हणून मिळतो. तो देखील पुजारी एक दोन दिवसांपेक्षा जास्त दिवस कोणाला द्यायला तयार नसतात.

**गोमुखीच्या वाटेवर—**

मंदिरापासून निघून गंगेच्या तीरातीराने मी गोमुखीकडे सहज आपला जाऊं लागलों. थोड्याच अतंरावर एक अत्यंत सुंदर अशी गुहा दिसली. गुहा चांगली ऐसपैस होती व राहण्याच्या सोयीसाठी तिच्या दोन्ही बाजूंनी सुंदर लाकडी तक्ते ठोकून आडोसा तयार केला होता. आंत दोन दारेंहि बसविलीं होतीं. या गुहेच्या मागील बाजूला दुसरी एक छोटीशी गुहा होती. मुरादाबाद जिल्ह्यांतील एक वानप्रस्थाश्रमी वयस्क ब्राह्मण त्या गुहांमधे राहत असे. कांही दिवसांपासून त्यांनी तेथे गायत्री-पुरश्चरण आरंभलें होतें. त्यांच्या परवानगीने मी त्या छोट्या गुहेंत आपलें बस्तान मांडलें. एक दोन दिवसांतच त्यांच्याशीं माझें चांगलें सूत जमलें. त्यांच्याकडून कळलें की गेल्या दोन दिवसांपासून गुहा सोडून ते कुठे गेले नव्हते, व पुजारी किंवा पंडे यांच्यापैकी कुणीहि त्यांची वास्तपुस्त केली नव्हती. त्यांना पडलेल्या दोन दिवसांच्या उपवासाची हकीगत ऐकून मला अतोनात काळजी वाटली. त्यांच्यासाठी खाण्याकरिता कांहीतरी आणावें ह्या हेतूने मी बाहेर पडलों व गंगोत्री-मंदिराची वाट चालूं लागलों. आणि पाहा भगवंताची अपार कृपा ! आईच्या देवळांत पोहोचतांच दिसलें की दिल्लीहून एक धनाढ्य यात्रेकरू तेथे आला असून साधूंच्या व ब्राह्मणभोजनाच्या तयारींत तो आहे. गंगोत्री येथील सर्व साधूंना व ब्राह्मणांना त्याने त्या दिवशीं शिरापुरीचें जेवण

दिलें. सर्व साधुसंन्याशांचें व ब्राह्मणांचें तर पोटभर जेवण झालें पण एकालाहि त्या गुहेंत एकाकी पुरश्चरण करणाऱ्या ब्राह्मणाची आठवण झाली नाही. मीं दिल्लीच्या त्या शेठजीजवळ त्या ब्राह्मणाविषयी सांगितलें तसा तो तडक माझ्यावरोबर गुहेकडे आला व ब्राह्मण तापसाचें दर्शन घेऊन आम्हां दोघांना आठ-दहा दिवस पुरेल इतकी कणीक, तांदूळ, गूळ व तूप इत्यादि शिधा-सामुग्री देऊन गेला.

आता ब्राह्मण तापसाचे उपवासाचे क्लेश संपले होते. अगोदरच माझ्याविषयी त्यांच्या मनांत सहजपणाने उपजलेलें प्रेम आता आणखी वाढलें, व खूप आग्रह करून त्यांनी मला साखरभात व पोळ्या खाऊं घातल्या. अशा रीतीने एक आठवडा खूप आनंदांत गेला. आमच्या गुहेमधे देवदाराच्या लाकडांची धुनी अखंडपणें पेटलेली असे. ह्या लाकडांत एक प्रकारचा तेलकट पदार्थ असतो. आणि थोड्याशा झिलप्या-ढलप्यांनीहि धुनी रात्रंदिवस छान जळत राहते. ह्या लाकडांपासून राळ व टर्पेंटाइन होतें. देवदाराचीं झाडें ह्या विभागांत मुबलक असल्यामुळे येथील लोकांना वेगळ्या दिव्यांची आवश्यकता भासत नाही. ह्या झाडाचा मोठासा फाटाहि एखाद्या मशालीचें काम करतो. या इकडील थंड प्रदेशांत विस्तवाशिवाय राहणें कठीण, पण देवाच्या कृपेने विस्तवहि असा सहजासहजीं लाभू शकतो.

केदारबद्री आणि गंगोत्री इत्यादि क्षेत्रें हिमालयाच्या अत्युच्च अशा उत्तरेकडील प्रदेशांत असल्यामुळे वर्षांतून फक्त सहा महिनेच इकडे लोकांची आवकजावक असते. अक्षयतृतीयेनंतर वैशाख मास संपायला तीन चार दिवस असतांनाच पट काढण्यांत येतो, म्हणजे पूजा व यात्रा सुरू होते. आणि मार्गशीर्ष सुरू होऊन

दोन तीन दिवस झाले की पट टाकण्यांत येतो, म्हणजे मार्गशीर्षापासून वैशाखापर्यंत एकसारखा बर्फ पडत असल्यामुळे हें स्थान अगदी दुर्गम होतें व यात्रा अजीबात बंद पडते. इकडील लोक म्हणतात की त्या काळांत देवगणांची यात्रा सुरू होते व ते दररोज येऊन पूजा करतात. मी ज्या वर्षी गेलों होतों, त्याच्या आदल्या वर्षींच पट टाकण्यांत आल्यानंतर कोणा एका ब्रह्मचाऱ्याची त्या निर्जन स्थळीं सहा महिने राहून तपस्या करण्याची इच्छा झाली होती. त्याच्याकरिता म्हणून धरारी गावांतील एका धार्मिक वृत्तीच्या गृहस्थाने ही गुहा राहण्यास योग्य अशी करून दिली होती, व गुहेमधे एका भल्या मोठ्या संदुकींत सहा महिने पुरेल एवढी शिधासामुग्री आणून ठेवली होती. परंतु ब्रह्मचारी महाशय जरा कच्चे निघाले. कांही दिवस राहिल्यावर थंडीचा वाढता कडाका पाहून त्यांनी तेथून यःपलायन केलें ! त्यांच्याचकरिता थंडीचा बंदोबस्त करून गुहा राहण्यासाठी इतकी सोइस्करपणें सजविली होती. असो. एका आठवड्यानंतर मी गंगोत्रीहून पुढील प्रवासाच्या तयारीला लागलों. टिहरीहून येतांना, गंगोत्रीचें जल भरून नेण्यासाठी एक बाटली आणली होती, ती भरून घेतली. ब्राह्मण तापसाचा माझ्यावर इतका लोभ जडला होता की आपलें संकल्पित पुरश्चरण पुरें होतें नाही होत तोंच त्यांनी माझ्याबरोबर प्रवासास निघण्याची तयारी चालविली. उत्तराखंडाची यात्रा एकट्यानेच पार पाडण्याचा माझा संकल्प त्यांना सांगून, माझ्या बरोबर न येण्याविषयी मीं त्यांना पुष्कळ विनविलें. परंतु कांही केल्या ते ऐकेनात. गंगोत्रीहून निघाल्यावर धरारी गावांत आलों व फक्त एकच रात्र आम्ही दोघेजण एकत्र होतों. माझी एकट्याने प्रवास करण्याची इच्छा इतकी तीव्रतम झाली होती की, ब्राह्मण

तापसाच्या निष्कपट स्नेहाचें व अव्याज प्रेमाचें बंधन कठोरपणें तोडून त्या गावीं मीं त्यांचा संग सोडला व भगवान केदारनाथाच्या दर्शनासाठी, एकटाच उतरकाशीच्या रोखाने चालूं लागलों.

### मन घट्ट केलें

धरारी गावांत मी त्या ब्राह्मण तापसाचा संग सोडून एकटा निघालों खरा, पण त्याचें तें निष्कपट प्रेम व आपुलकी विसरूं शकलों नाहीं. रस्त्यानें चालतां चालतां पुन: पुन: त्यांची मूर्ति डोळ्यासमोर येऊं लागली. मी जेव्हा त्यांचा शेवटचा निरोप घेऊं लागलों तेव्हा त्यांच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. गळा भरून आलेला होता. डबडबलेल्या डोळ्यांनी ते एकसारखे माझ्याकडे पाहत होते. त्यांची ती सकरुण दृष्टि व विव्हल अवस्था आठवून माझेंहि अंत:करण ढवळून निघत होतें, व येईनात का ते बरोबर असेंहि अधून मधून वाटत होतें. पण कुणाच्या अशा मायाममतेच्या कह्यांत गेल्यास माझ्या संकल्पाप्रमाणे मी स्वच्छंदपणें पुढील प्रवास करूं शकणार नाहीं असें वाटून पुनः मन पक्कें केलें व गंगोत्रीला जातांना चढलेली वाट पुनश्च उतरूं लागलों.

### देवीच्या दर्शनासाठी

गंगोत्रीहून केदारनाथला जाण्यासाठी दोन रस्ते आहेत. एक भटवारीवरून बुढा-केदार व त्रियुगीनारायणमार्गे जाणारा आणि दुसरा उत्तरकाशीवरून जाणारा. गंगोत्रीला आलेले यात्रेकरू या दोन्ही मार्गांनी केदारनाथ व बद्रीनारायणाच्या दर्शनाला जातात. मी देखील त्या रुळलेल्या वाटेनेच गेलों असतों, पण एका खास कारणास्तव मी पुन: टिहरीला परत आलों. गंगोत्रीला जाण्यापूर्वी मीं टिहरींत ऐकलें होतें की टिहरी

व देवप्रयाग यांच्यामध्ये असलेल्या घनदाट अरण्यांतील एका उंच पर्वताच्या कड्यावर दाक्षायणी सतीच्या बावन पीठस्थानांपैकी एक, चंद्रवदनी देवीचें पीठस्थान आहे. चंद्रवदनी देवीच्या ह्या स्थानाबद्दल ऐकल्यापासून महामायेच्या त्या पवित्र निवासाचें दर्शन घेण्यासाठी माझें मन अत्यंत उत्सुक झालें होतें. केदारनाथ व बद्रीनारायणाच्या यात्रेनंतर जर यदाकदाचित् माझें त्या भागांत पुन: परत येणें झालें नसतें तर चंद्रवदनी देवीच्या दर्शनाला मी कायमचा मुकलों असतों. म्हणून मी टिहरीला परत आलों, व इतका प्रदीर्घ फेरा घेऊन मग केदार-बद्रीनारायणाचा रस्ता धरला. चंद्रवदनी देवीचें दर्शन घेऊन केदार बद्रीनारायणाला पोहोचायला मला जितका वेळ लागला त्याच्या अर्ध्याअधिक वेळांत मी भटवारीहून बद्रीनारायणाची यात्रा करून परत फिरूं शकलों असतों. अस्तु.

### औषधं जान्हवीतोयम्

मी उत्तरकाशीहून ज्या मार्गानें गंगोत्रीला गेलों होतों त्याच मार्गानें पुन: तेथें परत आलों. यावेळेस उत्तरकाशीला येऊन पोहोचतांच पोटाच्या रोगानें मला झपाटलें. Hill-Diarrhoea (पाहाडी हागवण) म्हणतात तो हाच असावा. एकाएकी पोट मुरडून जुलाब होऊं लागले. काय करावें, कुठे जावें याचा विचार करूं लागलों. उत्तरकाशी एक मोठें पवित्र तीर्थस्थान. काशींतल्याप्रमाणे येथेहि ती मणिकर्णिका, तीच विश्वनाथ, अन्नपूर्णा व इतर देवदेवींचीं मंदिरें असल्यामुळे यात्रेच्या दिवसांत येथे जिकडे तिकडे माणसांची गर्दी असते. हिमालयासारख्या विरळ वस्तीच्या प्रदेशांत उत्तरकाशी हें एक फार मोठ्या लोकवस्तीचें गाव आहे. पुन: पुन: गावाबाहेर जाण्यापेक्षा मी एकदम उत्तरकाशीहून

निघालों व निर्जन जागीं पोहोचल्यावर गंगेच्या तीरावरील एका शिलाखंडाचा आधार घेतला. आता पूर्णपणें बरा होईपर्यंत गावाबाहेरील त्या निर्मनुष्य ठिकाणीं राहणेंच उचित होईल असें वाटलें. सतत दोन दिवसपर्यंत मला जुलाब होत होते. त्यामुळे गावाकडे मी कांही फिरकूं शकलों नाहीं. दोन दिवसाच्या त्या हगवणीमुळे मला खूपच अशक्तता आली होती. गावापासून मी इतक्या दूर येऊन पडलों होतों की गेल्या दोन दिवसांत एकहि माणूस माझ्या नजरेला पडला नाही. तिसऱ्या दिवशीं सकाळीं जरा बरें वाटूं लागलें व आज गावाकडे परतावें असा विचार करूं लागलों.

### त्याला देवानेच धाडलें

इतक्यांत अंगांत मळके कपडे घातलेला, ह्या मुलखांतील एक माणूस माझ्याकडे येतांना दिसला जवळ आल्यावर इतक्या आपलेपणाने तो माझी विचारपूस करूं लागला की जणु माझ्या या संकटग्रस्त अवस्थेची त्याला कुठून तरी वातमी लागून मला गावांत नेण्यासाठी म्हणूनच तो तेथे आला होता ! अमांशामुळे गेले दोन दिवस मी त्या निर्जन जागीं असहाय अवस्थेंत पडून होतों हें ऐकून त्याच्या दोन्ही डोळ्यांत आसवें आलीं, व मला किती त्रास झाला असेल या विचाराने त्याला खूपच वाईट वाटूं लागलें. त्याच्या त्या सरळ व अंतःकरणापासूनच्या प्रेमळ वागणुकीमुळे मी विरघळून गेलों. वाटलें कोण असावा हा माणूस ! — माझ्या असल्या संकटकाळीं येऊन माझ्या दुःखामुळे दुःखी होतो व मला बरें वाटावें म्हणून स्वतः इतका त्रास घेतो ! माझ्या तशा क्षीण अवस्थेंत कुणाच्या साहाय्याशिवाय मी मुळीच गावाकडे जाऊं शकलों नसतों. आणि अंगांत शक्ति यायला व पुढील यात्रेच्या वाटेला लागायला पुष्कळ विलंब लागला असता.

## पर्णकुटींतील अतिथिसत्कार

हा माणूस यायच्या अगोदर मी विचार करीत होतों की आता ह्या असल्या अवस्थेंत मी कुणाकडे जाऊं, कोण मला लिंबाचा रस व थोडासा भात खाऊं घालेल ? पण नवल म्हणतात तें हेंच ! फार वेळ मला विचार करावा लागला नाही. हा माणूस आला व माझ्या सर्व चिंता दूर झाल्या. त्याने खूप काळजीपूर्वक मला उठविलें व हळूहळू आपल्या झोपडीकडे नेलें. गावाच्या टोकाला असलेल्या एका लहानशा झोपडींत तो राहत होता. मातीचीं चारपांच गाडगींमडकीं व एकदोन मोठे धोंडे ह्याशिवाय त्या झोपडींत कांहीहि चीजवस्तु नव्हती. माझ्यासाठी म्हणून त्याने थोड्या वेळाने कुठूनतरी एक लिंबू आणलें व झटपट थोडासा भात रांधून मला जेवूं घातलें. मी बरें होण्यासाठी त्याने कितीतरी कष्ट घेतले. मला तें पथ्यकर जेवण दिल्यावर त्याला बराच आनंद झाला. त्याच्या त्या अतिथि-सत्काराच्या आनंदाचें स्मरण झालें म्हणजे अजूनहि माझें हृदय एका स्वर्गीय भावनेने भरून जातें. त्या लहानशा, अवडंबरहीन झोपडींत माझ्यासारख्या किती असहाय पीडितांची सेवाशुश्रूषा यापूर्वी झाली असेल कुणास ठाऊक ! त्या साध्या झोपडीचें महत्त्व व तेथील पवित्रता माझ्या अंतःकरणावर दृढ अंकित झाली. तिचें तें स्वाभाविक सौंदर्य व त्या अद्‌भुत पुरुषाची नैसर्गिक उदारता व प्रिय वर्तन कायमचें माझ्या मनांत राहील. जेवायला दुसरें कोणतें भांडें नव्हतें. दगडाचे दोन पसरट तुकडे होते. त्यांवरच आम्हीं वाढून घेतलें व मोठ्या आनंदाने भोजन केलें.

**उन्मत्तवद्वापि च बालवद्वा—**

ज्याच्यामुळे ती उत्तरकाशींतील छोटीशी झोपडी एक अत्यंत पवित्र स्थान म्हणून माझ्या स्मृति-पटलावर कोरली गेली आहे त्या विशालहृदयी पुरुषाविषयी तेथील अल्पशा वास्तव्यांत मला जितकी माहिती मिळाली त्यावरून वाटतें की उत्तर-काशींतील सर्वसाधारण लोकांना या अद्भुत पुरुषाच्या मधुर अंतरंगाबद्दल विशेष माहिती नसावी. तेथील सर्वचजण त्याला वेडा समजत ! त्याचें मूळ राहणें उत्तरकाशीजवळील कोणत्याशा एका खेड्यांतलें. जातीनें ब्राह्मण असून, माणूस पाहायला देखणा होता. पण देहाकडे विशेष लक्ष पुरवलेलें दिसत नव्हतें. अंगाला तेलपाणी न पुरविल्यामुळे सर्व रया निघून गेली होती, व कपडेहि मळकट झालेले होते. तरीपण त्याच्या मुखावर एक वेगळेंच स्वाभाविक तेज दिसत होतें. त्याच्या चेहऱ्यावरून हसू एकसारखें ओसंडत असे, त्यामुळे पाहणाराला वाटावें की माणूस पागल आहे. मला तर वाटतें की, कुणींहि सहजासहजीं त्याला ओळखूं नये म्हणून तो तसलें वेड्याचें सोंग करीत असावा. सामान्य लोकांनी त्याला हिडीसफिडीस करावें, झिडकारावें व आपल्या अंतरंगाचा त्यांना ठाव लागूं नये अशी जणु त्याची प्रबळ इच्छा होती. स्वतः ब्राह्मण असून तो सर्वच जातींतील लोकांबरोबर प्रेमानें वागत होता व अडीअडचणींच्या प्रसंगीं सर्वांची सेवा करीत होता. तो अशी जातपात पाहत नव्हता म्हणून त्याचे स्वजातीय बांधव त्याला पागल म्हणत व त्याला जवळ करीत नसत. मला तर त्याच्या ठायीं वेडेपणाचें कोणतेंहि लक्षण दिसलें नाही. माझ्या दृष्टीनें तो जणु राखेंतील जळजळीत निखारा होता. इतर लोकांशीं बोलतांना तो मधूनमधून असंबद्ध

वाक्यें बोलून कधीकधी वेडेपणाचें सोंग आणी, पण माझ्याशीं बोलतांना एकदाहि त्याने तसें केलें नाही. इतकेंच नाही तर त्याचें सर्वच बोलणें सरळ व बोधप्रद होतें असें मला वाटलें.

असो तर, त्या लोकविलक्षण पागल माणसाच्या सेवा-शुश्रूषेने मी दोनतीन दिवसांतच खडखडीत बरा झालों. माझें तें आरोग्यधाम इतरांच्या दृष्टीने जरी एक यःकश्चित् खोपटें असलें तरी माझ्या दृष्टीला तें एक अत्यंत पवित्र व माहात्म्यपूर्ण स्थान वाटत होतें. तसल्या त्या रुग्णावस्थेंत माझ्याविषयी त्याला कुणीं सांगितलें ? त्या निर्मनुष्य ठिकाणीं जाऊन माझे प्राण वाचविण्यासाठी कुणीं त्याला एवढे कष्ट घेण्यास सांगितलें ? दुसऱ्याच्या दुःखाशीं समरस होऊन, अपरिचित अशा रुग्णाइतांच्या सेवेंत निर्हेतुक आनंद मानणाऱ्या त्या माणसाच्या अंतःकरणाची घडण सहृदय माणसेंच जाणूं शकतील, इतर नाही. माझीच म्हणून नव्हे तर इतर कुणाहि नवख्या यात्रेकरूची तो अशीच सेवा करीत असे व त्यांतच त्याला खूप आनंद वाटत असे. आपल्या भिक्षेचा मोठा भाग तो असाच इतरांच्याकरिता खर्च करीत असे व स्वतः अत्यंत थोडेसें खाऊन काळ कंठीत असे. आपणहून कोणीं प्रेमाने त्याला कांही दिलें की तेवढ्यावरच तो संतुष्ट होई. त्याच्या प्रशान्त व उदार चित्तावर दुसऱ्या कोणत्याहि वृत्तींचीं अभ्रें येत नसत.

### पर्णकुटींतील पुण्यानुष्ठान

अखेरीस मला कळून चुकलें की हा पागल समजला जाणारा माणूस साधारण नाही. एवढी प्रखर बुद्धिमत्ता, मनाचा एवढा मोठेपणा व असलें निर्व्याज प्रेम असणाऱ्या माणसाला पागल तरी कसें म्हणावें ? अगदी निर्विकारचित्ताने प्राणिमात्राची सेवा करून

ज्यांना महान् आनंदाची प्रतीति येते, अशांची 'पागल' इत्यादि शब्दांनी संभावना करणाऱ्या लोकांना काय म्हणावें तें मी अजूनपर्यंत ठरवूं शकलों नाहीं. निष्कांचन माणसाच्या अति सामान्य झोपडीमधे जी अतिथितत्परता, सहानुभूति, प्रेम, दिलदारपणा मला आजपर्यंत आढळला त्याच्या तुलनेने पाहतां, ऐश्वर्याने परिपूर्ण असलेल्या राजमहालांतहि ह्या गोष्टी मला अभावानेच जाणवल्या. अजूनहि ह्या हतभागी देशामधे लहान-सहान झोपड्याखोपटांमधून दररोज कुणाला न कळतां, निःशब्द-पणे जें कर्मानुष्ठान होतें त्याला दुसरीकडे कुठे तोड नाही. माझ्या भ्रमणामधे बऱ्याच ठिकाणीं याचें जाज्वल्य प्रत्यंतर मला आलें. इंद्रभुवनासारखे ऐश्वर्याचे आगर असलेले धनिकांचे भोगविलासपूर्ण मोठमोठे बंगले, बाजूच्या चंद्रमौळी झोपड्यांत तेवत असलेल्या माणुसकीच्या विमल, पुण्यमय ज्योतीपुढे निष्प्रभ झालेले मीं पाहिलेत. त्या गरिबांच्या झोपडीमध्ये ऐश्वर्य नसेल हें खरें, पण तेथे हृदय आहे, तेथे दुःखी माणसाचें दुःख जाणून घेणारे, व तें दूर करण्यासाठी मनापासून, निष्कपटभावें झटणारे लोक आहेत. दिलदार गरीब माणूस आपल्या संकुचित, जीर्ण पर्णकुटींत एका क्षणांत जेवढें पुण्यानुष्ठान करतो तेवढें आपल्या ऐश्वर्याचा गर्व असलेला धनिक, आपल्या प्रशस्त हवेलींत करूं शकत नाही हें सुप्रसिद्धच आहे. भारतीय आर्यपर्णकुटीच्या माहात्म्याने आम्ही अजूनहि जिवंत आहोंत.

प्रयागच्या परिसरांतील पर्णकुटींत राहणाऱ्या कंदमुळें व फळें खाणाऱ्या कौपीनधारी भरद्वाज मुनीने आपल्या तपः-प्रभावाने एकेकाळीं राममाता कौसल्या, भरत, शत्रुघ्न आणि अयोध्यानिवासी प्रजाजनांच्या सत्कारासाठी या भूलोकीं,

विपुल स्वर्गीय सुख व ऐश्वर्य निर्माण केलें होतें. कुरुक्षेत्रांतील उंछवृत्तिपरायण, भयंकर दुष्काळामुळे अनेक दिवसांच्या उपवासाने क्षीण झालेल्या दरिद्री ब्राह्मणाच्या पर्णकुटींत त्या दुष्काळांत मोठ्या मुष्किलीने एके दिवशीं मिळालेलें सर्व सातूचें पीठ अतिथीला देऊन अपूर्व आत्मबलिदानाने ज्या एका महान् यज्ञाचें अनुष्ठान झालें होतें व ज्या पर्णकुटीरूपी पवित्र यज्ञभूमींत गडबडा लोळण घेणाऱ्या मुंगसाचें अर्धांग कांचनमय झालें होतें, ज्या यज्ञापुढे महाराजाधिराज युधिष्ठिरांचा यज्ञहि फिका पडला होता, ज्या यज्ञाचा महिमा त्या मुंगसाने आपल्या वज्रगंभीर वाणीने महाराज युधिष्ठिरांच्या सभामंडपांतील सर्व लोकांना ऐकवून चकित केलें होतें, तसल्या यज्ञाची पुण्याई व तो तपःप्रभाव भारताच्या भाग्याने अजून लुप्त झालेला नाही. निष्कांचनांच्या पर्णकुटींचें हे माहात्म्य अजूनहि भारताचे प्राण पोशीत आहे. असो.

त्या गरीब माणसाने केलेल्या जिव्हाळ्याच्या शुश्रूषेने मी बरा झालों, परंतु अंगांत प्रवास करण्याइतपत बळ अजून आलें नव्हतें. तशा अवस्थेंत मी उत्तरकाशीहून टिहरीकडे जावयास निघालों हें पाहून माझ्या त्या उदारचरित जीवनदात्याच्या हृदयांत कालवाकालव होत असलेली मला स्पष्ट दिसत होती. आणखी दोनचार दिवस मी तेथे राहून, संपूर्णपणें बरा झाल्यावर व अंगीं थोडीशी शक्ति आल्यावरच यात्रेसाठी निघावें असें तो पुनः पुनः काकुळतीला येऊन म्हणूं लागला. माझ्या संकल्पित यात्रेचा अजून बराच मोठा भाग मला आक्रमावयाचा होता. तेव्हा हळूहळू चालूं लागणेंच उचित होतें. रस्त्यांत असा बसून राहिलों तर माझी यात्रा पूर्ण होणार नाही, आणि मला गेलेंच

पाहिजे असें बोलून मीं त्याला कसेंबसें समजाविलें व उत्तर-काशीहून पुढील मार्गाला लागलों. माझ्या मागेमागे तो देवतुल्य माणूस बऱ्याच दूरपर्यंत आला. त्याचें तें निर्हेतुक, निर्व्याज, निष्कपट प्रेम पाहून माझें हृदय कृतज्ञतेने भरून आलें व कोणत्या शब्दांनी मी त्याचे आभार मानूं, माझ्यावर अपरंपार उपकार करणाऱ्या त्या व्यक्तीचा मी कसा उतराई होऊं, ह्याचा विचार करूं लागलों. माझ्या मनांत चालू असलेले विचार त्याला कळले की काय कुणास ठाऊक एखाद्या लहान मुलासारखा तो बोलून गेला--"इकडे इतकी थंडी पडते, पण आजपर्यंत अशी घोंगडी (लुई) मीं आयुष्यांत कधी अंगावर घेतली नाही." त्याचे ते शब्द ऐकून मला बरें वाटलें. मीं माझ्या अंगावरील घोंगडी काढून त्याच्या अंगावर पांघरली. मनांत आलें, माझ्याजवळची एक सामान्य घोंगडी देऊन ह्या उदारचरित परोपकारी पुरुषाची एक छोटीशी इच्छा तृप्त करूं शकलों हें खरोखर माझें भाग्यच म्हटलें पाहिजे. आम्हीं परस्पराचा निरोप घेतला. मी पुढील वाट चालूं लागलों, तो तेथेच उभा राहून दूरपर्यंत माझ्याकडे पाहत होता. चालतां चालतां जसजसे माझ्या मनांत त्या पागल समजल्या जाणाऱ्या माणसाविषयी विचार येऊं लागले तसतसा तो एक प्रच्छन्न महापुरुष असावा असा माझ्या मनाचा निश्चय होऊं लागला. माझ्या लहानपणापासून मी ऐकत आलों होतों की, अनेक महापुरुषांना उन्मत्तासारखें आचरण करून लोकांत गुप्तपणें वावरणें आवडतें. उत्तरकाशींतील तो माणूस असल्याच कोटीतला नव्हता का ?

### पुन्हा आजारी

ह्या मधेच उपस्थित झालेल्या आजारामुळे उत्तरकाशींत माझे तीन चार दिवस मोडले. त्यानंतर तेथून टिहरीला

पोहोचावयास आणखी तीनचार दिवस लागले. उत्तरकाशीपासून धरासूपर्यंतचा गंगोत्रीचा रस्ता मीं पाहिलेला नव्हता. कारण जायच्या वेळेला धरासूहून गंगोत्रीला जाणारी पक्की सडक सोडून मी दुसऱ्याच वाटेने यम्नोत्रीला गेलों होतों व तेथून उत्तरकाशीला येऊन मग मीं गंगोत्रीचा रस्ता धरला होता. आता, या परतीच्या वाटेवरील विशेष उल्लेख करण्यासारखी कोणतीहि गोष्ट मला आठवत नाही. टिहरीला पोहोचल्यावर पुन्हा एकदा मला आमांशाने झपाटलें. मला वाटतें, पूर्णपणें बरें न होतां मी पुन्हा त्या पर्वतमय प्रदेशांत भ्रमण सुरू केलें होतें म्हणून ह्या दुखण्याने हा दुसऱ्यांदा तडाखा दिला होता. टिहरीलादेखील असाच एक ब्राह्मण युवक माझ्या साहाय्याला आला आणि निर्विकारचित्ताने माझी सेवाशुश्रूषा करून या संकटाचें वेळीं त्याने मला बरेंच उपकृत केलें. येथेहि दोनतीन दिवसांपेक्षा जास्त दिवस मला राहावें लागलें नाही. गंगोत्रीहून मीं जें शिशी भरून गंगाजल आणलें होतें, तें टिहरींतील एका बंगाली सरकारी नोकरामार्फत कलकत्त्यांतील आमच्या वराहनगर मठाकडे श्रीठाकुरांच्या (भगवान श्रीरामकृष्णांच्या) पूजेकरिता पाठवून दिलें.

### चंद्रवदनी देवीच्या वाटेने

टिहरीहून मी चंद्रवदनी देवीच्या दर्शनासाठी निघालों. रस्ता निबिड अरण्यांतून होता. रस्त्याने क्वचित् इकडील मुलखांतील कोणी माणूस भेटला की त्याला मंदिराविषयी विचारूं लागलों. अशा रीतीने जवळ जवळ सगळा दिवस चालल्यावर साधारणतः तिसऱ्या प्रहरीं, मंदिराच्या कळसाप्रमाणे उंच दिसणाऱ्या व घनदाट राईंनी परिवेष्टित असलेल्या गिरिशिखराच्या पायथ्याशीं

मी येऊन पोहोचलों. या शिखराच्या माथ्यावरच चंद्रवदनी देवीचें मंदिर आहे.

आईच्या या देवळासाठीच जणु हिमालयाचें हें शिखर अत्यंत विलक्षण रीतीने सुसज्जित झालें आहे असें वाटलें. भोवतालच्या पर्वतांच्या रांगांपासून ह्या शिखराचें अस्तित्व अगदी वेगळें असें आहे. पाहतां पाहतां मनांत येतें की हा भाग्यशाली नगाधिराज हिमालय आपल्या एका शिखरावर जगदंबेला मोठ्या दिमाखाने धारण करून स्थिर असा उभा आहे व आपलीं इतर अनेक मस्तकें भक्तिभावाने तिच्यापुढे नमवून नानाविध फलपुष्पांनी तिची नित्य पूजा केल्यामुळे धन्य होत आहे. हें शिखर पायथ्यापासून थेट वरपर्यंत सुळक्याप्रमाणे हळूहळू निमुळतें होत गेल्यामुळे आणि भोवतालच्या पर्वतराजीपासून अलग उभें असल्यामुळे जगदंबेच्या ह्या नैसर्गिक मंदिराची शोभा अधिकच मनोज्ञ वाटते.

### हिमालयाचें गाढ मौन !

ह्या पर्वताच्या पायथ्याशीं असलेल्या एका गावांत मी येऊन उपस्थित झालों. पाहतों तों गावांतील सर्व रहिवासी मुसलमान. हिमालयांतील संपूर्ण गढवाल जिल्ह्यामधे हें एवढेंच एक मुसलमानांचें गाव दिसलें. पहाडी बायांना लागणाऱ्या लाखेच्या बांगड्या करणें हें यांच्या उपजीविकेचें एकमात्र साधन. गावांत एक सुद्धा हिंदूचें घर नव्हतें. पायथ्याच्या ह्या गावांतून निघून सरळ शिखर गाठणें शक्य होतें. पण तें कसें जमावें ? कारण योग्य रस्त्याशिवाय त्या दुर्गम ठिकाणीं पोहोचणें सुतराम् अशक्य होतें. योग्य रस्ता कांहीकेल्या सापडेना. अखेरीस मी शिखराला प्रदक्षिणा घालूं लागलों व अचानक वर जाणारी

१०७६४५१

एक वाट आढळली. त्या वाटेने वर वर जात मंदिरापर्यंत येऊन पोहोचलों, तेव्हा सायंकाळचा सुमार होता.

वर येऊन पोहोचल्यावर लक्षांत आलें की जगन्मातेच्या ह्या मंदिरासाठीच जणु ह्या उंच शिखराचा अग्रभाग सपाट केला गेला आहे; जगन्माता चंद्रवदनी देवीच्या अधिष्ठानासाठीच जणु सर्व प्रकारें मंदिराला उपयोगी होईल अशा या गिरिशृंगाची निर्मिति झाली आहे व पोहोचतांक्षणीं मनाला जाणवलें की नित्य कोलाहलपूर्ण असलेल्या आणि नाना संकटांनी गांजलेल्या नरलोकाच्या मी खूपच वर येऊन ठेपलों आहें. येथे पृथ्वीवरील कोणताच कल्लाहल्ला ऐकूं येत नाही. सारें कसें निःस्तब्ध ! शांत ! तेथे जणु चराचराने अनंत असें मौनव्रत धारण केलें आहे. जो कोणी येथे येईल त्याचें हृदय या गभीर, निःस्तब्ध भावनेमधे विलीन होऊन जाईल. येथून हिमालयाच्या दिगन्त विस्ताराचें सुविशाल दृश्य अवलोकन केल्यावर माझा श्रमपरिहार होण्यास क्षणाचाहि विलंब लागला नाही. जिकडे पाहावें तिकडे हिमालयाची विराटमूर्ति नभोमंडलांत आपल्या असंख्य शिरांसह विहार करीत, जणु द्युलोक भूलोक व्यापून उभी ठाकलेली आहे. उत्तरेकडील अपरंपार व अगम्य अशा शुभ्र हिमराशि आपल्या धवल स्मिताने अनन्ताचा महिमा व्यक्त करीत आहेत. त्या शुभ्र, ज्योतिर्मय, सुविशाल हिमराशींपासून असंख्य किरणें प्रसृत होऊन जणु साऱ्या भूमंडळाला उजळून टाकीत आहेत. अनंतभावमय ह्या चिरंतन हिमराशीच्या ठायीं किती अपार सौंदर्य घनीभूत झालें आहे ! येथे सर्वत्र निःस्तब्ध! कुणाचाहि किंचित् देखील शब्द ऐकूं येत नाही. जणु सारी सृष्टि एका अनंताच्या ध्यानांत समाधिस्थ झाली आहे. त्या अनंताच्या

ध्यानीं लीन झाल्यामुळे जणु स चीच वाचा कुंठली आहे. हिमालयाच्या या विराट अनंतरूपिणी महामायेचा असला आविर्भाव पाहून मला धन्य वाटलें.

### देवीच्या मंदिरांत

मंदिरांत प्रवेश करण्याअगोदर एकदा चोहोकडे दृष्टिक्षेप करून शोभायुक्त अशी हिमालयाची विराट मूर्ति अंतःकरणांत साठवून घेतली. त्यानंतर मंदिरांत शिरून महामायेच्या अनंत महिम्याचें स्मरण करीत करीत तिच्या चरणांवर मस्तक ठेवलें. येथे जगन्मातेचें एक 'यंत्र' प्रतिष्ठित केलें आहे. त्याचीच पूजा-अर्चा होते. इतर कोणती मूर्ति नाही. मंदिर दगडाचें बांधलेलें असून खूपच ठेंगणें व छोटेसें आहे. मंदिराच्या मागील बाजूस यात्रेकरूंना राहण्यासाठी आणखी एक छोटेसें घर आहे. असल्या या उत्तुंग गिरिशिखरावर वारा इतका सोसाट्याने वाहतो की जणु प्रकृतीचा येथील महानिःस्तब्धभाव वायुदेवांना असह्य होत आहे असें वाटावें. जणु हिमालयाची ही अनंत समाधि भंग करण्यासाठी वायुदेव नेहमी व्यग्र असतात. चंद्रवदनीदेवीच्या या शिखरावर वाऱ्याचा वेग इतका प्रबळ असतो की त्या उघड्या शिखरावर उभें राहणेंहि भीतिदायक वाटतें. एखाद्या वावटळीबरोबर कुठच्या कुठे उडून जाऊं असें वाटतें. अर्थातच असल्या उंच गिरिशिखरावर मोठें देवालय बांधणें संपूर्णपणें अशक्य असें आहे. हें उंच शिखरच जणु ब्रह्माण्डनायिका, अनंतशक्तिरूपिणी जगज्जननी महामायेचें एक मंदिर आहे.

प्रकृतीने निर्माण केलेल्या असल्या सुविशाल व निसर्गशोभायुक्त गिरिमंदिरांत मनुष्यनिर्मित शिल्पकलेला व कोरीवकातीवपणाला मुळीच वाव नसतो. आणि म्हणूनच अनेक

तीर्थस्थानें असलेल्या या डोंगराळ भागांतील मंदिरांमधे मनुष्यकृत शिल्पनैपुण्य वा अन्य प्रकारचा कृत्रिम रेखीवपणा विशेषकरून आढळत नाही. ज्या महाशक्तीच्या निव्वळ लेशमात्राच्या आश्रयाने माणूस शक्तिशाली आणि गुणशाली बनत असतो, ज्या महाशक्तीच्या एका कटाक्षानें अनंतकोटी विश्वब्रह्माण्डें क्षणाक्षणाला प्रकट होतात, ती महाशक्ति प्रकृति असल्या निर्जन स्थळीं आपलें मंदिर आपणच रचून आपल्या मनाप्रमाणे सजविते तेव्हा तिथे मानवाचें कलाकौशल्य, शिल्पचातुर्य व विद्याबुद्धि सर्वच लय पावतात. म्हणूनच मला वाटतें की, दाक्षिणात्य लोकांनी व आर्यावर्तातील हिंदु व बौद्ध धर्मीयांनी आपआपल्या उपास्य देवदेवतांच्या मंदिररचनेंत जेवढे श्रम घेऊन मानवीय शिल्पनैपुण्याचा व कलाकौशल्याचा परमोत्कर्ष साधला तेवढे श्रम त्यांनी इकडील पर्वतमय प्रदेशांतील निसर्गसुंदर मंदिरें सजविण्यांत घेतले नाहीत. असो.

### निःशब्दतेचा भंग

मी मंदिरांत प्रवेश करून थेट जेथे पुजारी महाराज जगन्मातेच्या नैवेद्याची तयारी करीत होते तेथे जाऊन बसलों. मंदिराचा आंतील भाग दोन खणांचा आहे. एकीकडे फक्त मंदिर व दुसरीकडे मुदपाकखाना व पुजारी ब्राह्मणाचें राहण्याचें ठिकाण. पुजारी महाराजाखेरीज त्या वेळीं तेथे दुसरें कुणी नव्हतें. मी तेथे पोहोचल्यावर थोड्याच वेळांत एक पाहाडी माणूस घडाभर पाणी घेऊन आला. हा देवीचा एक पाहरेकरी होता. पुजारी महाराजांना साहाय्य करण्यासाठी म्हणून त्याला नेमलें होतें. तो रोज टेकडीच्या पायथ्याशीं जाऊन, नैवेद्याचा स्वयंपाक करण्यासाठी पाणी घेऊन येत असे व पूजेसाठी इतरहि

चिल्लर कामें करून देत असे. असो तर, एव्हाना आम्ही तिघेजण त्या दुर्गम, एकाकी, अशा उत्तुंगगिरिशिखरावर एकत्र येऊन कांही क्षण परस्परांशीं बोलल्यामुळे मर्त्यलोकाचें अस्तित्व क्षीणपणें त्या नीरवतेंत जाणवूं लागलें; तिघेजण एकत्र मिळाल्यामुळे पुन्हा आपण माणसांत येऊन पडल्यासारखें वाटूं लागलें. त्या गभीर निःस्तब्धतेंत, आम्हां तिघांच्याच कंठांतून निघत असलेले शब्द एकमेकांच्या कानांवर पडत होते. पुजारी महाराज नैवेद्याची तयारी करूं लागले व मी त्यांना चंद्रवदनी देवीबद्दल माहिती विचारूं लागलों.

### कांही आख्यायिका

त्या पुजारी ब्राह्मणाकडून व नंतर त्या प्रदेशांतील इतर ब्राह्मणपंडितांच्या कडूनहि ऐकलें की 'सती'चें वक्षःस्थळ ह्या ठिकाणीं पडलें होतें. मंदिरांत प्रवेश केल्यावर मला आढळून आलें होतें की गाभाऱ्याचा वरील भाग एका मोठ्या चांदव्यानें संपूर्णपणें आच्छादिला आहे. असें ऐकलें की देवीचें मूळ यंत्र कोणी पाहूं शकत नाही, तें नेहमी चांदव्यामुळे झांकलेलें असतें. बदलतांना देखील प्रथम नवा चांदवा टांगतात व नंतर जुना ओढून घेतात. लोकांमधे असा समज आहे की भगवान श्रीशंकराचार्य यांनी या महान् पवित्र स्थळीं येऊन देवीचें प्राचीन मूल यंत्र लोकांच्या नजरेस पडणार नाही असें केलें व हल्लींचें नवीन यंत्र प्रतिष्ठित करून जुनें यंत्र कुणी पाहूं नये असा आदेश दिला. तेव्हापासून म्हणे मूळ यंत्र कुणी पाहूं शकत नाही. असेंहि ऐकलें की जर कुणी अचानकपणें तें यंत्र पाहिलें तर तो ताबडतोब मरण पावतो. हा समज केवळ येथेंच आहे असें नाही. देवीच्या बहुतेक पीठस्थानीं हा लोकप्रवाद आढळून येतो की मूळ पीठाचें कुठेच

दर्शन होत नाही व यदाकदाचित् झालेंच तर मृत्यूचें भय असतें. चंद्रवदनी देवीचें हें पर्वतशिखर गढवालमधील टिहरीराज्याच्या सीमेमधे येतें. देवीच्या पूजेची व्यवस्था फार जुन्याकाळापासून टिहरीच्या राजांनी करून ठेवली आहे. या पर्वतशिखराच्या जवळच पूजार नांवाचें एक गाव आहे. देवीची पूजा तेथल्याच ब्राह्मणाकडे असते. टिहरीच्या राजांनी, या गावचें उत्पन्नहि पुजारी ब्राह्मणालाच वंशपरंपरागत दिलेलें आहे. म्हणून या गावांतीलच ब्राह्मण देवीची पूजा करतात. देवीच्या पहारेकरी सेवकांनाहि वेतन मिळतें.

**महाराज, आता बाहेर व्हा.**

इकडे आईच्या नैवेद्याची तयारी चालली होती, आणि आमचें बोलणेंहि चाललें होतें. बोलतां बोलतां मला बऱ्याच गोष्टी कळून आल्या. त्यानंतर रात्रीं नऊ वाजायच्या अगोदर पूजा, आरती व नैवेद्य वगैरे पार पडलें. येथे दररोज पाटचावर तांदूळ वाटून तो तेलांत परतून आईला नैवेद्यादाखल देण्यांत येतो देवीला हाच पदार्थ विशेष प्रिय कां याविषयी पुजारी ब्राह्मणहि मला कांही सांगू शकला नाही. तांदुळाचा वाटलेला गोळा, पोळचा व थोडेसें दूध असा नैवेद्य झाला. त्या रात्रीं महामायेचा तो प्रसाद भक्षण करून मी संतृप्त झालों. तांदुळाच्या पोळ्याचा तसला प्रसाद इतका रुचकर लागेल याची मला कल्पना नव्हती. असो. महामायेच्या प्रसाद-भोजनानंतर मी संतुष्ट चित्ताने बसलों होतों. थोडचा वेळाने पुजारी महाराज माझ्या-जवळ आले व मोठचा नम्रपणें म्हणाले की, "आता झोपण्यासाठी तुम्हीं बाहेरील धर्मशाळेंत जावें." त्यांच्याच तोंडून पुढे ऐकलें की, कांही दिवसांपूर्वी एक साधुवेष धारण केलेला यात्रेकरू तेथे

आला होता, व रात्रीं सर्व सामसूस झाल्यावर, टिहरीच्या राजानें दिलेलीं पूजेचीं चांदीचीं उपकरणें मंदिरांतून चोरून घेऊन त्यानें य:पलायन केलें होतें. ह्या घटनेच्या अगोदर साधुसंन्यासी यात्रेकरूंना रात्रभर मंदिरांत राहूं देत असत. पण ही चोरी झाली तेव्हापासून पुजारी ब्राह्मण व पहारेकरी सेवक यांच्याशिवाय मंदिरांत रात्रीचें कोणाला राहूं देत नाहीत. ती रात्र अर्थातच मला एकटयाला बाहेरील धर्मशाळेंत काढावी लागली.

स्निग्ध, विमल ज्योत्स्नामय रात्रीच्या वेळीं हिमालयाचें जें अद्भुत दृश्य नयनगोचर होतें, व त्या अदृष्टपूर्व मनोरम दृश्याच्या अवलोकनानें मनांत ज्या विस्मयाच्या व उत्कट आनंदाच्या ऊर्मि उठतात त्या लिहून प्रकट करतां येत नाहीत. मी मंदिराच्या बाहेर आलों व चांदण्यारात्रीचें हिमालयाचें तें प्रशान्त व पवित्र रूप पाहत पाहत, ती समस्त रात्र मी महामायेच्या कृपेनें मोठ्या आनंदांत घालविली. त्यानंतर दुसऱ्या दिवशीं पूर्वीप्रमाणेच आईची पूजा पाहिली व प्रसाद भक्षण केला. आदल्या दिवसापासून, पुजारी व पहारेकरी यांच्याशिवाय इतर कुणीहि मंदिराकडे आलेलें मला आठवत नाही. तिसऱ्या प्रहरीं मी जेथून पूजेअर्चेसाठी पाणी आणतात त्या टेकडीखालील ओहोळापर्यंत एकवार फिरायला म्हणून जाऊन आलों. हा ओहोळ मंदिरापासून बराच खाली आहे. मी दोन रात्रीं ह्या ठिकाणीं काढल्या व मग श्रीनगरकडे जाण्याचा विचार करूं लागलों. चंद्रवदनी देवीच्या परिसरांत फक्त दोन रात्रीं थांबण्यानें माझें मुळीच समाधान झालें नव्हतें. सगळ्या गोष्टींची सोय असती तर मी आणखी कांही दिवस तेथे राहिलों असतों. परंतु त्या तसल्या दुर्गम ठिकाणीं एक दोन दिवसांपेक्षा अधिक काळ ठेवून घेण्यास देवळांतील लोक असमर्थ

होते. एकदोन साधुसंन्याशांचा फार तर दोन एक दिवस आईचा थोडाबहुत प्रसाद देऊन पुजारी अतिथिसत्कार करूं शकतात. असल्या दूरच्या ठिकाणीं एक दोन दिवस राहणेंहि कष्टाचेंच असतें. पुजारी ब्राह्मण मोठ्या प्रयासाने एवढ्या लांबच्या ठिकाणाहून पूजेचें थोडेंबहुत सामान आणतात आणि पूजा चालू ठेवतात. माझी खूप इच्छा असूनहि ह्या अडचणींमुळे मी तेथे जास्त दिवस राहूं शकलों नाहीं. भगवती देवीच्या चरणीं प्रणाम केला व तुझ्या दर्शनासाठी मला पुन: कधीतरी येथे घेऊन ये अशी प्रार्थना केली. दिवसाकाठी दोन दोन घांस जरी मला मिळाले असते तरी मीं आणखी दोन चार दिवस चंद्रवदनी देवीच्या या मंदिरांत काढले असते.

**महामायेचा निरोप घ्यावा लागला.**

परंतु काय करूं ? दुसरा उपाय नव्हता म्हणून इच्छा नसतांनाहि 'पुन: कधीतरी येईन' असें म्हणत आईचा निरोप घ्यावा लागला. पुजारी ब्राह्मणाने, तेथून श्रीनगरला जाण्याचा मला सल्ला दिला. कारण श्रीनगरला पोहोचल्यावर तेथून पुढे केदार बद्रीनारायणाचा रस्ता पकडतां आला असता. चंद्रवदनी देवीच्या मंदिरापासून श्रीनगर म्हणजे एका दिवसाचा रस्ता. निबिड अरण्यांतील पायवाटेने जवळजवळ अर्धा दिवस चालल्यावर मग टिहरी ते श्रीनगर ही पक्की सडक लागते. पुजारी महाराज मंदिर सोडून थोड्या अंतरापर्यंत माझ्याबरोबर आले व पहाड उतरण्याची एक वाट त्यांनी मला दाखविली आणि दूर दिसणाऱ्या त्यांच्या गावाकडे बोट दाखवून ते म्हणाले की त्या गावापर्यंत एकदाचें पोहोचल्यावर मग पुढे तुम्ही सुखरूपपणें श्रीनगर गाठूं शकाल.

### वाट चुकलों

निर्मनुष्य असें तें किर्र घनदाट जंगल व जवळजवळ बुजलेली अशी ती निरुंद पायवाट पाहून मला वाटलें की आता आपण रस्ता चुकणार ! आणि थोडें अंतर चालून जातों न जातों तों झालें तसेंच. चंद्रवदनी देवीच्या शिखरापासून ज्या पूजार गावच्या अनुरोधाने मी निघालों होतों, आता त्याचा मागमूसहि दिसत नव्हता. हळूहळू मी एका घनघोर अरण्यांत शिरत होतों. चारहि बाजूंनी दाट झाडी, भर दुपारीं देखील सूर्यप्रकाशाला अवसर नाही. पुढे पुढे तर वाटसुद्धा दिसेनाशी झाली. संपूर्णपणें अपरिचित व जावयास कठीण अशी त्या पर्वतमय मार्गाने आणखी पुढे जाण्याचें साहस माझ्याने होईना. अजून मी मंदिरापासून विशेष खाली उतरलों नव्हतों. कोणत्या दिशेने गेल्यास मला बरोबर वाट मिळेल हें ठरवूं न शकल्यामुळे मी तेथेच बसून राहिलों.

पाहा या जागेचा महिमा ! चारहि बाजूंनी संकटांनी वेढला होतों, वाट सापडत नव्हती, तरी निराशेचा सुस्कारा कांही माझ्याने सोडवत नव्हता. जें ठिकाणच मुळी स्वर्गीय, त्याच्या कोणत्याहि भागांत व कोणत्याहि अवस्थेंत स्वर्गसुखच मिळणार. असो. जवळ जवळ एक तास मी तेथे नुसता पहुडलों होतों. मला वाटलें होतें की रस्ता कुणालाहि विचारून घेऊं. कुठे अडून पडावें लागणार नाही. माझी अशी धारणा होती म्हणून प्रथम थोडा वेळ मला विशेष कांही वाटलें नाही. पण एक तास होऊन गेला तरी असा एकहि माणूस माझ्या दृष्टीला पडला नाही की ज्याला वाट विचारून मी पुढे गेलों असतों.

## जय देवी जगदंबे

तेव्हा आता दुसरा उपाय नाही असें पाहून 'जय देवी जगदंबे' म्हणत मी उठलों व आपल्याच मनाने समोर चालूं लागलों. तसतसें आजूबाजूचें जंगल दाट होऊं लागलें होतें. एका मोठ्या पहाडाचा उतार सुरू झाला होता. पहाडावर चढण्यापेक्षा उतरणें जास्त कठीण व धोक्याचें असतें. ज्यांनी असल्या पर्वतमय प्रदेशांत प्रवास केला आहे त्या सर्वांना माहीत असेल की पर्वत चढतांना माणसाचा स्वत:वर पूर्ण ताबा असतो, पण उतरतांना मात्र फार सांभाळून सांभाळून उतरावें लागतें. तेव्हा स्वत:च्याच पायावर स्वत:चा जणु ताबा नसतो.थोडा जरी तोल गेला तरी माणूस गडगडा लोळत खाली येतो. हिमालयांतील उंच बर्फमय डोंगर चढतांना व उतरतांना कोणकोणत्या गोष्टी ध्यानांत ठेवावयाच्या तें मी पुढे ओघाओघाने सांगणारच आहें.

पाहाडांच्या चढावाला व उतरणीला ही तर नुसती सुरुवात झाली होती. केदारनाथ व बद्रीनाथला जाईपर्यंत आणखी कितीतरी चढावें उतरावें लागणार होतें. असो. ह्या क्षणीं मात्र मी त्या भीषण जंगलामध्ये कुठेतरी चाललों होतों. त्या प्रचंड पर्वताच्या ज्या भागाने मी उतारावर लागलों होतों तिकडे माणसांच्या पावलांच्या खुणा अजीबात दिसत नव्हत्या. अशा रीतीने अनंतप्राणिमात्रांचा एकमात्र नियंता जो भगवान् जिकडे मला नेत होता तिकडे मी मुकाट्याने चाललों होतों. हळूहळू उतार तीव्र स्वरूप धारण करूं लागला. तसल्या त्या उतरणीवरून पुढे जाणें अशक्यप्राय वाटूं लागलें. पाय कांही सरळ पडेनात. उतार भयंकर होता. पण त्यांतल्या त्यांत समाधान एवढेंच की पर्वताचें इकडील अंग शिलाखंडाचें नव्हतें.

माती नरम होती व गवत वाढलेलें होतें. अधूनमधून लहानलहान झुडपेंहि होतीं. मी पाठीवर भार देऊन, नरम मातींत पाय रोवीत रोवीत, आजूबाजूच्या गवताला व झुडपांना पकडीत जवळ जवळ दोन तीन मैल खाली येऊन पोहोचलों.

### अरण्यांतून सुटलों

केवढें कठीण ठिकाण ओलांडून आलों ह्याची सांगून कल्पना यायची नाही. डोंगराळ भागांतील कांही कांही कठीण जागांवरून जाणारा पांच सात मैलांचा रस्ता आक्रमावयाचा म्हणजे संपूण दिवस मोडतो. असो. अशा रीतीने त्या जंगलांतून बाहेर पडून दोन प्रहरीं एका सपाट पठारावर येऊन ठेपलों. समोरच इकडील मुलखांतील एक किसान आपल्या लहानशा शेताच्या एका कोपऱ्यांत आगटी पेटवून ओंब्या भाजीत होता. अर्धपक्व गव्हाचीं कणसें गवतपत्तीच्या आगटींत भाजलीं म्हणजे त्याला ओंब्या म्हणतात. यव व गहूं पिकायला सुरुवात झाली म्हणजे ओंब्या भाजून खाण्याची धूम सुरू होते. बायामाणसें, चिल्लींपिल्लीं सर्व मिळून ओंब्या खाण्यासाठी शेतांत जमा होतात, व ताज्या ताज्या ओंब्या भाजून, हातांवरच चोळून, फुंकून, पुढचांत ठेवून खात बसतात. वर्षांतून एकदाच लाभणारी ही नव्हाळी खातांना त्यांना खूप आनंद होतो. पाहाड उतरतांना काटच्यागोटच्यांमुळे पायांना ओरखडे व लहानसहान ठेचा लागण्यापलीकडे मला विशेष कांही झालें नव्हतें. तसल्या भयंकर जंगलांतून असल्या निर्भय ठिकाणीं येऊन पोहोचल्यामुळे व समोरच पोटपूजेचें साहित्य दिसल्यामुळे मला बरें वाटलें. वाटचालीच्या श्रमांत भूक लागली की नाही तें ध्यानांत आलें नव्हतें. पण थोडासा विसावा घेतों न घेतों तोंच लक्षांत आलें की 'दुपार झाली आहे व आपला

जठराग्निहि झळाळून पेटला आहे. कांहीतरी आहुति द्यायला पाहिजे.' किसान भाई आपला तन्मयतेनें ओंब्या भाजीत होता. मी जाऊन त्याच्या समोर उभा राहिलों. मला अकस्मात् समोर पाहतांच तो एकदम दचकला, व कांही क्षण अत्यंत विस्मयाने माझ्याकडे पाहूं लागला. त्यानंतर पहाडी भाषेंत मी कोठून व कसा आलों याविषयी तो मला विचारूं लागला. मी चंद्रवदनी देवीच्या मंदिराहून तेथे आलों असें सांगिल्यावर तर त्याच्या आश्चर्याला पार राहिला नाही.

### निरक्षर किसानाचा भक्तिभाव

त्याच्या त्या विशेष विस्मयाचें कारण हें की, इकडील मुलुखांतील व्याध-पारधी जमातीचे, शिकारीवर उपजीविका करणारे लोकहि त्या दुर्गम अरण्यांत प्रवेश करण्यास धजावत नसत. चंद्रवदनी देवीच्या मंदिराकडून त्या किर्र अरण्यांतून कुणी आजपर्यंत आलेलेंहि त्याला माहीत नव्हतें. म्हणूनच "धन्य आई चंद्रवदनी देवी" असें पुन:पुनः भक्तिपूर्वक अंतःकरणाने तो म्हणूं लागला. "माई चंद्रवदनी देवीने तुमचा हात धरून त्या घोर पाहडी कड्यावरून तुम्हांला उतरविलें नसतें तर तुम्ही कांही येथपर्यंत येऊं शकलां नसतां" असेंहि तो म्हणाला. त्याचा एकूणएक शब्द आता मला खरा वाटूं लागला. कारण मीं पाहिलें की कितीतरी वेळां असल्या संकटांत पडलों असतांना, नि:सहायांचा सहायक, आपला सगळयांत जवळचा असा कुणीतरी माझ्या मागे राहून माझें नेहमी रक्षण करीत असे. तसें जर माझें रक्षण होतें ना तर असल्या बहुविध आपत्तींतून मी निभावलों नसतों आणि आज तुम्हांला ही जी भ्रमणकथा सांगतों आंहें ती सांगूं शकलों नसतों. मी अशा रीतीने किती वेळां

कितीतरी मोठमोठ्या संकटांत सापडलों व केवळ भगवंताच्या अपार कारुण्यामुळे माझी सुटका होत गेली. या सर्व घटनांपैकी सांगतां येतील तितक्या सांगण्याचा मी प्रयत्न करीन. असो. त्या निरक्षर, पहाडी किसानाच्या तोंडून निघालेले भक्तिविश्वासाचे ते शब्द ऐकून माझें हृदय उचंबळून आलें व वाटूं लागलें की यापेक्षाहि घोरतर संकटांत सापडलों तरी भगवान माझें रक्षण करील. त्यानंतर किसानभाईने थोड्या ओंब्या खाण्यास दिल्या. तेव्हां त्या खाऊन मी पाणी प्यालों व किंचित् आराम केला. मग त्याच्याकडून श्रीनगरला जाण्याचा रस्ता विचारून घेतला.

### श्रीनगरकडे

तेथून मग पुनः रानवाटेनेच पुढे निघालों. साधारणपणें दोन तास चाललों असेन. त्यानंतर टिहरी ते श्रीनगर जाणारी सडक लागली. चांगला प्रशस्त व सपाट असा हा राजमार्ग सापडल्यावर मी अगदी निर्धास्तपणें चालूं लागलों. संध्याकाळला मी श्रीनगर येथे येऊन पोहोचलों. इतक्या दिवसांनंतर पुनः माणसांनी गजबजलेल्या ठिकाणीं आलों होतों. संस्थानी गढवाल विभागांत यम्नोत्री ते गंगोत्रीपर्यंत मी आतापर्यंत फिरलों होतों. पण टिहरी सोडून, दुकानें वगैरे असलेलें असें कोणतेंहि गाव वा शहर मला आढळलें नव्हतें. आता मी इंग्रजांच्या हद्दींतील प्रमुख शहरांत येऊन ठेपलों होतों. अलकानंदा ओलांडल्यानंतर ब्रिटिश हद्द सुरू होते. अलकानंदेच्या पश्चिम भागांत संस्थानी गढवाल आहे व पूर्वेकडील बाजूला ब्रिटिश गढवाल. अलकानंदेच्या तीरावर श्रीनगर उत्तरदक्षिण असें पसरलें आहे. इंग्रजांच्या आगमना-अगोदर श्रीनगर गढवाल राज्याची राजधानी असून एक समृद्धिशाली शहर होतें. अजूनहि लोकसंख्येच्या व व्यापारउदीमाच्या

बाबतींत श्रीनगर संपूर्ण गढवालमधे आघाडीवर आहे. गढवाल विभागाची मुख्य कचेरी पौडी येथे आहे. हें ठिकाणहि श्रीनगरला लागूनच आहे. अर्थातच श्रीनगर हें सर्व दृष्टींनी राहण्यास योग्य स्थळ झालें आहे आणि म्हणूनच पर्वतपायथ्याकडील बरेच लोक व्यापारधंद्याच्या निमित्ताने येथे येऊन राहिल्यामुळे या नगराची भरभराटहि झाली आहे. बद्रीनाथाच्या यात्रेसमयीं भारताच्या निरनिराळ्या प्रांतांतून आलेल्या यात्रेकरूंमुळे हें ठिकाण फुलून जातें व बदरिकाश्रमाच्या वाटेवर श्रीनगरलाच लोकांचा असा मोठा मेळावा आढळतो. श्रीनगरच्या सभोवती असलेले डोंगर तितके उंच नाहीत. प्रमुख बाजारांतून एक प्रशस्त असा दगडी रस्ता गेला आहे. त्याच्या दोन्ही बाजूंना मोठमोठ्या दगडी इमारतींच्या रांगा असून सर्वप्रकारच्या सामानांचीं दुकानेंहि आहेत. बाजाराच्या एका टोकाहून दुसऱ्या टोकापर्यंत जायला विशेष वेळ लागत नाही. श्रीनगरच्या दक्षिण दिशेस अलकानंदेच्या तीरावर कृष्ण-पाषाणांनी बांधलेला जुन्या गढवाल राज्याचा भग्न प्रासाद पाहिला. या विशाल राजप्रासादाची प्रत्येक भव्य शिला प्राचीन भारतांतील स्थापत्यकलेच्या कौशल्याची साक्ष देत आहे. एकेक शिला आकाराने भली मोठी असून तीवरील नक्षीकाम पाहण्या-सारखें आहे. त्या प्रचंड शिळा एकमेकींवर अशाकांही संगतीने रचल्या आहेत की पाहणारा विस्मयचकित होतो. हा भग्न प्रासाद स्वतंत्र गढवाल राज्याच्या अस्तंगत वैभवाचा निदर्शक आहे. असल्या मोठमोठ्या दगडांनी बांधलेल्या सुंदर व उंच इमारती मीं समस्त गढवाल व कुमाऊं विभागांत इतरत्र कुठेहि पाहिल्या नाहीत. येथे एक सरकारी मायनर स्कूल व इस्पितळ आहे. मी श्रीनगरला येऊन पोहोचल्यावर प्रथम अलकानंदेंत स्नान केलें व त्यानंतर कमलेश्वर मठाकडे गेलों.

### कमलेश्वर मठांत—

श्रीनगर येथील कमलेश्वर महादेवाचें मंदिर अति प्राचीन व विख्यात आहे. मठाचे महंत दयालपुरी यांच्या मुलाची, हृषीकेशहून डेहराडूनला जातांना ओळख झाली होती. मी श्रीनगरला पोहोचल्यावर त्याच्याकडेच मठांत उतरण्याविषयी त्याने तेव्हा मला विनंती केली होती. आता येथे आल्यावर मला त्या गोष्टीचें स्मरण झालें व कमलेश्वर मठांत जाऊन प्रथम देवाचें दर्शन घेतलें व नंतर महंताच्या मुलाला भेटलों. त्याने माझ्या आदरसत्कारांत कांही कमी पडूं दिलें नाही. कमलेश्वर देवाची स्थावर जमीन वगैरे व इतर उत्पन्न आहे. त्यांतून मनांत आणल्यास महंतजी आपल्या संप्रदायांतील लोकांचें वा इतर लोकांचें पुष्कळ भलें करूं शकले असते. परंतु त्यांचें ह्या बाबतींत विशेष लक्ष नाही. देवाच्या स्थावर संपत्तीशिवाय दरवर्षी बद्रीनाथाच्या यात्रेला येणाऱ्या लोकांकडून जें कांही 'पत्रं पुष्पं' वगैरेच्या निमित्ताने मिळतें तेंहि थोडेंथोडकें नसतें. पण हें सर्व धन महंतजींच्या सुव्यवस्थेमुळे नुसतें साठतच राहतें. महंतजी दिसायला भव्य व संभावित दिसतात. दोन हातांत दोन सोन्याचीं सलकडीं आणि अंगावरील कपडे नीटनेटके, उंची, व चापूनचोपून बसविलेले. ते "घरवारी" म्हणजे गृहस्थ गोसावी आहेत.

### घरबारी गोसाव्यांचा संप्रदाय

बंगालमधे जशी श्रीगौरांग महाप्रभूंच्या संप्रदायांतील गृहत्यागी वैष्णवगणांमधून कालांतराने गृहस्थ बैराग्यांची उत्पत्ति झाली, त्याचप्रमाणे भगवान श्रीशंकराचार्यांच्या शिष्यगणांनी प्रवर्तित केलेल्या दशनामी * संन्यासी वर्गातून काळाच्या ओघांत

"घरवारी" गोसाव्यांचा संप्रदाय निघाला. उत्तराखंडामधे हा संप्रदाय बराच विस्तार पावलेला असून, त्यांच्यापैकी बरेचजण पूजा, देवसेवा करून देवळांच्या व्यवस्थेचें काम पाहतात. उत्तराखंडांतील शैव व शाक्त पंथांतील उपास्य देवदेवींच्या मंदिरांची व्यवस्था या गिरि, पुरी, नामाभिधानी घरवारी गोसाव्यांकडेच असते. हे गोसावी संन्यासाश्रमाचें चिन्ह म्हणून डोक्यावर तेवढी एक भगवी पगडी घालतात. पूर्वीच्या काळापासून जे त्यागी महापुरुष या मठाच्या महंतपदावर परंपरेने विराजमान होत आले, त्यांचें पवित्र आसन येथे जपून ठेवलें आहे व त्याची पूजा-अर्चाहि नियमितपणें होत असते. संन्यासाश्रमाचें निदर्शक असें तेवढें एक आसनच काय तें मला आढळलें. त्याशिवाय संन्यासी महंतांच्या परंपरेची दुसरी कोणतीहि खूण दिसली नाही.

### जनसेवेविषयी औदासीन्य

त्यानंतर, मठांतील मंदिराला दान वा नेमणूक म्हणून मिळालेल्या उत्पन्नाचा विनियोग सर्वसाधारण लोकांच्या हिताकरिता होत असलेला आढळता, तर किंचित् का होईना मनाला समाधान वाटलें असतें. परंतु अत्यंत उद्वेगाची गोष्ट अशी की या बाबतींत महंतजींचें अजीबात लक्ष दिसलें नाही. असली ही परिस्थिति केवळ याच मठांत आहे असें नाही. उत्तराखंडांतील जो प्रमुख असा जोषीमठ, तेथेहि सध्या काय चाललें आहे तें यथानुक्रमें मी सांगणारच आहें. असो. महंतजीबरोबर इकडच्यातिकडच्या गप्पागोष्टी झाल्या. देवाचें उत्पन्न त्यांचेकडून सत्कारणीं लागत नसल्याची

* भगवान् श्रीशंकराचार्यांच्या चार प्रमुख शिष्यांनी संन्यासीगणांचीं हीं दहा नांवें ठेवलीं होतीं— गिरि, पर्वत, सागर, वन, अरण्य, पुरी, भारती, सरस्वती, तीर्थ आणि आश्रम.

जाणीव त्यांना करून देण्याचें मी विसरलों नाहीं. उत्तराखंडांत प्रवेश केल्यावर प्रथमच संन्यासी मठांची अशी दुर्दशा होत असलेली पाहून मला खूप वाईट वाटलें. या परम पवित्र बदरिकाश्रमाच्या तपोभूमींतील, संन्याशांनी स्थापन केलेले मठ असे घरवारी गोसाव्यांच्या हातांत गेले असतील, असें मला कधी वाटलें नव्हतें. अस्तु. महंतजींच्या मुलाबरोबर माझी अगोदरची ओळख असल्यामुळे माझ्या अतिथिसत्कारामधे कांही उणीव नव्हती. अखेरीस माझें नशीब थोडेसें खुललें, आणि माझ्याजवळ गरम कपडे पुरेसे नाहीत हें पाहून महंतजींनी आपणहून एक कांबळें मला दिलें. चंद्रवदनी देवीला जातांनाहि, टिहरीच्या राजगुरूकडून मला एक घोंगडी मिळाली होती. पण थोड्याच दिवसांत तिचा वियोग झाला होता. अर्थातच, घोंगडीची मला नितान्त आवश्यकता होती म्हणून महंतजींनी थोडासा पैसा खर्चून मला घोंगडी घेऊन दिल्याने माझ्यावर त्यांचे बरेच उपकार झाले.

कमलेश्वर महादेवाचें मंदिर सोडून येथे इतरहि अनेक देवमंदिरें आहेत, पण तीं तितकीं प्रसिद्ध नाहीत. मी सहज गाव पाहायला निघालों, आणि सर्व देवांचें दर्शन घेऊन आलों. श्रीनगरमधे इकडील विभागांतील ब्राह्मण वस्ती बरीच आहे. त्यांच्यांतील कुणीकुणी संस्कृत शास्त्रग्रंथांत चांगले पारंगत आहेत असेंहि ऐकलें. अंबा दत्त जोषी नांवाच्या एका ब्राह्मण पंडिताशीं माझी ओळख झाली. त्यांच्याजवळ असलेली हस्तलिखित अवधूतगीता वाचून मला फार बरें वाटलें. मी बदरिकाश्रमाहून परत येईपावेतों माझ्यासाठी एक अवधूतगीता लिहून ठेवण्याचें त्यांनी आश्वासन दिलें. हृषीकेशहून डेहराडून व मसूरी मार्गें मी उत्तराखंडांत प्रविष्ट झालों होतों. म्हणूनच हृषीकेश व श्रीनगर यांच्यामधे असलेल्या

पतितपावनी भागीरथी व अलकानंदा यांच्या देवप्रयाग (दिव्य-प्रयाग) येथील पवित्र संगमाचें स्नान मला घडलें नव्हतें. तेव्हा बदरिकाश्रमाहून परत येतांना ह्याच मार्गानें येण्याचें ठरविलें. इकडील (पाहाडी) लोकांच्या हिशोबानें हरिद्वारहून केदार व बद्रीनारायण १२० कोस असून श्रीनगर मध्यावर पडतें. असें जर असेल तर श्रीनगरहून केदारनाथ ६० मैल असावें. मी ज्या वेळची ही गोष्ट सांगत आहें त्यानंतर आता इतक्या दिवसांनी श्रीनगर-मधे बराच बदल झालेला आहे असें ऐकतों. गोला तलाव फुटल्या-नंतर हल्लीचें श्रीनगर पर्वताच्या बऱ्याच वरच्या बाजूस वसविलें गेलें आहे. असो. दोन तीन दिवस श्रीनगरमधे काढल्यावर चौथ्या दिवशीं सकाळीं मीं रुद्रप्रयागाकडे प्रयाण केलें.

### रुद्रप्रयागच्या वाटेने

श्रीनगरहून रुद्रप्रयाग एकोणवीस मैल आहे. पाहाडी हिशोबानें बारा कोस. दीड मैल म्हणजे एक कोस असें हें प्रमाण आहे. श्रीनगरची वेस ओलांडली. समोर दिसलें की निरनिराळ्या प्रांतांतील, वेगवेगळ्या संप्रदायांच्या साधुसंन्याशांना व गृहस्थ यात्रेकरूंना राहण्यासाठी रस्त्याच्या बाजूनें जवळ जवळ दोन एक कोस लांबपर्यंत अंतराअंतरानें एक एक चट्टी (छोटेसें दुकान व यात्रेकरूंना बसण्याउठण्यासाठी जागा) आहे. त्यामुळे गावाबाहेरील हें दुर्गम व निर्जन स्थानदेखील लोकालयांत परिणत झालें होतें. तो विपुल जनप्रवाह अविरतपणें पाहाडी रस्त्यावरून वरच्या व खालच्या दोन्ही दिशांनी हलत होता. यात्रेच्या प्रारंभीं हरिद्वाराला ज्यांनी मेष संक्रांतीचें स्नान करून वर चढण्याला आरंभ केला होता, ते आता परत खाली उतरत होते. पण अधिकांश यात्रेकरू वर चढत होते. गंगोत्री-मार्गानें बदरिकाश्रमला जाणारेहि एव्हाना

येथे येऊन पोहोचले होते. मला एवढें आठवतें की आषाढ महिन्याच्या शेवटीं शेवटीं बदरीनारायणाला पोहोचलों होतों. श्रावण महिन्याच्या अखेरपर्यंत यात्रेकरूंची सारखी रीघ लागलेली असते. त्यानंतर भाद्रपद, आश्विन व कार्तिक या तीन महिन्यांमधे, थंडी जरा जास्त असल्यामुळे फक्त इकडच्याच मुलखांतील यात्रेकरू साधारणतः आढळतात. असो. मीं श्रीनगर मागे टाकलें. आता रस्त्याने, यम्नोत्रीच्या वाटेवरील भीषण निर्जनता नव्हती. गंगोत्री मार्गावरील बोटावर मोजतां येणाऱ्या यात्रेकरूऐवजी मी आता यात्रेकरूंच्या लोंढ्याबरोबर पुढे चालू लागलों.

### ऋषि-मुनींचा सार्थ आदेश

यात्रेकरू मोठ्या भक्तिभावाने "जय केदारनाथ, जय बदरी विशाल" अशा गर्जना करीत होते. त्यामुळे पर्वतमय प्रदेशांतील स्वाभाविक व गंभीर नीरवता जणु कांही दिवसांकरिता दूरच्या दऱ्याखोऱ्यांत व गुहांमधे लपून बसली आहे असें वाटत होतें. ज्या अरण्यसंकुल कठीण अशा डोंगराळ प्रदेशांत खालील प्रांतांतील लोकांचें क्वचितच दर्शन घडलें असतें, तो विशाल प्रदेश आज भगवंताच्या प्रभावशाली महिम्यामुळे विभिन्न प्रांतांतील लोकांमुळे गजबजून उठला होता. श्रीभगवंताच्या अपरंपार महिम्यामुळे आकृष्ट होऊन, आपलें घरदार व प्रेमाचीं माणसें यांचा वियोग सहन करून, मोठ्या कष्टाने कमावलेल्या धनाचा सढळ हाताने व्यय करीत करीत, हजारो स्त्री-पुरुष, मुलाबाळांना अंगाखांद्यांवर घेत घेत ह्या कष्टबहुल पाहाडी रस्त्याने वाटचाल करतांना, परमानंदांत डुंबत होते. धन्य प्रभु! आणि धन्य तुझा हा महिमा! संपूर्ण कठोर व्रत स्वीकारल्याशिवाय बदरिकाश्रमाची यात्रा पार पडणें शक्य नाही. कोणत्याहि गैरसोयीकड वा त्रासाकडे यात्रे-

करूंचें लक्ष नसतें. केवळ देवाधिदेव केदारनाथ व बदरीनारायण यांचें दर्शन कसें लवकर होईल इकडेच त्यांचें लक्ष असतें. उत्तराखंडांतील यात्रेकरूंची ही भगवन्निष्ठा, एकाग्रता, देवदर्शनाची तीव्र पिपासा, कठोर व्रताचरण इत्यादि पाहून, पाहणारा मुग्ध होतो. आणि भगवंताचा अपार महिमा असा प्रत्यक्ष जाणवल्यामुळे, हृदय भक्तिभावाने हेलावून जातें. खरें पाहिलें असतां असल्या यात्रेकरूंच्या दर्शनानेहि पुण्यसंचय होतो. या मार्गावरील सर्वच पांथस्थ सारखे, सर्वांच्याच आशा, आकांक्षा सारख्या व त्यांचें उद्दिष्टहि एकच. राजा, प्रजा, धनी, निर्धन, स्त्री, पुरुष, वृद्ध, युवक, मुला-मुलींमधे कोणताहि भेद नाही. कारण सर्वांचेंच एका चट्टींत राहणें, एकत्रच स्नान, आहार, विहार व शयन करणें आणि सर्वांच्याच मुखांत तो एकच जयध्वनि, "जय केदार, जय बदरी विशाल." तीर्थयात्रेचें माहात्म्य खरोखर येथे मला उमजलें. 'वर्णाश्रमी लोकांनी तीर्थयात्रेस अवश्य जायला पाहिजे' असा नियम वेदपुराणकालीन आर्य ऋषिगणांनी कां घालून दिला याचें मला येथे पुरेपूर प्रत्यंतर आलें. तीर्थयात्रेमधे मनुष्याचे सर्व सुप्त गुण प्रकट होतात. त्याग, वैराग्य व तपस्या इत्यादि प्रच्छन्न सद्वृत्ति एकदम जणु मनुष्याच्या हृदयांत जागृत होतात. तीर्थांचें स्थानमाहात्म्य एवढें की अत्यंत विषयलोलुप माणसेंहि कांही दिवसांकरिता दैवी गुणांनी उजळून निघतात. श्रीनगरहून निघाल्यापासून वाटेंत नाना प्रांतांतील यात्रेकरूंचा पवित्र समागम पाहत पाहत व बदरिकाश्रमाचा अलौकिक प्रभाव अनुभवीत मी जणु आनंदसागरांत विहार करूं लागलों होतों. मनांत आलें, ज्याच्यावर असलेल्या अलौकिक भक्तिभावामुळे आकृष्ट होऊन हा अतिदूर, निर्जन असलेला असा डोंगराळ प्रदेश लोकसमुदायाने फुलून

गेला आहे, आणि स्त्री, पुरुष, बालक, युवक, अंध, पंगु व इतर व्यक्ति की ज्यांना इकडे येणें शक्यच झालें नसतें असे सर्वचजण ज्याच्या शक्तीमुळे अनुप्राणित होऊन असल्या दुर्गम स्थळीं येऊन मोठ्या आनंदाने जमेल तितक्या लवकर पाय उचलीत उत्कंठेने पुढे जात आहेत, धन्य त्याची शक्ति ! यात्रेकरूंच्या सोयीसाठी, कुठे दोन, कुठे तीन तर कुठे चार चार मैल अंतरावर लहान मोठ्या चट्टया वसविलेल्या आहेत. प्रत्येक चट्टीमधे राहावयाची व्यवस्था असून, डाळ, तांदूळ, तूप, दूध, कणीक, आणि बटाटे वगैरे खाण्याचे जिन्नस मिळतात. परंतु त्यांच्या किंमती जरा जास्त असतात. या मार्गाने भिक्षेसाठी मला मुळीच प्रयत्न करावा लागला नाही. कारण पैसा गांठीला बांधून जे जे कुणी यात्रेला आले होते, ते ते सर्वजण भेटतील त्या चार दोन साधुसंन्याशांना भोजन करण्याचा आग्रह करीत. कांहीकांही धनाढ्य गृहस्थ यात्रेकरू तर दररोज पुष्कळशा साधुसंन्याशांना भोजन देऊन आपल्या बरोबर नेत होते. श्रीनगरपासून निघाल्यावर मी सारा दिवस चालत होतों. सूर्य जेव्हा माथ्यावर आला तेव्हा एका चट्टीमधे थोडी विश्रांति घेतली व कोण्या एका गृहस्थाने दिलेली भिक्षा ग्रहण केली.

### रुद्रप्रयाग आलें

त्यानंतर दिवस मावळायच्या वेळीं मी रुद्रप्रयागला पोहोचलों. हृषीकेशच्या वर लक्ष्मणझुल्यापासून जी सरकारी सडक सरळ बदरीनारायणला गेली आहे, तिला येथे फाटा फुटून, तो रुद्रप्रयागहून केदारनाथला पोहोचतो. रुद्रप्रयाग येथे अलकानंदेवर एक मोठा पक्का पूल आहे. बदरीनारायणाचा रस्ता सोडून, तो पूल ओलांडला म्हणजे माणूस रुद्रप्रयागला येऊन पोहोचतो. अलकानंदा व मंदाकिनी यांचा जेथे संगम होतो त्यालाच रुद्रप्रयाग

म्हणतात. दोन वेगवेगळ्या तीर्थांतून उगम पावलेल्या दोन पृथक् नद्या जशा येथे येऊन मिळतात, त्याचप्रमाणे दोन भिन्न तीर्थक्षेत्रांवरून येणारे मार्गहि येथेच एकत्र होतात. बदरीनारायणाला जाणाऱ्या रस्त्यानेच अलकानंदेच्या तीरावर एक चट्टी आहे. त्याशिवाय दुसरी कोणती वस्ती नाही. तरीपण रुद्रप्रयागला एक-दोन मंदिरें आहेत. हीं मंदिरें उतरत्या पाहाडांवर रचलेलीं आहेत. मंदिराच्या व्यवस्थेंत असणाऱ्या दोनचार लोकांच्या राहत्या घरांशिवाय दुसरीं घरें येथे नाहीत. मंदिरांतील पुजारीएक पाहाडी दशनामी गोसावी आहे. त्याचा एक बंगाली शिष्यहि होता. दोघेहि प्रौढ होते. अडाणी, गावढळ अशा पाहाडी गोसाव्याचा एक सोज्वळ व सभ्य असा बंगाली शिष्य पाहून मला थोडा विस्मय वाटला. असो.

### संगमावर

मीं रुद्रप्रयागला येऊन अलकानंदा व मंदाकिनी यांच्या पवित्र संगमांत स्नान केलें. मनावर एक वेगळीच प्रसन्नता पसरली. चांगला काळोख पडेपर्यंत मी संगमावरच बसून होतों. अहाहा, किती सुंदर दृश्य होतें तें ! पाहतां पाहतां डोळे खिळून जातात. उत्तालतरंगिणी अलकानंदा व प्रबल वेगवती मंदाकिनी यांचें तें अदृष्टपूर्व संमीलन पाहून माझ्या मनांत विचारांचे कितीतरी तरंग उठूं लागले. घननीळ वर्णाची, कलकल निनाद करणारी मंदाकिनी, देवाधिदेव केदारनाथांचीं चरणकमलें धुऊन आल्यावर, अलकापुरीहून येणाऱ्या शुभ्रसलिला अलकानंदेला येथे मिठी मारत असल्यामुळे माझ्या दृष्टीसमोर हरिहरांची पवित्र मूर्ति उभी राहिली. श्यामल वर्णाची मंदाकिनी अलकानंदेच्या गळ्यांत हात टाकते व दोघीहि पतितपावनी भागीरथीला भेटण्यासाठी तांतडीने

देवप्रयागाकडे धावत सुटतात. रुद्रप्रयागाचें हें अतिसुंदर व रमणीय दृश्य पाहून मला खूप हर्ष झाला. ती रात्र तेथें मीं मोठ्या आनंदांत काढली.

### केदारनाथकडे

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी तेथून केदारनाथकडे जावयास निघालों. रुद्रप्रयागपर्यंत अलकानंदेच्या तीरातीराने रस्ता गेला होता, तर आता मंदाकिनीची सोबत होती. नगाधिराज हिमालयाच्या अंतरंगांत जसाजसा मी प्रवेश करूं लागलों, जसाजसा वर चढूं लागलों, तसातसा रत्नगर्भ हिमालय वेगवेगळ्या वेषांनी सुशोभित होऊन माझी दर्शन-लालसा वाढवूं लागला. नगराजाच्या त्या चित्रविचित्र व नवनवीन वेषांतरामुळे मी अगदी मनापासून मुग्ध झालों होतों आणि श्रीकेदारनाथ व श्रीबदरीविशाल* यांचें कधी मला दर्शन घडेल ह्या विचाराने आकुल झालों होतों.

रुद्रप्रयागहून निघाल्यावर साधारण दोन प्रहराच्या सुमारास मी अगस्त्यमुनी येथें येऊन पोहोचलों. हें ठिकाण यात्रेकरूंनी पूर्ण भरलेलें होतें. सर्वचजण खाण्यापिण्याच्या सोयीमध्ये व्यग्र होते. कुणी दुकानांतून सामान आणत होते, तर कुणी स्वयंपाक मांडला होता. कितीतरी प्रांतांतले लोक एकत्र झाले होते, व त्यांच्या वेगवेगळ्या कितीतरी भाषा कानावर आदळत होत्या. तें एक अदृष्टपूर्व दृश्य होतें. अगस्त्यमुनि क्षेत्र म्हणजे एक छोटेसें खेडें,

---

* केदार व पंच बदरीबद्दल सविस्तर वर्णन पुढे येणारच आहे. येथें येवढेंच सांगतों की पंच बदरींपैकी बदरीनारायणालाच "विशाल बदरी" म्हणतात. महाभारतांतील वनपर्वांत उल्लेख आहे "विशाला बदरी यत्र नरनारायणाश्रमः।" "बदरी विशाल"च्या पूर्व व पश्चिम बाजूंना असलेले पाहाड नर व नारायण नांवाने बरेच दिवसांपासून प्रसिद्ध आहेत.

एक प्रशस्त चट्टी व अनेक दुकानें असलेलें ठिकाण आहे. बरीचशीं जुनीं देवळेंहि येथे आहेत.

या ठिकाणीं अगस्तिमुनींनी कांही दिवस तपश्चर्या केली होती असें म्हणतात व तेव्हापासून त्यांचेंच नांव या क्षेत्राला मिळालें आहे. ठिकाण तपस्येला खरोखरच अनुकूल आहे. रस्त्याच्या थोड्या वरील भागास तें छोटेसें खेडें व चट्टी, समोर हिरव्यागार गवताने आच्छादिलेला भूमिखंड, व त्याच्याच खाली कलकल निनाद करणारा मंदाकिनीचा अखंड प्रवाह. जागा सर्वच दृष्टींनी राहावयास योग्य आहे याविषयी संदेह नाही. तशी येथे थंडीहि फार नसते. श्रीनगर सोडल्यापासून वाटेने येथल्यासारखी समतल भूमि माझ्या पाहण्यांत आली नाही. मीं मंदाकिनींत स्नान केलें, देवादिकांचें दर्शन घेतलें व एका मंदिरांत बसून थोडी विश्रांति घेऊं लागलों. मनांत आलें महर्षिगणांनी एकेकाळीं आपल्या निवा-साने पुनीत केलेल्या या नयनमनोहर भूमीच्या दर्शनानेंच जर मन इतकें पवित्र व आनंदित होतें तर त्या तपक्लिष्ट, पुण्यदर्शनी महर्षिगणांचें दर्शन झालें असतें तर आज किती अपार आनंद झाला असता !

### कौपीनधारी साधूचें आतिथ्य

मी त्याच मंदिरांत बसून असल्या पवित्र विचारांत वाहवत असतांना, एक भस्म चर्चिलेला, कौपीनधारी साधु सुहास्यवदनाने माझ्याकडे आला व मीं त्याच्यापासून आज भिक्षा ग्रहण करावी अशी विनवणी करूं लागला. मध्यान्हानंतर वरण-पोळ्यांचा स्वयंपाक करून साधूनें ज्या आंतरिक जिव्हाळ्याने मला जेवूं घातलें तो जिव्हाळा, तें प्रेम व ती श्रद्धा माझ्या अंत:करणांत

त्या साधूची आठवण चिरकाल जागृत ठेवील. मंदिराला लागून असलेल्या एका खोलीमधे त्याला स्वयंपाक करतांना पाहून तो त्या मंदिरांतीलच कुणी पुजारी असावा असें मला वाटलें. त्याचें वय अंदाजें ५०-५५ असावें. असो. अगस्त्यमुनि क्षेत्रांत अशा उदारहृदयी साधुपुरुषाच्या दर्शनानें मला अत्यंत आनंद झाला व माझ्यासारखा भाग्यवान मीच असें मला वाटूं लागलें. भोजनानंतर थोडी विश्रांति घेऊन मी पुनः पुढे जावयास निघालों. ह्या क्षेत्राच्या रमणीय दर्शनानें मी इतका मोहून गेलों होतों की, इतक्या लवकर तें स्थान मला सोडावेसें वाटेना. मला अजून बराच दूरचा पल्ला गाठावयाचा होता. त्यामुळे वाटेंतील असल्या सुंदर सुंदर ठिकाणीं इच्छा असूनहि एक-दोन रात्रींपेक्षा जास्त वेळ मी थांबूं शकलों नाहीं. त्यानंतर मी जसजसा अगस्त्यमुनिक्षेत्राहून वरवर चढूं लागलों तसतशी थंडी वाढूं लागली. रात्रीं व दिवसां थंडीमधे विशेष फरक पडत नसे. संध्याकाळच्या सुमारास एका चट्टीमधे जाऊन पोहोचलों. येथूनच या थंडीला सुरुवात झाली होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ह्या चट्टीहून निघून एका मोठ्या उंच पाहाडावर चढण्यास आरंभ केला. दुपारच्या दोनप्रहरीं गुप्तकाशीला येऊन थडकलों.

### गुप्तकाशींत

गुप्तकाशी हें ठिकाण एका विशाल पर्वताच्या सर्वांत उंच भागावर वसलेलें आहे. येथून थोड्या अंतरावर चढलें की या उत्तुग पर्वताचें शिखर गाठतां येतें. खाली नजर टाकली की खूप खोलवरून मंदाकिनी वाहतांना दिसते. मंदाकिनीच्या दुसऱ्या तीरावरील साधारण इतक्याच उंचीच्या पाहाडावर उखीमठ वसलेला आहे. गुप्तकाशीच्या समोरासमोर उखीमठ दिसून येतो-

मंदाकिनीच्या पश्चिमेकडील पाहाडाच्या खांद्यावर गुप्तकाशी व पूर्वेकडील खांद्यावर उखीमठ. उंचीच्या बाबतींत दोन्हीहि ठिकाणें सारखींच येतील. गुप्तकाशींतल्या दोन दगडी देवालयांमधे धातूच्या व पाषाणाच्या अत्यंत सुंदर मूर्तींचें दर्शन झालें. देवतांचीं नांवें आता माझ्या लक्षांत नाहीत. देवळाच्या आवारांत दोन पितळीं गोमुखें आहेत व त्यांतून पाण्याच्या धारा सतत वाहत असतात. हें झुळझुळ वाहणारे सुशीतल पाणी पर्वताच्या अंगाखांद्यावरून ओघळत जाऊन मंदाकिनीला मिळतें. कारागिराने मोठ्या कौशल्याने बांधलेल्या ह्या गोमुखांमुळे गुप्तकाशीला यात्रेकरूंसाठी स्नानाची व स्वयंपाक वगैरेची मोठी सोय झाली आहे. खास गुप्तकाशीला कायमचे राहणारे लोकहि तेथूनच पाणी भरून नेतात. आणखीहि प्रवाह आहेत व तेथलेंहि पाणी लोक वापरतात. केदारनाथच्या हिममय परिसरांतील वारे येथून एकसारखे वाहत असल्यामुळे व येथील समुद्रसपाटीपासूनची उंचीहि बरीच असल्यामुळे थंडी फार असते. येथे हिवाळा कायमचाच असतो, पण त्यांतल्या त्यांत खास हिवाळ्यांतील कांही महिने बरेंच बर्फ पडतें. येथे आल्यानंतर अगस्त्यमुनींतील मंदिरांत जेवूं घालणाऱ्या साधूची पुनः भेट झाली. अशी अचानक येथे भेट होईल याची मला कल्पना नव्हती. आणि त्यामुळे त्याला पाहतांच मला अत्यंत आनंद झाला.

### कौपीनधारी साधूची पुनश्च भेट

तेव्हा मी त्याला अगस्त्यमुनीच्या मंदिरांतील एक पुजारीच समजलों होतों. परंतु आता कळलें की तो देखील माझ्यासारखाच केदारनाथ व बदरीनारायणाला जाणारा यात्रेकरू आहे. अगस्त्यमुनि ठिकाण त्याला खूप चांगलें वाटलें म्हणून तो दोनएक दिवस तेथे थांबला होता. त्याचा सरळ व उदार स्वभाव पाहून मी अगो-

दरच मुग्ध झालों होतों. येथेहि पुनः त्याच्या अंगचे विविध सद्गुण मला दिसून आले. मला पाहून त्यालाहि आनंदाचें भरतें आलें होतें. त्या कौपीनधारी महापुरुषाचें सर्व अंग भस्मांच्या पट्टयांमुळे पांढरेंशुभ्र दिसत होतें. मला पाहून त्याला झालेला आनंद त्याच्या सस्मित अशा प्रसन्न मुखमंडळावर नैसर्गिकपणें उमटलेला दिसत होता. मी दिसतांच त्याने पुनः आजहि महावीराच्या प्रसादाचें आमंत्रण मला देऊन ठेवलें. तो महावीर मताचा उपासक असावा, असें मला वाटलें. त्याला पाहतांच त्याच्या उपास्य देवतेची आठवण व्हावी. मधून मधून अत्यंत भक्तिभावाने भक्तवीर हनुमानाचें नांव तो उच्चारीत असे. तोंडांतील समोरचे कांही दांत नसल्यामुळे त्याचा हसरा चेहरा एखाद्या बालकासारखा सुंदर दिसत असे. तो वैष्णव संप्रदायांतला असूनसुद्धा माळ, टिळा, कंठी इत्यादि बाह्य अवडंबर त्याच्या शरीरावर दिसत नव्हतें. त्याच्या हृदयांत पंथाभिमानाचा लेश नव्हता हें इतर संप्रदायांतील व विशेषतः शैव पंथांतील संन्यासीगणांविषयी त्याला वाटत असलेल्या प्रेमावरून दिसून येत होतें. वैष्णव साधूंमधे इतका उदारभाव साधारणतः आढळून येत नाही. संप्रदायाबाहेरील लोकांवर इतकें निर्व्याज व नैसर्गिक प्रेम करणारे वैष्णव फारच विरळ.

### साधुमहाराजांचा सुखदायक सहवास

मला स्वतःची इष्टदेवता हनुमंताच्या प्रसादाचें आमंत्रण देऊन ते वैष्णव साधुमहाराज स्वयंपाकासाठी लाकडें आणावयास रानांत गेले. दरम्यान गुप्तकाशींतील देवदेवतांचें दर्शन घेऊन मी गावांतून एक फेरफटका मारला व परत आलों. साधुमहाराज रानांतून परतले होते, व खोलीच्या एका कोपऱ्यांत ध्यानमग्न बसले होते. मघा त्यांच्याकडूनच ऐकलें होतें की कपड्यांपैकी

मराठी
अनुक्रम २६३९२ वि: भू-प्रवास
क्रमांक १७४ दि: २३/३/५०


त्यांच्याजवळ फक्त एकच काय ती घोंगडी होती व ती देखील असेच रानांत इंधन आणावयास गेले असतां कुठेतरी पडली. कुठे पडली त्याचेंहि स्मरण नव्हतें व पुनः दूरवर तिच्या शोधांत जाऊनहि सापडली नव्हती. असल्या कडाक्याच्या थंडीच्या ठिकाणीं त्यांना उघडया अंगाने बसलेले पाहून मीं माझें कांबळें त्या ध्यानस्थ अवस्थेंतच त्यांच्या अंगावर व्यवस्थित टाकलें व थोडया वेळापुरता तेथून दुसरीकडे निघून गेलों. साधुमहाराज ध्यानांत इतके तन्मय झाले होते, व त्यांची मुखश्री स्वर्गीय अशा स्मिताने इतकी परिपूर्ण भासत होती की जणु आपल्या हृदयमंदिरांत इष्टदेवतेशीं झालेल्या साक्षात् मीलनाचें परमसुख ते अनुभवीत होते असें मला वाटलें.

थोडया वेळाने मी परत येऊन पाहतों तों महाराजांनी स्वयंपाकास सुरुवात केली होती. इकडे स्वयंपाक सुरू होता व त्यांच्या गोड गळयांतून श्रीतुलसीदासजींच्या रामायणांतील व विनयपत्रिकेंतील साधना-संगीत स्रवत होतें. अहाहा ! तीं अत्यंत रसाळ पदें त्यांच्यासारख्या साधकाच्या मुखांतून ऐकतांना मला किती अननुभूत असा स्वर्गीय आनंद होत होता त्याचें वर्णन करून सांगतां येत नाही. विनयपत्रिकेंतील भजनें इतकीं सुंदर आहेत की तीं वाचतां वाचतां खरोखरच जणु प्रभु श्रीरामचंद्राच्या बाललीला डोळयासमोर उभ्या राहतात. एक तर स्वर्गीय तीर्थस्थानांत येऊन पोहोचल्याचें समाधान व त्यांत पुनः परमपवित्र साधूचा आल्हाददायक सहवास, त्यामुळे गुप्तकाशीमधे माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही. साधुमहाराजांचा स्वयंपाक आटोपल्यावर त्यांनी इष्टदेवतेला नैवेद्य दाखविला. त्यानंतर अत्यंत प्रेमळपणें त्यांनी मला प्रसाद दिला. एका कौपीनीशिवाय साधुमहाराजांजवळ दुसरें तर कोणतेंच सामान नव्हतें. कुठून इतकी भिक्षा जमवून मार्गाने जातां जातां

दररोज असें साधूंना भोजन देत हें सांगतां येत नाही. माझ्या-शिवाय आणखी एकदोन साधूंना त्यांनी जेवावयास दिलें होतें, आणि आमचीं जेवणें आटोपल्यावर जें कांही थोडेसें राहिलें तेवढें खाऊन ते तृप्त झाले.

### भारतीय संस्कृतीचा मेरुदंड

त्यांची भगवंतावरील भक्ति व श्रद्धा पाहून मी तर अगदी स्तिमित झालों होतों. मला वाटतें, गुप्तकाशीहून पुढे केदारनाथाची यात्रा कांही त्यांनी केली नाही. त्याबद्दल विचारल्यावर ते म्हणाले, "श्रीकेदारनाथांनी इथेच येऊन मला दर्शन देण्याची कृपा केली. आता तेथे जाऊन काय करूं ?" खरोखरीच धन्य त्यांचा विश्वास, आणि धन्य भगवंताची अपार करुणा ! यालाच म्हणतात 'भक्तांचा भगवान'. अनेक जन्मांचें सुकृत फळाला आलें म्हणजेच माणसाला साधुमहाराजांसारखे हृदय, प्रेम, भक्ति व श्रद्धा इत्यादि गोष्टींची जोड मिळतें. त्यांच्यासारख्या निष्कांचन, कौपीनधारी महापुरुषांनी कुणाला न कळत प्रसंगीं आपल्या पुढ्यांतलें सर्व अन्न भुकेलेल्यांना देऊन आतापर्यंत दररोज कितीतरी जीवांचें प्राणरक्षण केलें आहे. त्यांच्यासारख्यांच्या पुण्याईने धर्मप्राण भारताचा एकेकाळचा महिमा अजून जशाचा तसा टिकून राहिला आहे. त्यांच्यासारख्यांच्या आत्म-त्यागामुळे व चारित्र्यबळामुळे एरवी कंठाशीं आलेले भारताचे प्राण अजून कुडी सोडत नाहीत, ह्या गोष्टीची जाणीव मला वाटतें सुशिक्षित देशहितेच्छूंपैकी अनेकांना नाही. आत्मत्यागपरायण, परम उदार, पवित्र महापुरुषांचें चारित्र्य हेंच राष्ट्रीय जीवनाचा मूल आधार आहे. शेकडो सभा-समितींच्या पोकळ डामडौलाने वा जाहीरनाम्यांनी जें कार्य होत नाही त्याच्या कितीतरी पटीने मोठें कार्य एखाद्या महापुरुषाच्या चरित्रबळावर अत्यंत सुलभतेने सुसंपन्न

होतें. आज जर भारतांत असल्या महापुरुषांची विरळ का होईना पण जिवंत उदाहरणें दिसलीं नसतीं तर एव्हाना इतर प्राचीन संस्कृतींप्रमाणे भारतीय संस्कृतिहि नामशेष झाली असती.

### उखीमठाकडे

इकडील मुलखांतल्या एका माणसाकडून कळलें होतें की, गुप्तकाशीहून केदारनाथला जाणाऱ्या वाटेवर फाटाचटी नांवाची धर्मशाळा असून तेथे एक बंगाली संन्यासी बऱ्याच दिवसांपासून राहत आहेत. त्यांना त्या विभागांतील पहाडी लोक फाटाचटीचे महाराज म्हणतात. ते तिबेटास गेले होते आणि कैलास व मानस-सरोवराचेंहि दर्शन करून आले होते. माझीहि कैलासदर्शनाची मनीषा आहे हें जाणन त्या माणसाने मीं फाटाचटीच्या महा-राजांची भेट घ्यावी असा मला सल्ला दिला होता. तेव्हापासून फाटाचटीच्या महाराजांना भेटण्याविषयी मी विशेष उत्सुक झालों होतों. गुप्तकाशीला आल्यानंतर ऐकलें की या वेळीं फाटाचटीचे साधुमहाराज उखीमठ येथे गेले आहेत. तिथून पुन: ते कदाचित् दुसरीकडे निघून जातील व मग भेट होणार नाही असें वाटल्यामुळे मीं तडक उखीमठाचा रस्ता धरला.

गुप्तकाशीहून उखीमठाला जायचें म्हणजे भल्या मोठ्या पहाडाचा एक चढ व एक उतार पार करावा लागतो. पहिल्यांदा उतार लागतो. गुप्तकाशीहून निघून त्या धिप्पाड पहाडाच्या कड्या-वरून उतरत उतरत पायथ्याशीं वाहत असलेल्या मंदाकिनीच्या तीरावर आलों. त्यानंतर एका पक्क्या पुलावरून मंदाकिनीच्या पैलतीरावर गेलों व समोर उभ्या ठाकलेल्या त्या आक्राळविक्राळ पहाडावर चढण्यास सुरुवात केली. एका पहाडावरून उतरून दुसऱ्या पहाडावर चढण्यास मला बराच वेळ लागला. गुप्तकाशीहून

उखीमठ नक्की किती दूर असेल तें कांही आता आठवत नाही. पण अगदी प्रात:काळीं उठून मीं चालायला आरंभ केला होता आणि उखीमठांत येऊन पोहोचलों तों सकाळचे दहा वाजले होते.

### उखीमठाचें प्राकृतिक सौंदर्य

उखीमठ एका अति उंच व विशाल पर्वतावर वसलेला आहे असें मीं वर सांगितलें आहे. येथून उत्तरेकडे नजर फेकली की केदारनाथची चिरंतन हिममय पर्वतराजी स्पष्टपणें डोळ्यांत भरते. उखीमठाहून अनंत हिमराशींचें सुविशाल दृश्य जितकें स्वच्छ दिसतें तितकें गुप्तकाशीहून दिसत नाही. त्या प्रचंड पर्वतावर चढतांना मला जो कांही थकवा आला होता तो उखीमठाच्या परिसरांत येतांच पार कुठच्याकुठे नाहीसा झाला. पाहा केवढें स्थानमाहात्म्य तें ! पहाडाची चढाई इतकी कठीण व मेहनतीची होती की, तसल्या दारुण थंडींतहि उखीमठ गाठेपर्यंत मी घामाने ओलाचिंब झालों होतों. वस्तीच्या बाहेरच एका निवान्त ठिकाणीं बसून मीं थोडा विसावा घेतला. तेथून नगाधिराज हिमालयाचें महान् विचित्र दृश्य माझ्या दृष्टिपथांत येत होतें व त्याचें अपरंपार गांभीर्य माझ्या अंतरावर अंकित होत होतें. प्रवासाचा शीण तर नाहीसा झालाच पण हृदयहि आनंदाने व उत्साहाने भरून आलें. हा पर्वत चढायला आपण मुळीच कष्ट घेतले नाहीत असें मनाला वाटूं लागलें.

असो. अमळ विसावा घेतल्यावर मीं गावांत प्रवेश केला. केदारनाथ ते बद्रीनाथ या मार्गावरील उखीमठ एक महत्त्वाचें तीर्थस्थान आहे. गावहि सर्वच दृष्टींनी पाहण्यासारखें आहे. असें ऐकलें की देवाधिदेव महादेवांचा परमभक्त बाण राजा याची नगरी याच उखी मठाच्या ठिकाणीं होती, आणि राजकन्या उषा हिचा उषाहरणाभिनयहि येथेच घडला होता. हिंदी भाषिकांमधे

बरेचजण मूर्धन्य ‘ष’चा उच्चार ‘ख’प्रमाणे करतात; म्हणून ‘उषा’चेंच उखा असें झालें, आणि उषेच्या नांवानुसार ‘उषामठ’ हा ‘उखामठ’ झाला. कालांतराने अपभ्रंश होतां होतां ‘उखामठ’ उखीमठांत परिणत झाला. गावांत आल्यावर लवकरच मीं फाटाचटीच्या स्वामी महाराजांची भेट घेतली.

### फाटाचटीचे स्वामी महाराज

येथे एक छोटासा सरकारी दवाखाना व रुग्णालय आहे. केदार-बद्रिनाथाच्या रस्त्यावर ठिकठिकाणीं अशीं रुग्णालयें बांधून सरकारने यात्रेकरूंची बरीच मोठी सोय करून ठेवली आहे. स्वामी महाराज दवाखान्यांतच होते. कारण दवाखान्याचे डॉक्टर त्यांच्या भक्तमंडळींतील एकजण होते. भेटीनंतर, माझ्या भिक्षेची (जेवणाखाण्याची) सोय करावयास त्यांनी डॉक्टरसाहेबांना सांगितलें. मी गेलों तेव्हा दवाखान्यांतील एका खोलींतच स्वामी महाराज बसले होते व त्यांचा श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा पाठ चालला होता. बोलण्याच्या ओघांत कळलें की त्यांनी बऱ्याच तीर्थयात्रा केल्या होत्या आणि गेल्या वीस वर्षांपासून ते त्या दूरवरच्या बर्फमय प्रदेशांत निवास करीत होते. कडाक्याच्या थंडींत जसें लहान मुलांचे गाल, नाक, तोंड थंडीने उलून जावेत तसें महाराजांचें सर्व शरीर थंडीने उललें होतें. पुष्कळ वर्षांपासून तसल्या बर्फमय प्रदेशांत राहिल्यामुळे झालें की आणखी कोणत्या कारणामुळे त्यांचें शरीर तसें झालें होतें ह्याबद्दल त्यांना विचारण्याचा प्रसंग कांही आला नाही. आपली मायभूमि सोडून बरींच वर्षें त्यांनी इकडील पाहाडी मुलुखांत काढल्यामुळे त्यांचा आचारव्यवहारहि इकडच्या पाहाडी लोकांप्रमाणेच वाटायचा. यात्रेचे कांही महिने सोडले तर इतर मुलखांतील लोकांशीं त्यांचा संबंध येण्याची

मुळीच शक्यता नसे. शिवाय इतर प्रांतांतील यात्रेकरूंपेक्षा बंगाली यात्रेकरूंची संख्या अत्यंत अल्प असायची. अर्थातच बंगाली माणूस त्यांना क्वचितच भेटत असे. असाच कोणी बंगाली साधुसंन्यासी भेटला तर तें त्याला डाळ, पीठ, कणीक वगैरे सामुग्री जरूर देत असत. परंतु बंगाली म्हणजे आपल्या देशचा वगैरे पंक्तिप्रपंच त्यांच्या ठिकाणीं विशेष आढळून येत नसे. इकडील पाहाडी मुलखांतील रहिवासीहि त्यांना पाहिजे त्या वस्तु देऊन या त्यांच्या कार्यांत मदत करीत असत. असो. यापेक्षा त्यांच्याविषयी कांही जास्त माहिती मला आता आठवत नाही.

### स्वामी महाराजांचें मार्गदर्शन

फाटाचटीहून त्यांच्या त्या दिवशीं तेथे येण्याचें कारण कळलें की अलाहाबादच्या म्यूर कॉलेजांतील संस्कृतचे प्राध्यापक श्रीयुत आदित्यराम भट्टाचार्य केदारनाथाची यात्रा आटोपून तेथे येऊन पोहोचणार होते. त्यांना भेटण्याच्या उद्देशानेच महाराज तेथे आले होते. त्यानंतर मीं त्यांना तिबेटास जाणाऱ्या रस्त्याविषयी विचारलें असतां कळलें की ते बदरीनारायणाजवळील जोशीमठाहून नीतिघाट नांवाच्या खिडींतून तिबेटास गेले होते व एक वर्षभरानंतर कैलास व मानससरोवराचें दर्शन घेऊन परत आले होते. मलाहि त्यांनी नीतिघाटच्या खिडींतूनच जाण्याचा सल्ला दिला व तोच मार्ग जास्त सोयीचा होईल असें सांगितलें. बदरीनारायणाहून मानाघाट खिडींतून जाणारा दुसरा एक मार्ग आहे पण त्या मार्गाने गेल्यास मानससरोवर जास्त दूर पडेल असेंहि ते म्हणाले. मार्गांत येणाऱ्या अडचणींविषयी व संकटांविषयीहि त्यांनी बरेंच सांगितलें व अनेकविध कष्ट व श्रम सहन करण्याची अंगीं शक्ति असल्याशिवाय, इतकेंच नव्हे तर कधी कधी

जिवाचीहि आशा सोडण्याची तयारी केल्याशिवाय, कैलास व मानससरोवराचें दर्शन घडणें कसें शक्य नाही याविषयी लोकांत प्रचलित असलेलें एक मजेदार वाक्य त्यांनी मला म्हणून दाखविलें. तें वाक्य असें––"मान सरोवर कोन परसे, बिना बादर हिम बरसे, उडत कंकर जीव तरसे." अर्थ असा की मानससरोवराकडे पावसाच्या ऐवजी बर्फाची वृष्टि होते, व सोसाट्याच्या वाऱ्यामुळे वाळू व दगडाचे चिपोरे यांचा मारा बसतो आणि म्हणून-मानस सरोवराच्या स्पर्शाचें व दर्शनाचें भाग्य अगदी फारच थोड्या लोकांच्या वांट्याला येतें. माझा कैलास व मानससरोवराला जाण्याचा ठाम निश्चय आहे असें पाहून व तेथील थंडी कदाचित् मला एकदम सहन होणार नाही असें वाटून, फाटाचटीच्या स्वामीजींनी पहिलें एक वर्ष उत्तराखंडांतच काढायला मला सांगितलें. कारण नंतर दुसऱ्या वर्षी कैलासयात्रा केल्यास, मग तिबेटांतील कडाक्याची थंडी बाधण्याचा संभव कमी. असो. तिबेटयात्रेबद्दल आणखीहि बऱ्याच गोष्टी त्यांनी मला सांगितल्या. त्यानंतर मग अगाध हिमराशींनी संपूर्ण झांकलेल्या, उंचच उंच व चढायला अत्यंत कठीण अशा केदारनाथच्या गिरिशृंगाजवळच्या आडवाटेवरील कांही प्रेक्षणीय स्थळांविषयी ते बोलत बसले. ज्या विराट, उत्तुंग व सुविशाल शैलावर श्री केदारनाथ स्वयंभु लिंगाच्या स्वरूपांत प्रकट झाले त्याच शैलपठारावर लोकांच्या दृष्टीच्या टप्प्यांत येणार नाही अशा अति दुर्गम, निर्जन व प्रशांत प्रदेशांत "चोरावाडी" व "वासुकीतलाव" नांवाचीं दोन रमणीय सरोवरें आहेत. बारा महिने आणि तेराहि काळ बर्फाच्या दुलया पांघरलेल्या हिमालयाच्या अंगावरून झिरपत येऊन अंगठ्याएवढ्या धारेची

मंदाकिनी येथूनच वाळूंच्या राशी फोडून बाहेर पडते. त्यानंतर पाहण्यासारखें आणखी एक ठिकाण म्हणजे "महाप्रस्थ" किंवा "महाप्रस्थान." ह्या महापथानें विस्तीर्ण हिमालय पार करून महाराज युधिष्ठिरादि पांडव स्वर्गारोहणास निघाले होते. श्रीकेदारनाथच्या मंदिरापासून दोनतीन मैलांच्या टापूंतच हीं सर्व ठिकाणें पाहावयास मिळतात. इकडील एखादा वाटाड्या पंडा मिळाल्याशिवाय मात्र नवख्या माणसाला ह्या सर्व स्थळांपर्यंत पोहोचणें जवळ जवळ अशक्य आहे. फाटाचटीच्या स्वामीजींनी हीं सर्व ठिकाणें पाहण्यास मला पुन:पुन: सांगितलें.

### आदित्यरामबाबूंचें आगमन

आमच्या दोघांच्या अशा गप्पागोष्टी चालू असतांनाच श्रीकेदारनाथचें दर्शन आटोपून परतलेले आदित्यरामबाबू घोड्यावर बसून तेथे उपस्थित झाले. आदित्यरामबाबूंबरोबर माझी ही पहिलीच मुलाखत. असल्या अतिदूरच्या पहाडी मुलुखांत त्यांच्यासारख्या सुशिक्षित व्यक्तीची अशी अकस्मात् गांठ पडेल याची मला मुळीच कल्पना नव्हती. आदित्यरामबाबू हे एक निष्ठावान धार्मिक व सुसंस्कृत गृहस्थ होते. अर्थातच त्यांच्या-सारख्यांच्या सहवासांत उखीमठांतील हा एक दिवस मोठ्या आनंदांत गेला. गढवाल जिल्ह्याचे त्या वेळचे डेप्युटी कलेक्टर, आलमोड्याला राहणारे पंडित भवानीदत्त जोशी हे आदित्यराम बाबूंचे एक जवळचे स्नेही होते. त्यांनीच गडीमाणूस देऊन आदित्यरामबाबूंच्या उत्तराखंड यात्रेची बरीच सोय करून दिली व पाहण्यासारखीं ठिकाणें कोणतीं आहेत तींहि सांगितलीं. श्रीकेदारनाथच्या दुरून दिसणाऱ्या दृश्याचा प्रभाव मीं उखीमठांत येऊन पोहोचल्याबरोबर अनुभवला होता. त्यानंतर आता

आदित्यरामबाबूंच्या तोंडून श्रीकेदारनाथच्या शिखराचीं अत्यंत विलोभनीय सृष्टिसौंदर्यात्मक वर्णनें ऐकून मी तिकडे जावयास जास्त उत्सुक झालों. आणखी असेंहि ऐकलें की एक साहेब प्रवासी श्रीकेदारनाथचें सुविशाल व सुंदर दृश्य अवलोकून इतका मुग्ध झाला होता की त्याने आपल्या प्रकाशित केलेल्या प्रवास-वर्णनांत स्पष्टपणें लिहून टाकलें की तसलें विशाल व मनोहर सृष्टिसौंदर्य त्याला आणखी कुठेच आढळलें नाही. आदित्यराम-बाबू मोठे सरळ मनाचे होते. ते म्हणाले की महामायेचा पगडा पाहा इतका जबरदस्त की श्रीकेदारनाथच्या त्या पवित्र परिसरांतहि त्यांना मुलाबाळांची व घरादाराची आठवण होऊन रडूं कोसळलें. असो. माझा तो दिवस तर मोठ्या आनंदांत व चांगल्या रीतीने पार पडला.

### उखीमठाचे महंतजी

संध्याकाळच्या वेळीं आम्ही दोघेहि उखीमठांतील देव-देवतांच्या दर्शनास गेलों. गिरिजापति कैलासनाथ महादेव या मठाचें प्रमुख दैवत आहे. दक्षिणेकडील कोणी एक जंगम* साधु या मठाचा महंत होता. श्रीकेदारनाथचें महंतपदहि यांच्याकडे होतें आणि बाबा केदारनाथाच्या सेवकगणाचें मुख्य

---

*जंगम, लिंगायत, लिंगवस्तु व वीरशैव हीं एकाच संप्रदायाचीं वेग-वेगळीं नांवें आहेत. अंदाजें इ. स अकराव्या शतकाच्या प्रारंभीं दक्षिणेंतील कल्याण नामक नगरीमधे ह्या संप्रदायाचा उदय झाला. ह्याचा प्रधान आचार्य बसव हा असून त्याला हे लोक नंदीचा अवतार मानतात. हे मुख्यत: शिवलिंगाची उपासना करतात. ह्या संप्रदायांतील साधु गळचांत व डोक्या-वरील पगडींत शिवलिंग ठेवतात. यांचे धार्मिक ग्रंथ विशेषेंकरून कानडींत लिहिलेले आढळतात. कर्नाटक, तेलंगण व म्हैसूर ह्या विभागांत यांची बरीच संख्या आढळून येते व यांचीं प्रमुख मठमंदिरेंहि याच विभागांत आहेत.

निवासस्थानहि याच ठिकाणीं आहे. उखीमठ जणु बाबा केदारनाथाचें हेडक्वार्टर ! यात्रेच्या वेळीं दिगदिगन्तरांहून यात्रेकरूंनी आणलेल्या पूजासाहित्याच्या विपुल राशी श्रीकेदारनाथाच्या देवळांतून आणून येथील भांडारांत साठवितात. श्रीकेदारनाथाच्या प्रिय भक्तगणांनी दिलेल्या विविध द्रव्याच्या राशींचे सर्वाधिकारी म्हणजे उखीमठाचे महंतजी. त्यामुळे त्यांचेंहि ऐश्वर्य कांही थोडेथोडकें नव्हतें. असो. आम्हीं मंदिरांत प्रवेश करून भगवंताचें दर्शन घेतलें आणि नतर महंतजीकडे येऊन बसलों. केदारनाथांची गादी. तिचा मानमरातब पाहिजे तितका सर्व होताच. एका सुंदर प्रशस्त चांदव्याखाली सुकोमल अशा उच्चासनावर बसलेल्या महंतजींनी मृदुमंद स्मित करीत आम्हांला बसावयास खुणविलें. महंतजी दिसायला सावळे, व स्थूल प्रकृतीचे होते. त्यांच्या शुभ्र केसावरून व दाढीवरून त्यांना वृद्ध म्हणावयास हरकत नव्हती. महंतजींच्या दिवाणखान्यांत प्रवेश केल्यावर चारहि बाजूंनी जणु सोन्यारुप्याचा सडा पडला आहे असें वाटलें. त्यांच्या समोरच रुप्याच्या दोन मोठाल्या थाळ्या अशरफींनी (मोहरांनी) व रुपयांनी भरगच्च भरल्यामुळे शोभिवंत दिसत होत्या. सोन्याचांदीच्या गदा, छड्या, काठ्या इत्यादि वस्तूंमुळे तें ठिकाण जणु पार्थिव ऐश्वर्याचें आगर वाटत होतें.

केदारनाथ व बदरी विशालजींच्या श्रीचरणांवर दरवर्षी देशोदेशीचे राजेमहाराजे, धनवान् व गरीबगुरीब लोक स्वतःला शक्य असेल तेवढें द्रव्य सढळ हाताने अर्पण करून पुण्य पदरीं पाडतात. त्या राजेरजवाड्यांच्या धनाचे सर्वाधिकारी असलेले महंतजी कांही कमी ऐश्वर्यशाली पुरुष नव्हते. महंतजींच्या

गळ्यांत सोन्याचीं व रुप्याचीं शिवलिंगें (त्यांच्या संप्रदायाचें चिन्ह) रुळत होतीं. उंची वस्त्रप्रावरणांनी नटलेले असे ते एखाद्या धनाढ्य माणसाप्रमाणे बसून होते. ह्या एवढ्या ऐहिक सुखांच्या प्रभावाने ते जणु भारून गेले होते. हें पार्थिव ऐश्वर्य म्हणजेच जणु जीवनांतील सारवस्तु असें त्यांना वाटत होतें. एक तर महंतजी साधुसंप्रदायांतील असून देवळाचे प्रमुख होते, त्यांत पुन्हा विपुल धनसंपत्तीचे स्वामी होते आणि त्यामुळे अर्थातच त्यांचा मानमरातब कांही और होता. दूरवरच्या त्या डोंगराळ विभागांत, एखाद्याच्या भाग्यांत असलें तरच, देशावर मिळणारी एखादी वस्तु क्वचित् कदाचित् पाहावयास वा खावयास मिळते. परंतु श्रीकेदारनाथ व बदरीनारायणाचे महंतगण बसल्या ठिकाणीं अशा अनेक देवदुर्लभ पदार्थांचा उपभोग घेत असतात. मणिमाणकांच्या व सोन्याचांदीच्या त्या झगझगाटामुळे महंतजींचे डोळे जणु धुंद झाले होते. पार्थिव व क्षणभंगुर ऐश्वर्याने परिपूर्ण असलेल्या त्या त्यांच्या दिवाणखान्यांत पाय टाकतांच माझ्या मनांत आलें, विचित्र विश्वब्रह्मांड प्रसवणाऱ्या प्रकृतिदेवीने ज्या अनंत सुषमामय रत्नराशींनी आपलें लीलानिकेतन भरगच्च करून टाकलें व ज्यांच्या विमल व स्वर्गीय ज्योतींनी दशदिशा उजळून निघाल्या त्या विमल ज्योतींच्या प्रवेशाला तो दिवाणखाना जणु निषिद्ध आहे. प्रकृतिदेवीच्या त्या अलोकसामान्य रूपाचें तेज महंतजींच्या भोगविलासपूर्ण दिवाणखान्याच्या द्वाराशीं येताच जणु अंतर्धान पावलें आहे.

### जगदंबेचें माहेर आणि सासर

हिमालयांत मूर्तिमंत अशा प्रकृतिदेवीचा चिरंतन प्रकाश विलसत असतो. येथे आदिशक्ति महामाया उमारूपाने शैलतनया

होऊन अनंत रत्नें धारण करणाऱ्या आपल्या पित्याच्या प्रेमळ कुशींत बसल्या बसल्या समस्त जगत् धवळून टाकीत आहे. आणि क्षणांत जवळच्याच कैलासावर जगत्पालक भगवान् श्रीशंकरांची अर्धांगी बनून कोटि कोटि विद्युल्लतांच्या लख्ख प्रकाशाप्रमाणे असलेल्या तेजाळ स्वरूपानें चराचर ब्रह्माण्डाला देदीप्यमान करीत आहे. जगदंबेचें माहेर व सासर दोन्हीहि येथेच, आणि दोन्हीहि सारखींच वैभवशाली. चिरंतन सौंदर्यानें परिपूर्ण असलेला हिमालय व हर-पार्वतीचें विलास-निकेतन असणारा कैलास दोन्हीहि एकाच प्रकृतीच्या महान् व अतुलनीय अशा वैभवाचीं शिखरें. मा जगदंबा दोन्हीहि ठिकाणीं सारखीच प्रिय आहे. माहेरीं गिरि-राजतनया उमा होऊन ती मेनकेच्या अंकावर पहुडलेली आहे तर कैलासावर शिवसौभाग्यवती राजराजेश्वरी म्हणून जगत्पित्याचा वामांक सुशोभित करीत आहे. आई जगदंबेने आपल्या असीम सामर्थ्यामुळे स्वतःच्या गौरवाने ज्या स्थानाला अखंडपणें गौरव-शाली बनविलें, अनंत विश्वब्रह्माण्डें प्रसवणारी आद्यशक्ति महामाया ही जिथे आपल्या आईच्या कुशींत खेळली बागडली व जिथे परमपुरुष महादेवाशीं नित्य मीलित झाली, अनंतभावमय पुरुषप्रकृतीच्या महामीलनाने जिथे सौंदर्य, सुषमा व शुचिता ओसंडून वाहूं लागलीं, जें ठिकाण म्हणजे पुरुषप्रकृतीची सर्वश्रेष्ठ लीलाभूमि, जें ठिकाण पाहून भोलानाथ शिवशंकर सदाचाच मुग्ध झाला व कैलासनिवासी बनला, ज्या ठिकाणच्या पवित्र दर्शनामुळे ऋषिमुनिगण सहजपणें समाधींत निमग्न होतात, ज्या ठिकाणच्या प्रशांत व पुण्यमय परिसरांत * भगवती अम्बेनें युगांतरींची आपली लीला संपवून पुनश्च त्याच परिसरांत जन्मग्रहण केला व त्यामुळे

* दक्षालय कनखल येथे

ज्या भूमीला "स्वर्गादपि गरीयसी" असें बनविलें, ज्या परमधामांतील अणुरेणूदेखील जगन्मातेच्या बालपणापासूनच्या लीलारसाच्या आस्वादनानें धुंद होऊन चिन्मय झाले आहेत आणि जें स्थान जगदंबेच्या अनंत महिम्यानें जणु फुंकरलेलें आहे,--आई, जगदंबे, तुझी चिरंतन विलासभूमि असलेल्या त्या महापवित्र व देवदुर्लभ स्थळीं तुझ्याच अघटनघटनापटीयसी मोहिनी मायेनें मूढ बनलेले महंतजी सामान्य विषयसंपत्तीच्या मोहांधकारानें ग्रासून गेले आहेत ! आई, तुझ्या एवढ्या मोठ्या महिम्याची मुळीच जाणीव न ठेवणाऱ्या महंतजींची लालची चंचल दृष्टि, चिरशांति वर्षविणाऱ्या तुझ्या अनंत रूपांकडे किंचित् देखील न वळतां, येणाऱ्या यात्रीगणांकडेच पुनः पुनः, पुनः पुनः घोटाळत आहे. आई, धन्य तुझी ! धन्य तुझी माया ! !

### विश्वराजधानीचें महाद्वार

ज्या उखीमठांत पोहोचल्यावर माझ्या मनांत इतके अनत विचार आले, ज्या स्वर्गीय दृश्याच्या अवलोकनानें माझ्या मनांत असा पालट झाला, त्या विस्मयजनक, विचित्र, रम्य ठिकाणीं आल्यावर व तें अपूर्व दृश्य पाहिल्यावर कुणाचीहि माझ्यासारखीच अवस्था होईल. ह्या ठिकाणाची महती सांगण्याच्या उद्देशानें मीं एवढें हें आता लिहिलें खरें, पण मला वाटतें माझ्यानें कांहीच सांगून झालें नाही. त्या अदृष्टपूर्व पवित्र स्थानाच्या आठवणीनें मला अंतःकरणांत जितकें वाटतें, त्यांतील थोडेंदेखील भाषेमधे मी प्रकट करूं शकत नाहीं. समोर पाहिलें असतां उखीमठाहून हिमालयाचें जें अपार व सौंदर्यशाली दर्शन घडतें त्यावरून मनांत येतें की, जणु विश्वराज्याच्या अधीश्वरानें जवळच आपली

राजधानी वसवली आहे व तिथे तो सदासर्वदा विराजमान आहे. त्या विश्वराजधानीचें उखीमठ जणु एक प्रमुख महाद्वार आहे.

जाऊं द्या ! महंतजींबरोबर थोडा वेळ इकडचें तिकडचें बोलणें झाल्यावर आम्ही दोघे परत फिरलों. महंतजींबरोबर झालेलें बोलणें कांही विशेष महत्त्वाचें होतें असें वाटत नाही. आदित्यरामबाबूंना गढवालच्या डेप्युटी कलेक्टराबद्दलच ते राहून राहून विचारीत होते.

**मला वाटलेला हर्ष-विषाद**

उखीमठांत आल्यावर श्रीनगरांतल्याप्रमाणे येथेहि मी एका बाबतींत फार निराश झालों. उत्तराखंडांत प्रवेश केल्यावर जें दृष्टीस पडेल असें वाटलें होतें त्यापैकी कांहीच आढळलें नाही. आणि जें पाहीन असें स्वप्नांतदेखील वाटलें नव्हतें तें मात्र नजरेस पडलें. उत्तराखंडांत प्रवेश करावयाच्या अगोदर वाटत होतें की आता कितीतरी विरक्त साधुपुरुषांना ह्या ठिकाणीं साधनभजन करतांना पाहीन, संन्याशांच्या मठांत शेकडो महापुरुष सतत परमात्मध्यानांत निमग्न असलेले पाहीन, वेदान्तचर्चेमधे वा लोकांच्या सेवेंत गढलेले पाहीन; परंतु उत्तराखंडांतील या दोन मठांत जें दृश्य पाहिलें त्यायोगें माझ्या मर्मावर खोल घाव बसला. ज्या गोष्टींची कल्पना केली होती त्यांपैकी कोणत्याच या दोन मठांत आढळल्या नाहीत. आणि जें मनांतसुद्धा आलें नाही——जसें, नगाधिराज हिमालय इतका सुंदर व महान् आहे, तो अपार सौंदर्यराशींनी घनीभूत झालेला एक प्रचंड पुतळा आहे, आणि त्याच्या दर्शनाने माणसाचें हृदय इतकें उन्नत व पावन होऊन जातें—तें मात्र अभावितपणें आढळून आलें. प्रकृतिदेवीचें एक-मात्र विशाल, विविधरंगी लीला-निकेतन असलेल्या हिमालयाच्या

दर्शनाने माझें वैषम्य दूर झालें, आणि मला कल्पनातीत आनंद वाटूं लागला. हिमालयाच्या विराट दर्शनाने मी इतका मोहून गेलों होतों की पुढे तिबेटभ्रमणांत खडतर अशीं चार पांच वर्षें घालवूनहि हा माझा हिमालयाविषयीचा मोह ओसरला नाही.

हिमालयांतील पवित्रतम तपोभूमि असलेल्या ज्या बदरिकाश्रमांत साक्षात् भगवंतांनी नर-नारायण रूप घेऊन अनेक युगें दिव्य तपस्येंत घालविलीं आणि त्या त्यांच्या तपस्येमुळे बदरिकाश्रमाचें माहात्म्य भूतलावर अतुलनीय असें झालें, जगन्माता गौरीने ज्या ठिकाणीं खडतर तपश्चर्या करून जगत्पिता महादेव आपलासा करून घेतला, ज्ञानीगणांचा मुकुटमणि, भक्तचूडामणि अशा उद्धवाला भगवंतांनी ज्या ठिकाणीं तपाचरण करण्यास धाडलें, महामुनि वेदव्यास स्वत:च्या शिष्यवर्गासह ज्या ठिकाणीं वेदपठनांत नित्य निमग्न असत, अनंत कालापासून जें ठिकाण केवळ तपस्या व भगवंताची आराधना यांच्यासाठीच निर्धारित केलें गेलें, सर्वतोपरी तपस्येला अनुकूल अशीच ज्या ठिकाणाची भगवंतांनी रचना केली, पूज्यपाद श्रीशंकराचार्यांनी अनेक मंदिरें व मठ स्थापन करून ज्या ठिकाणाला अध्यात्मविद्येचें शक्तिशाली केंद्र बनविलें, अखिल शास्त्रग्रंथांत ज्या ठिकाणाचा महिमा विशेष रूपाने वर्णिला आहे व जें ठिकाण आत्मचिंतनपरायण, तपक्लिष्ट आचार्य-ऋषिमुनिगणांचें एकमेव आश्रयस्थान आहे--त्याच हिमालयांतील मठमंदिरांची अवस्था, एखाद्या प्रभावी संघटकाच्या अभावीं दुर्दशेच्या पराकोटीला गेलेली पाहून कुणाला प्राणांतिक वेदना होणार नाहीत ? ज्या महान् उद्देशाच्या पूर्तीसाठी पूर्वीच्या आचार्यांनी या सर्व मठांची संस्थापना केली त्या उद्देशाचा मागमूसहि कोठे दिसूं नये ही किती विषाद वाटण्यासारखी गोष्ट

आहे ! उत्तराखंडांतील मठांतून साधुसंन्याशांच्या वा समाजांतील लोकांच्या हिताच्या दृष्टीने कोणीं कांही केलें नाही आणि करीतहि नाहीत. मठाधिपति महंतगण फार तर देवपूजेची व्यवस्था करून निश्चिंत बसतात, आणि दरवर्षी यात्रेच्या वेळीं यंदा किती चढाव (देवपूजेसाठी भक्तांनी अर्पिलेलें द्रव्य, पूजासाहित्य इत्यादि) होईल, किती लोक येतील, कोणकोणत्या संस्थानाचे राजेरजवाडे येणार आहेत, असल्या बाष्कळ गप्पांतच त्यांचा उरलेला सहा महिन्यांचा काळ निघून जातो. दूरदूरच्या प्रदेशांतून आलेल्या यात्रेकरूंनी आणि भक्तजनांनी दिलेल्या मूल्यवान वस्तूंचा ते आपल्याच परिवारांतील लोकांसह आनंदाने उपभोग घेतात. देवाचें पुजारीपण त्यांच्याकडे असल्यामुळे सर्वप्रकारच्या मूल्यवान जिनसा त्यांना सहज मिळतात. ज्या डोंगराळ मुलुखांत गुळाचा एखादा खडा हातीं घेऊन बऱ्याच लोकांना लालूच दाखवितां येते तसल्या मुलुखांत हे महंत विविध प्रकारच्या मेवामिठाईची आपल्या आपल्यांत खैरात करतात.

### संन्यासी आणि गृहस्थ

ह्या अवघ्या मठांतील व मंदिरांतील महंतगणापासून देशहिताच्या व समाजहिताच्या गोष्टींची ज्या प्रमाणांत अपेक्षा असते तितकी इतर कुणाकडूनहि असूं शकत नाही. एक ऐश्वर्यशाली गृहस्थाश्रमी पुरुष व एक भगवी कौपीन धारण करणारा संन्यासी यांच्यामध्ये अंतर इतकेंच की ऐश्वर्यवान गृहस्थाने आपल्या धनसंपत्तीद्वारें परोपकार करावा पण निष्कांचन संन्याशाने लोकसेवेसाठी प्रसंगीं आपले प्राणसुद्धा देण्यास तयार असावें. या ठिकाणीं मी पुरातन काळांतील आदर्श गृहस्थ वा आत्मत्यागी संन्याशांच्या गोष्टी सांगत नाही. आजकालच्या परिस्थितीला

धरूनच बोलतों आहें. एखादा धनवान माणूस कितीहि उदार असला तरी, लोकसेवेसाठी आपलें धन तो देईल, पण स्वतःच्या प्राणांवरील ममता एकदम सोडून देणें त्याच्या बाबतींत इतकें सोपें नसतें,बायकापोरांचे प्रेमळ पाश त्याच्याने तोडवत नाहीत. परंतु संन्याशाची गोष्ट वेगळी. मायेचे धागे कितीहि पसरले तरी कुणीहि ज्या विरक्त संन्याशाला ह्या संसारांत अडकून ठेवूं शकत नाही, हें माझें माणूस असें म्हणण्यासारखें ज्याला कुणीहि नसतें, तरीपण विश्वांतील सर्वजण ज्याला अत्यंत जवळचीं अशीं माणसें वाटतात, त्या वैराग्यवान पुरुषालाच आपल्या क्षणभंगुर जीविताची पर्वा न बाळगतां लोकसेवा सहजपणें करतां येते. म्हणून म्हणतों की ह्या सर्व मठांतील महंतगण आपल्या आपल्या शिष्यांसह तन मन धन देऊन जितकी लोकसेवा करूं शकतील तितकी दुसऱ्या कुणाच्याच बाबतींत शक्य नाही. परंतु पाहा किती खेदाची गोष्ट की ज्यांचें धन व प्राण दोन्हीहि 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' खर्च व्हायला पाहिजेत ते हे महंत आपल्या मूठभर परिवाराच्या क्षणिक सुखोपभोगाकरिता हातीं आलेलें धन उधळत असतात.

उखीमठाचे महंतजी दरवर्षी देवबाप्पा केदारनाथाचें मंदिर खुलें करून देतात व खाली परत येतात. मंदिरविषयक बाकीचीं इतर सर्व कामें ते आपल्या शिष्यांच्या व चाकरांच्या मार्फत करवून घेतात. लागोपाठ सहा महिने केदारनाथ येथे काढणें म्हणजे कांही साधी गोष्ट नाही. केदारनाथ येथील कडाक्याच्या थंडीमुळे आणि आणखी कांही गैरसोयींमुळे महंतजी तिथे राहूं शकत नाहीत. भगवान केदारनाथांच्या पुजारीपदावर नेमणूक झाली असूनहि महंतजी केदारनाथांची सेवा करूं शकत नाहीत. आणि तरीहि देवाच्या सर्व संपत्तीचे सर्वाधिकारी मात्र महंतजीच. जीं माणसें

सतत सहा महिने तसल्या त्या दारुण थंडींत दररोज स्नानसंध्यादि आह्निकें आटोपून केदारनाथांची सेवाअर्चा करतात, त्यांचें दैन्य पाहिलें की हृदय फाटून जातें. इतके सर्व कष्ट उपसल्यावर महंतजी-कडून जे कांही थोडेसे दाणेदुणे मिळतील तेवढ्यावरच त्यांना संतुष्ट राहावें लागतें. हीहि एक मोठी विसंगत गोष्ट आहे.

### कांबळें मिळविलें

जाऊं द्या तें. आदित्यरामबाबूंच्या सहवासांत उखीमठांतील एक रात्र मोठ्या आनंदांत पार पडली. त्यानंतर दुसऱ्या दिवशीं पहाटेस त्यांचें बदरीनारायणाकडे जायचें ठरलें. बोलण्याबोलण्यांत त्यांच्याकडून कळलें की केदारनाथाला येत असतांना वाटेंतील चोप्ता चट्टीमधे स्वामी विज्ञानानंद सरस्वती नांवाचे एक शास्त्र-पारंगत महाराष्ट्रीय संन्यासी महाराज त्यांना भेटले होते. संस्कृतांतील त्यांचें अस्खलित व सुंदर बोलणें ऐकून आदित्यराम-बाबू खूप प्रभावित झाले होते. मीहि मग चोप्ता चट्टीस जाऊन संन्यासी महाराजांची भेट घेण्याचें मनांत ठरविलें. दिवस थोडासा वर आल्यावर आदित्यरामबाबू उखीमठाहून बिदा झाले. माझ्या-जवळ पुरेसे गरम कपडे नाहीत हें पाहून, एक कांबळें घेण्यासाठी दोन रुपये ते जातांना देऊन गेले. ते दोन रुपये हातीं धरून मी विचार करूं लागलों की ह्या दोन नाण्यांच्या बदल्यांत कोण आता मला कांबळें देणार ? कपड्यांमधे माझ्याजवळ फक्त एक कफनी होती. कारण श्रीनगरला मिळालेलें कांबळें मीं गुप्त-काशींतल्या त्या साधूला मागेच देऊन टाकलें होतें. बदरिका-श्रमाहून परत येतांना हळूहळू गरम कपड्यांची तेवढी गरज भासत नाही पण केदार व बद्रीनारायण येथील असह्य थंडीसाठी सर्वांनाच गरम कपड्यांची आवश्यकता असते. अजून मी केदार

व बद्रीनारायणला जाऊन पोहोचलों नव्हतों. अर्थात् मला एका घोंगडीची नितान्त आवश्यकता होती असें म्हटलें, तर मला वाटतें, हें म्हणणें कुणालाहि पटावें. दोन रुपयांत तर कांही थंडी दूर पळत नाही, आणि एक महंतजी सोडले तर उखीमठांतील सर्वच रहिवासी इतके कंगाल दिसले की त्यांच्याजवळ कांही मागावें असें माझ्या मनांत देखील येईना. त्यांचींच चिल्लींपिल्लीं नि पोरेंठोरें हिमालयाच्या त्या थंडींत गरम कपड्यांच्या अभावीं कुडकुडत होतीं. त्यावर पुन्हा ऐकलें की दोन रुपयांत कांबळें कुठेच विकत मिळणार नाही, आणखी पैसे लागतील.

ह्या सर्व गोष्टींमुळे मीं मग विचार केला की आता महंतजींनाच हे दोन रुपये नजराणा म्हणून देऊन टाकावे, आणि त्यांच्याकडेच एक कांबळें मागून घ्यावें. असें मनाशीं ठरवून मी तडक महंतजींकडे गेलों आणि त्यांच्या पुढील, रुपये-मोहरांनी भरलेल्या थाळींत ते दोन रुपये टाकले व बसून राहिलों. महंतजींच्या बैठकींत प्रवेश केला तेव्हा त्यांच्या अर्धोन्मीलित नेत्रांवरून ते कसल्या तरी विचारांत मग्न असावेत असें वाटलें. पण पाहा, चांदीच्या तुकड्यांच्या छन् छन् आवाजाची मोहिनीशक्ति इतकी जबरदस्त की महंतजींची तंद्रा एकदम भंग पावली. उत्फुल्ल नेत्रांनी एकवार त्यांनी माझ्याकडे पाहिलें. दोन रुपड्यांचा नजराणा दिल्याबरोबर महंतजींनी माझ्याविषयी जो प्रसन्नपणा दाखविला, त्याचा एकशतांशहि, आदल्या दिवशीं रिक्तहस्ताने त्यांच्या भेटीस गेलों असतां दिसला नाही. असो. त्यानंतर मला चार दोन प्रश्न विचारून झाल्यावर आणि माझी दशा व वेशभूषा पाहिल्यावर त्यांना नक्की कळलें असावें की आता या माणसाजवळ फुटकी कवडीहि नाही. नंतर मी मनांतच विचार करूं लागलों की, दोन

रुपये तर हातावेगळे झालेच आहेत, आता एखादें कांबळें मिळालें की मिळवली. थोड्या वेळाने महंतजींनी ताडलें की त्यांच्या त्या ऐश्वर्यसिंधूमधे बिंदुस्वरूप असलेल्या माझ्या दोन टिकल्या निःस्वार्थ भावनेने कांही पडल्या नाहीत. मग मोठ्या प्रयासाने आपल्या भांडारांतून एक कांबळें आणवून त्यांनी मला दिलें. कांबळें चांगलें घट्ट व मजबूत असून त्याच प्रदेशांत विणलेलें होतें. कांबळें खांद्या-वर टाकून मी बाहेर पडलों. महंतजींच्या चाकरांच्या व गावांतील लोकांच्या मुद्रेवर विस्मय उमटलेला दिसून येत होता. ते मला म्हणूं लागले, "बाबाजी, आहां बुवा तुम्ही खरे बहादुर ! आमच्या महंतजीकडून अदमासे तीन रुपयांची घोंगडी काढली पाहा तुम्हीं!" कोणीकोणी म्हणूं लागले, "अगोदर तुम्ही ती दोन रुपयांची भेट चढवली नसती तर हें कांबळें कांही तुम्हांला मिळालें नसतें." सांगा आता, महंतजींच्या उदारतेचा यापेक्षा आणखी कोणता परिचय पाहिजे !

### गुप्तकाशीस परत

मी त्याच दिवशीं उखीमठाहून गुप्तकाशीला परत आलों. गुप्तकाशीहून ज्या वाटेने गेलों होतों, येतांना त्याच वाटेने आलों केदारनाथला जाणारा रस्ता उखीमठापासूनहि आहे. पण केदार-नाथाचें दर्शन घेऊन बदरीनारायणाला जायचें म्हटलें म्हणजे सर्वांना उखीमठावरूनच जावें लागतें. म्हणून मला पुनः एकदा उखीमठाला यावें लागणार होतें. शिवाय गुप्तकाशीहून गेलों नसतों तर केदारनाथच्या वाटेवरील पाहण्यासारखीं अनेक स्थळें पाहतां आलीं नसतीं. म्हणून मी पुनश्च गुप्तकाशीला आलों होतों. आणि त्या उदारहृदयी साधुमहाराजांची आणखी एकदा भेट झाल्यामुळे माझ्या आनंदांत भर पडली. गावांत आल्याबरोबर

पहिल्याप्रथम त्यांचीच भेट झाली. मी समोर दिसल्याबरोबर स्नेहपूर्ण सद्गदित कंठाने "प्रसाद घ्या, प्रसाद घ्या" असें म्हणून त्यांनी मला मोठ्या आदराने जवळ बसविलें, आणि ती रात्र गुप्तकाशींत घालविण्यासाठी ते मला विनवणी करूं लागले.

### उदासी साधूबरोबर

येथे जुनी ओळख असलेल्या एका साधूची अचानक भेट झाली. त्यांना मीं फार पूर्वी कलकत्त्याजवळील काशीपूरच्या सर्वमंगला देवीच्या मंदिरांत प्रथम पाहिलें होतें. साधु उदासी* म्हणजे गुरु नानक यांच्या संप्रदायांतील होते. त्या वेळीं वर्धमान येथे जाऊन जवळ जवळ एक महिना आम्ही बरोबर राहिलों होतों. लोकांची वर्दळ नसलेल्या निवांत स्थळीं एकाकी राहणें त्यांना फार आवडत असे. साधूंच्या जथ्थ्यांत वा लोक जमतील अशा ठिकाणीं हे बसत नसत. वर्धमान येथे असतांना त्यांची एकांतप्रियता मला चांगलीच माहीत होती. त्यांच्या मधुर बोलण्यावरून व आचारव्यवहारावरून ते फार वर पोहोचलेले साधुपुरुष असावेत अशी माझी धारणा झाली होती. त्यांची अशी अकस्मात् गांठ पडल्यामुळे मला फार बरें वाटलें. गुप्तकाशीमध्ये एक रात्र काढून दुसऱ्या दिवशीं पाहाटेस आम्ही दोघेहि केदारनाथच्या दिशेने वाट चालूं लागलों.

माझ्या सहप्रवासी महापुरुषाजवळहि गरम कपड्यांचा अभावच होता. त्यांच्या डोकीस एक साध्या कापडाचा फेटा, अंगांत एक फाटकी पैरण, आणि जवळ ठिकठिकाणीं फाटून भोकें

---

* पंजाबमधे उदासी व निर्मला संप्रदायांतील साधूंचें बरेंच प्राधान्य आहे. खालसा शीख पंथांतील साधूंना निर्मलापंथी म्हणतात. गुरु नानकांपासून गुरु गोविंदसिंहांपर्यंत सर्वांनाच हे आचार्य म्हणून मानतात.

पडलेली एक घोंगडी होती. याशिवाय त्यांच्याजवळ कांहीच नव्हतें. पैश्याअडक्यांच्या बाबतींत तर आम्ही दोघेहि सारखेच ! इकडे आम्ही जसजसे वर चढूं लागलों तसतसा थंडीचा जोर वाढूं लागला. माझ्या अंगांत लोकरीची एक कफनी होती, त्यांच्याजवळ उनी कपड्यांत त्या फाटक्या सच्छिद्र घोंगडीशिवाय कांहीहि नव्हतें. अर्थातच मग मीं उखीमठाहून आणलेलें कांबळें त्यांना दिलें व त्यांची ती छिद्रशतांनी अलंकृत असलेली घोंगडी मीं घेतली. माझें नवें कांबळें त्यांना दिल्यामुळे त्यांची गरम कपड्यांची गरज बरीचशी दूर झाली. साधुमहाराजांकडून घेतलेली ही फाटकी घोंगडी आणि माझी कफनी ह्या दोन वस्तूंचा वियोग मात्र मग मला घडला नाही. ह्या दोन वस्त्रांनिशीच मी त्या वर्षीं तिबेटमधे गेलों.

गुप्तकाशीहून निघतांना आम्ही दोघेहि बरोबर निघालों खरें, पण वाटेंत आमची जोडी अजीबात फुटत गेली. पुढे जाऊन मी एखाद्या ठिकाणचें प्राकृतिक सौंदर्य पाहत विश्राम करूं लागलों म्हणजे साधुमहाराज येऊन मला गांठत. रात्रीं बहुधा आम्ही एकाच चट्टींत राहत असूं.

### फाटाचट्टी

गुप्तकाशीहून कित्येक कोस वर चढल्यावर फाटाचट्टींत येऊन पोहोचलों. ही चट्टी इतर अनेक चट्ट्यांपेक्षा थोडी मोठी आहे आणि येथे दगडाविटांचीं पक्कीं घरें आहेत. फाटाचट्टीच्या स्वामीजीशीं येथे पुन: आमची भेट झाली. त्यांनी मला भिक्षा दिली आणि माझ्या सोबतच्या उदासी साधुमहाराजांना (ते फलाहारी असल्यामुळे) फळें दिलीं. फाटाचट्टींत उत्कृष्ट पहाडी मध खाण्यांत आला. तो पाहायला चांगला गाईच्या तुपाप्रमाणे रवाळ

दिसत होता. त्याच्या सुगंधाविषयी काय सांगूं ? हिमालयांत फुललेल्या असंख्य वनकुसुमांचा सुगंध त्या मधामधे जणु एकत्रित झाला होता. जरी हिमालयांतील मध सर्वत्र प्रसिद्ध आहे आणि जरी मीं कितीतरी प्रकारचा पहाडी मध सेवन केला होता, तरी फाटाचट्टीच्या त्या सुमधुर व सुगंधयुक्त मधासारखा मध मला कुठेच मिळाला नव्हता. आणि इथला मध इतका उत्कृष्ट कां बरें असणार नाही ? कारण केदारनाथच्या पायथ्याजवळील गौरी-कुंडापासून गुप्तकाशीपर्यंत आणि त्रियुगीनारायण इत्यादि ठिकाणीं जणु सतत वसंत फुललेला असतो. ही सर्व जागा घनदाट अशा पर्णराजींनी नि लतावितानांनी सदा आच्छादिलेली व रंगीबेरंगी फुलाफळांनी सदा सुशोभित अशी असते. अर्थात् असल्याच ठिकाणीं सर्वोत्कृष्ट मध मिळणें स्वाभाविक आहे.

### त्रियुगीनारायण

असो. त्यानंतर फाटाचट्टीहून आम्ही त्रियुगीनारायणास जाऊन पोहोचलों. केदारनाथाच्या मार्गावर घडणारें त्रियुगीनारायणाचें दर्शन विशेष उल्लेखनीय असें म्हणावें लागेल. गुप्तकाशीहून त्रियुगीनारायणास पोहोचावयास दोन दिवसांपेक्षा जास्त अवधि लागला नाही. गुप्तकाशीहून जसजसे आम्ही वर चढूं लागलों तसतसा खालचा सर्व भूप्रदेश धनदाट अरण्याने झाकलेला, अनेक धबधब्यांनी न्हाऊं घातलेला, आणि शेकडो प्रकारच्या पक्ष्यांच्या कंठांतून निघालेल्या गोड किलबिलाटामुळे ध्वनिपूर्ण असा भासत होता. एका अत्यंत उंच व प्रशस्त अशा भूखंडावर त्रियुगीनारायण प्रतिष्ठित असून भोवती पांढऱ्याशुभ्र हिममय पर्वतांच्या रांगा आहेत. ह्या पर्वतांचा वरील भाग शुभ्र हिमराशींनी झाकला आहे आणि खालील अर्ध्या भागांत नवी पालवी फुटलेल्या देवदार व

तत्सम वृक्षांची दाटी झालेली आहे. पर्वतराजींचें अर्धांग अति धवल व अर्धांग घनश्याम वर्णाचें असल्यामुळे पुन: माझ्या मनांत आलें की मी हरिहराच्या विराट मूर्तीच्या चरणांशीं उभा आहें अखिल देवीदेवतांचें हें एकत्र संमेलन पाहूनच, मला वाटतें, कालिदासाने "देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः" असें म्हटलेलें आहे. गिरिराज हिमालयाला इतक्या सुंदर अर्थपूर्ण नांवाने संबोधन करणारा दुसरा कुणी अजून आढळला नाही.

### अखंड धगधगणारी धुनी

त्रियुगीनारायणाचें मंदिर कृष्णपाषाणांचें आहे. मंदिराबाहेरील मंडपांत एक मोठें अग्निकुंड धगधगत असतें. असें ऐकलें की हें अग्निकुंड गेल्या तीन युगामधे कधीच विझलें नाही. इतक्या वर्षांपासून सारखें पेटलेलें आहे. तें भलें मोठें अग्निकुंड झाडांच्या प्रचंड ओंडक्यांनी सतत पेटलेलें पाहून मनांत येतें की खरेंच, युगयुगांतरापासून स्वत: भस्मीभूत होऊन हें कुंड भक्तगणांच्या व यात्रेकरूंच्या थंडीला दूर पळवून देतें. श्रीत्रियुगीनारायणाच्या मंदिरामुळे गावाचेंहि नांव त्रियुगीनारायण असें पडलें. गावांतील लोकसंख्या बरीच आहे. गावांत राहणारे ब्राह्मण त्रियुगीनारायणाचे पंडे व पुजारी. वर्षांतून सहा महिने यात्रेकरूंपासून जें कांही मिळेल तेवढ्यावरच त्यांना भागवावें लागतें. येथे सतत थंडी असते, आणि तिच्या जोडीला बर्फावरून वाहणारे थंडगार वारेहि वाहत असतात. आभाळ नेहमी मेघांनी झाकलेलें असल्यामुळे हवेंत एकप्रकारची आर्द्रता वाटते. येथे प्रचुर प्रमाणांत बर्फ पडत असल्यामुळे हिवाळ्यांत हें ठिकाण अत्यंत दुर्गम असें होतें. असो. त्यानंतर मीं त्रियुगीनारायणाच्या निर्मल जलपूर्ण कुंडांत स्नान केलें, बुड्या मारल्या आणि त्या तीन युगांपासून पेटलेल्या अग्नि-

कुंडांतील भस्म सर्व अंगभर माखून धन्य झालों. ह्या विशाल अग्निकुंडामुळे सपाटीवरील भूप्रदेशांच्या यात्रेकरूंची मोठी सोय झाली आहे. थंडीने कुडकुडत येणारे यात्रेकरू भक्त जेव्हा ह्या धगधगणाऱ्या अग्निकुंडाच्या चोहोबाजूंनी बसून शेक घेतात तेव्हा मनांत येते की जणु भक्तवत्सल भगवंतांनी आपल्या भक्तांची शीतबाधा दूर करण्यासाठीच ही महाधुनी रात्रंदिवस अखंडपणें पेटती ठेवली आहे.

**हिमालय साहस व उत्साह देतो.**

आता जितकें आठवतें तेवढ्यावरून वाटतें की मी बहुधा त्रियुगीनारायण येथे फार तर दोन रात्री काढल्या असाव्यात. त्यानंतर तिसऱ्या दिवशीं एका सकाळीं तेथून गौरीकुंडाकडे निघालों. गौरीकुंडाहून बाबा केदारनाथांचें मंदिर सहा कोस येईल. येतां येतां वाटेंत ऐकलें की गौरीकुंडाहून केदारनाथपर्यंत एक-सारखी प्रचंड चढण आहे, कुठेच न विसावतां भला मोठा पहाड चढावा लागतो. हें ऐकल्यापासून वाटू लागलें की केदारनाथला पोहोचण्यापूर्वी आता आपल्यालाहि कठीण अशा वाटचालीचे श्रम अनुभवावे लागतील. मसुरीहून निघाल्यापासून कितीतरी पहाड मी चढलों-उतरलों होतों. पण एकदाहि चालण्याचे श्रम हिमालय-दर्शनाच्या आनंदाला पराभूत करूं शकले नव्हते. उत्तराखंडाची यात्रा सुरू करतांना अयोध्येच्या एका शहाण्या व माहीतगार साधूने म्हटलें होतें की, "बदरिकाश्रम एक महान् व पवित्र तीर्थक्षेत्र आहे यांत संशय नाही, पण पहाडावरील तो भयानक मार्ग पायाखाली तुडवितां तुडवितां तीर्थदर्शनाविषयीची स्पृहा व तीर्थक्षेत्राविषयी असलेली श्रद्धा हळूहळू लोप पावते." पण केदार व बदरीनारायणाच्या यात्रेनेच त्यांना जेवढा त्रास

१०६८४

झाला, त्यासारखा त्रास मी तीन वेळां तिबेटच्या मार्गानें जाणें-येणें करूनहि मला झाला नाही. हिमालयांत प्रवेश केल्यापासून माझी अगदी ठीक त्यांच्या उलट अवस्था झाली. हिमालयांत प्रवेश केल्यापासून हळूहळू त्याच्या अंतरंगांत जाण्याची माझी इच्छा प्रबळ होत गेली. "देवतात्मा" हिमालयाच्या पुण्य दर्शनाने मी इतका विस्मयचकित होत गेलों की त्याचें तें विराट, पवित्र स्वरूप जितकें जितके अधिक दृष्टीस पडेल, तितकी तितकी माझी दर्शनेच्छा कमी न होतां उलट वाढतच जाई. जीं उंच शिखरें समोर दिसत त्यांच्या पल्याड आणखी काय असावें हें पाहण्यासाठी माझे प्राण कासावीस होत. जसजसा पुढे जात गेलों तसतशा हिमालयाच्या दृश्यांच्या अभिनव रांगा माझें मन व प्राण हरखून टाकूं लागल्या आणि त्यांच्या अलौकिक प्रभावाने मी इतका मोहून गेलों होतों की कठीण वाटचालीच्या कोणत्याहि कष्टांनी माझें अवसान खचलें नाही वा हातपाय गळाले नाहीत. उलट दरवेळीं माझें हृदय श्रद्धेने, साहसाने, उत्साहाने भरून येत असे.

### संगमावर

त्यानंतर मग मी पुण्यदर्शन हिमालयाच्या अनुपम रूप-माधुर्याचा आस्वाद घेत घेत त्रियुगीनारायणाहून गौरीकुंडाकडे जाऊं लागलों. वाटेंत नदीसंगमाचें एक रमणीय दृश्य दिसलें. संगमांत स्नान केल्यावर मन समाधानाने भरून आलें. थोडा वेळ विसावा घेतला आणि अंगांत पुनः जोम जमा झाला. येथे देवलोकींच्या मंदाकिनी नदीला कालीगंगा नांवाचा एक घननीळ प्रवाह येऊन मिळाला आहे. ह्या कालीगंगा प्रवाहांतील निळेभोर पाणी पाहिलें नि मनांत म्हटलें, "खरेंच, ह्या प्रवाहाचें 'काली' हें उपपद यथार्थ आहे."

मंदाकिनी व कालीगंगा यांच्या पावन संगमांत स्नान करून कांही वेळ आराम केला. मंदाकिनी व कालीगंगा ह्यांचा हा मनोरम संगम पाहून मनांत येतें की ह्या दोघी जणु हिमालयाच्या जुन्या कन्या, देवभूमि असलेल्या, आपल्या पिताजींच्या अधिराज्यांत फेरफटका मारण्याच्या उद्देशाने, मर्त्यचक्षूंना अगोचर असलेल्या सुरम्य व निगूढ अशा तात हिमालयाच्या मणिमय प्रासादांतून एकमेकींपासून विलग होऊन नाना वनें, उपवनें पायांखाली तुडवीत येथे येऊन पुनश्च एकमेकींना भेटल्या आहेत. कालिंदी यमुना जणु यांचीच ज्येष्ठ भगिनी, कोणतें तरी विशेष कार्य साधण्यासाठी म्हणूनच एकजीव झालेल्या जुळ्या बहिणींचा प्रेमळ सहवास व माहेरची ममता दूर सारून ती देशांतरीं वाहत गेली आहे.

### हिमकन्यकांचें अवतरण

गिरिराज हिमालयाच्या त्या एकाच दिव्य मणिमय महालांतून बाहेर पडून, पुण्यतोया भागीरथी गंगा, यमुना, मंदाकिनी व अलकानंदा ह्या, कितीतरी झुळझुळणारे झरे, पाणलोट, नदनद्या यांना आपल्यांत सामावून घेत घेत, आणि त्यामुळे चांगल्याच मोठ्या होत होत, तरंगलहरींनी थरथरणाऱ्या वक्षांत परस्परविरोधी अशा विविध भावभावनांना धारण करीत, नाना ठिकाणीं वेडीवाकडीं वळणें घेत तरतरा एकसारख्या पुढे पळताहेत. कुठे विविध रागरागिणी गात, उसळलेल्या लहरींच्या तालावर नृत्य करीत करीत, सतत होणाऱ्या सुमधुर कलध्वनीमुळे निर्जन व निस्तब्ध असलेला तो विस्तृत गिरिप्रदेश बोलका करून विश्वस्रष्टयाच्या अनंत महिम्याचें गुणगान गात आहेत, आणि रसज्ञ भावुक अशा भक्तहृदयाला भावसमुद्रांत डुंबवत आहेत; तर कुठे कुठे भीषण भोवरे असलेल्या घोर नद्यांचें रूप घेऊन प्रबल वेगाने

आपला विक्रम दाखवीत जणु अवघ्या भूतलाला आता रसातळीं नेणार अशा पवित्र्यांत आहेत. त्यांच्या दिग्दिगंतरीं ऐकूं जाणाऱ्या महाभयंकर अशा प्रचंड गर्जना चालल्या आहेत आणि शेकडो वज्रांची शक्ति असलेल्या दंतांनी दुर्भेद्य पहाडांना विदीर्ण करणें, अति उंच कड्याकपारांवरून खाली खोलवर उड्या टाकून प्राणि-मात्रांना भयाकुल करणें चाललें आहे. महाकाल रुद्राच्या त्या प्रलयकालीन तांडवनृत्याचा अभिनय कुठे संपतो न संपतो तोंच त्या कल्लोलकोलाहल करणाऱ्या नद्या आपलें भीषण संहारक रूप सावरून घेऊन पुन: शांत, विमलसलिला झाल्या आहेत. जणु विश्वप्रेमाने सद्‌गदित झाल्या आहेत आणि क्षणापूर्वी भीषण गर्ज-नेने भयभीत करून टाकणाऱ्या आपल्या रुद्रतुल्य मुखावाटें शुचि-शुभ्र हास्याचा गडगडाट करीत, आपल्या स्वत:वरच मुग्ध होऊन किंचित् सौम्यतेने वाहूं लागल्या आहेत. जणु अपार आनंद झाल्या-मुळे, वात्सल्यमूर्ति मातेसारखे आपले सहस्रावधि बाहु पुढे पसरून असंख्य जीवांना आपल्या सुशीतळ वक्षावर घेण्यासाठी कलकल निनाद करीत सतत आपल्या जवळ बोलावीत आहेत, आणि मातृ-स्तनांतील मधुर दुधाप्रमाणे असलेल्या आपल्या शीतल जलधारांनी पृथ्वीतलावरील लोकांचें जीवन परिपुष्ट करीत आहेत. कुठे अति-प्राचीन तीर्थस्थलांचें दर्शन स्वत: घेत घेत तर कुठे नवनवीन तीर्थ-स्थानें स्वत: निर्माण करून, महर्षिगणांनी सेविलेल्या शांतिमय आश्रमांना नयनमनोहर वृक्ष, लता, गुल्म, फळें फुलें नि कंदमुळें यांच्या साहाय्याने समृद्ध व शोभायमान बनविणें चाललें आहे. पावनदर्शन आश्रमसमूहांचे पायथे खळखळून धुतल्याबरोबर ह्या प्रबल वेगशाली नद्यांनी एकदम प्रशांत भाव धारण केला आहे. कुठे एखाद्या प्रशस्त व गभीर जलाशयाचें रूप घेऊन, त्यांतील

छोटया छोटया भोवऱ्यांमुळे कुल्कुलु असा सुमधुर स्वर धरला आहे. पाहणाराला वाटावें की आश्रमवासी महर्षिगणांच्या कंठांतून स्रवणाऱ्या सुललित वेदध्वनिश्रवणामुळे मुग्ध झालेल्या या प्रवाहिणींचें मन, तो सर्वतः परमपवित्र व शांतिमय परिसर सोडण्यासाठी मुळीच तयार होत नाही. परम रमणीय व पवित्र आश्रमसमूहांच्या पावन दर्शनानें उल्हसित होऊन ह्या सर्व नद्यांनी आपापलें उग्र रूप टाकून दिलें आहे व आश्रमवासीयांचें मनोरंजन करण्यासाठी जणु आपली अनिवार्य गति एकाएकी स्थगित करून त्या प्रायः स्तब्ध आहेत. कुठे कठीण अशा खडकाळ जमिनीला सुपीक बनवून, पाहाडी लोकांना प्राणस्वरूप असलेलें धनधान्य त्यांनी आपल्या दोन्ही तीरांवर पिकविलें आहे, आणि कुठे रंगीबेरंगी फुलांच्या गुच्छांनी शोभिवंत केलेलें नित्यनूतन असें मखमलीचें हिरवें वस्त्र आपल्या पित्याच्या पाषाणमय खडबडीत देहावर पांघरून त्याला अपूर्व शांतिसुखाचा धनी बनविलें आहे. गिरिराज हिमालयाचें बाह्यतः ओबडधोबड व कठीण दिसणारें रूप खोटें आहे असेंच जणु त्या सर्वांना सुचवीत आहेत. परम करुणामयी जगज्जननी गौरी, साक्षात् ब्रह्मचारिणीस्वरूपिणी शाम्भवी गंगा व प्रेममयी यमुना ज्याच्या कन्या होत, त्याचें सुविशाल हृदय कोणत्या सामग्रीचें बनलेलें आहे तें कुणालाच कधी कळणार नाही. त्या परमगूढ अशा ठिकाणाला मर्त्यचक्षूंच्या दृष्टिपथांत न येऊं देण्यासाठी व मानवी जीवांना अगम्य असें करून ठेवण्यासाठीच मला वाटतें महाभाग हिमालयाने अत्यंत दुर्भेद्य असें कवच धारण केलें आहे.

नद्यांमधे सर्वश्रेष्ठ असलेल्या ह्या हिमराजकन्यका नगाधिराजाच्या बाह्यतः कठीण, नीरस व निर्जीव वाटणाऱ्या व्यक्ति-

मत्वाला सुकोमल, सरस व सजीव बनवीत एकएकटचाने गंगा-संगमांत आत्मविसर्जन करीत आहेत. शतधा विभक्त झालेल्या शक्तीचा जणु एकाच महाशक्तींत पुनश्च लय होत आहे.

### यमुनेचा जीवनहेतु

उत्तराखंडांत वाहणाऱ्या ह्या सर्व नद्यांनी हिमालयाची सर्वांगीण शोभा व सौंदर्य सुप्रतिष्ठित करून नंतरच मग पतितपावनी भागीरथीच्या प्रवाहगर्भांत उड्या घेतल्या आहेत. स्वर्लोकींची गंगा व यमुना ह्या दोघींनीच केवळ आपल्या सुविमल अमृत-धारांनी धराधामाला दूरवर शीतल बनविलें आहे. त्या भिन्न मार्गांनी आपल्या पितृगृहांतून बाहेर पडल्या आणि मर्त्यलोकांतील आपलें अखेरचें लीलास्थल गाठण्यासाठी अतिदूर वाहत गेल्या. भगीरथाला अभीष्ट दान करणारी व स्वर्गारोहणाची सोपानपंक्ति असलेली गंगा जशी सगरपुत्रांचा उद्धार करण्याच्या मनीषेनें असंख्य जीवांना सद्गति देत देत, ह्या मृत्युलोकावर स्वर्गीय सुखशांति उधळीत सागराभिमुख वाहत गेली तशी कालिंदी यमुनाहि जणु लीलामय हरीच्या अनुपम अशा व्रजलीलेंत सामील होण्यासाठी वृंदावनाकडे वाहत आली. मुरली-मनोहराचा अमृत-स्रावी, हृदयोन्मादकारी, विश्वमोहक, सुरेल वेणुध्वनि ऐकण्या-साठीच जणु श्रीकृष्णमयप्राण असलेल्या गोपवधूंप्रमाणे स्वतःचें पितृगेह व सगेसोयरे यांचा संबंध अजिबात तोडून टाकून श्रीहरीचें अत्यंत आवडतें लीलानिकेतन असलेल्या अशा व्रजाकडे, मुळीसुद्धा दम न घेतां यमुना तडक धावत आली. भाग्यशाली यमुना अखंड शुभ्र अशा हिमराशींतून उगम पावूनहि, मला वाटतें, केवळ श्यामसुंदराच्या सांवळ्या अंगावर आपल्या गात्रांना विसावा मिळावा व अभिन्नभावाने त्याचें भजन करतां यावें म्हणून तिनें

त्या परमधाम व्रजभूमीकडे आपली सजल श्यामल तनु झोकून दिली असावी. किंवा तिच्या हृदयकंदरांत लपून बसलेल्या कृष्ण-चंद्राची सुनील स्निग्ध ज्योति तिच्या अंगप्रत्यंगांतून बाहेर पडत असावी. अथवा स्वत: आदित्यतनया असूनहि श्रीकृष्णविरहानें शोकाकुल झालेल्या गोपबालिकांच्या हृदयांतील श्रीकृष्णवियो-गाच्या प्रखर ज्वाळा विझविण्याच्या उद्देशानेच यमुना व्रजभूमी-कडे वळली असावी. आणि म्हणूनच कदाचित् तिचें तापशमनी हें नांव रूढ झालें असावें. कृष्णविरहाने व्याकुळ झालेल्या व्रज-रमणींना नीलकान्त मण्याप्रमाणे असलेल्या आपल्या श्यामल छटेंत कृष्णचंद्राच्या दर्शनसुखाचा आभासमय का होईना पण प्रत्यय द्यावा, व माधवप्रिय व्रजवधूंना आपल्या कुशींत घेऊन मृत्यु-लोकांतील आपल्या अवतरणाचें सार्थक व्हावें ह्या हेतूनेच की काय यमुना एकटीच वृंदावनाकडे यात्रयास निघाली असावी. बन्सीधराच्या बांसरीचे मंजुळ स्वर ऐकतांच व्रजनारी जशा आपापल्या पतिपुत्रांना व आप्तेष्टांना सोडून देऊन उन्मत्तांप्रमाणे बेछूट धावत आल्या आणि चित्त चोरणाऱ्या किशोर केशवाला त्यांनी घट्ट पकडून ठेवलें, तसेंच देवादि महर्षिगणांनी सदा वांच्छिलेल्या, कृष्णमुखानें परिचुंबित झालेल्या वेणूचा सुस्वर निनाद कर्णपुटांत येतांच यमुनेचेंहि भान हरपलें व श्रीकृष्णाच्या मोहिनीशक्तीचा बोलवा चिरस्मरणीय करण्यासाठीच जणु ती उलट दिशेला वळली. सूर्याला नखदेखील दिसूं न देणाऱ्या राज-घराण्यांतील महिलांप्रमाणे, सदासर्वदा गिरिगुहाकंदरांत वावर-णारी यमुना, आपलें कुल, शील, मान, भय, लाजलज्जा ह्या सर्वांवर तिलांजली सोडून ताड् ताड् उडचा मारीत दुर्गम गिरि-प्रदेश ओलांडून व्रजांतील विपिनविहारीसाठी इकडे निघून आली.

भगवंताची लीलारसमाधुरी चाखण्यांत गढून गेलेल्या यमुनेला, खऱ्या अर्थानें भगवंताची लीलासंगिनी बनून व कुरंगनयना गोपांगनांच्या प्रेमाश्रूंनी अभिषिक्त होऊन 'परमामृतवाहिनी' हें नाम धारण करण्यासाठी, जान्हवी तिची मैत्रीण असूनहि कांही काळ तिच्यापासून दूर व्हावें लागलें. भगवंताच्या लीलारसाची महती जाणणाऱ्या यमुनेच्या रूपानें खरोखर अमृताचा लोट प्रवाहित झाला आहे. नवद्वीपभूषण चैतन्य महाप्रभूंच्या मधुमय जीवनांत असाच महापूर आला आणि एके काळीं त्या पवित्र वंगभूमीला त्यानें आर्द्र करून सोडलें. सागराची केवळ निळी लाट पाहतांच जे चैतन्य महाप्रभु भावाविष्ट होऊन त्यांत विलीन झाले, त्यांच्या हृदयांत श्री यमुनेच्या मधुमय नामानें केवढा मोठा भावकल्लोळ उचंबळून येत असेल याची कल्पनाहि करवत नाही.

### जीवन-साक्षी नद्या

सुरधुनि गंगा व यमुना यांच्या विमल जल-धारा पाहिल्या की माझ्या मनांत खरोखरच मोठमोठीं स्मृतिचित्रें जिवंत होतात. अगदी पुरातन कालापासून आर्यावर्तांतील कितीतरी गौरवास्पद, सर्वश्रेष्ठ अशा अनुकरणीय घटना ह्या स्रोतस्विनींच्या निर्मळ परिसरांत घडून आल्या आहेत. ह्या दोन अनुपम प्रवाहिणींच्या तीरांशीं ज्या कांही अलौकिक व अद्‌भुत घटना निगडित झाल्या आहेत त्यांच्याशीं तुलना करण्याजोगें ह्या जगांत कांहीच कुठे आढळणार नाही असें विधान मी न कचरतां करूं शकतों. आमच्या शास्त्रग्रंथांत पुण्यसलिला गंगा व यमुना यांचें जें माहात्म्य वर्णिलें आहे तेंहि किती सुसंगत आहे हें अल्पशा विचारानें देखील पटण्यासारखें आहे. जगद्वंद्य महर्षिगणांनी रचलेल्या शास्त्रांतील एकूणएक सत्य जणु आजहि गंगायमुनांच्या प्रत्येक तरंगस्फोटांतून

प्रतिध्वनित होत आहे. ह्याच गंगा-यमुनांच्या महिमामय तीरांवर युगयुगांतरीं प्रकट होऊन भगवंतांनी लीलारसामृताचे लोटच्या लोट वाहविले होते, ह्या घटनेला त्रिभुवनांत देखील उपमा सापडणार नाही. आणखी पुनः अनंतभावमयी भागीरथी गंगा व भारतभाग्यनियामिका यमुना यांच्या उभय तीरांवर ह्या भारतीय क्षितिजांत किती सौभाग्यसूर्यांचा वेगवेगळ्या कालखंडांत उदय आणि अस्त झाला याची गणना तरी कोण करील ?

हिमालयांतील उत्तुग शिखरांवर निवास करणाऱ्या शैल-विदारिणी यमुनेला कारुण्याचा पाझर फुटला व तिने भारत-मातेच्या पवित्र अंगावर असंख्य फलपुष्पांनी चित्रित केलेलीं सस्यशामल वसनें व आभूषणें चढवून तिच्या अपूर्व शोभासंपदेमुळे साऱ्या जगाला लुब्ध केलें. एकेकाळीं ऐश्वर्याचीं व वैभवाचीं आगरें असलेल्या प्राचीन नगर-नगरींच्या विपुल ध्वंसावशेषांमधे भारताच्या अतुलनीय गौरवाचें व अक्षय्य कीर्तीचें प्रदर्शन करून तिने समस्त सुधारलेल्या जगताला विस्मयांत टाकलें आहे. आणि पुनः भारताच्या पुरातन व वर्तमान अवस्थांवर विचार करून विषादाच्या काळजीने काळ्या पडलेल्या यमुनेने भारताच्या भाग्यविपर्ययाची व त्याच्या भूतकालीन हर्षविषादोत्पादक सुख-दुःखाची कहाणी सांगत सांगत तीर्थराज प्रयागजवळ जान्हवीला आलिंगन देऊन आपली लीला संपवून टाकली आहे. श्रीकृष्णभूषण असलेल्या यमुनेच्या आदि व मध्य लीलेचें थोडेसें विवरण आता-पर्यंत यथामति केलें. आता तिच्या परिसरांतील स्थानवैचित्र्याची आलोचना करूं या.

### थोडेसें प्रयागविषयी

हरिद्वारपासून बदरिकाश्रमाच्या शेवटल्या हद्दीपर्यंत मीं जितके म्हणून संगम पाहिले ते सर्व नैसर्गिक सौंदर्याने व ऐश्वर्याने

परिपूर्ण असून त्यांचें पुण्यमय माहात्म्य श्रवण केलें की कितीतरी तपोनिष्ठ मुनिगणांची अलौकिक तपस्या माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते. परंतु गंगा-यमुना संगम ( प्रयाग वा अलाहाबाद ) भारताच्या अतुल गौरवाचें, अक्षय कीर्तीचें, व ऐहिक व पारमार्थिक उन्नतीचें तेज:पुंज, यशोमय असें जें महाप्रभावशाली परम अद्भुत चित्र माझ्या स्मृतिपटलावर अंकित करतो, त्याचें विस्तृत विवरण करावयाचें झाल्यास एक वेगळाच ग्रंथ रचावा लागेल. अर्थात् ह्या प्रस्तुत प्रबंधांत त्याचें विस्तृत विवरण करतां येत नाही. तरीपण त्रिपथगा गंगा व यमुना यांच्या माहात्म्यासंबंधी दोन चार गोष्टी लिहितां लिहितां आणि विशेषत: श्रीयमुनेच्या आश्चर्यजनक स्वतंत्र व्यक्तित्वाविषयी व तिच्या कार्यकलापाविषयी थोडाबहुत विचार करतां करतां मला आता या ठिकाणीं गंगायमुना-संगमाविषयी थोडेसें सांगणें भाग पडत आहे.

कोणत्याहि विषयाची सर्वांगीण आलोचना करावयाची झाल्यास, तो विषय अथपासून इतिपर्यंत पाहणें स्वाभाविक आहे. तेव्हा मीहि ह्या स्वाभाविक पद्धतीला अनुसरून आता ह्या गिरि-प्रदेशांतून कल्पनासाहाय्याने एकवेळ मधु-मोद-विलासिनी यमुनेचें अखेरचें लीलास्थल जें तीर्थराज प्रयाग तेथपर्यंत जाऊन त्याच्या माहात्म्यविषयक कांही गोष्टी येथे सांगून मग पुन: बाबा केदार-नाथाच्या शिखरावर परत चढून येईन. महापुण्यधाम असलेल्या प्रयागापासून, जन्हुकन्या गंगामाई पुढे पुष्कळ दूर जाणार आहे. अर्थात् तिच्या विषयीच्या कथा येथे विशेषेंकरून उद्भवणार नाहीत. फक्त स्वर्गापेक्षाहि श्रेष्ठ व वांछनीय अशा गंगा-यमुना संगमाचें पावित्र्य व वैचित्र्य यांविषयी या ठिकाणीं दोन चार शब्द सांग-ण्याचा माझा उद्देश आहे.

**स तीर्थराजो जयति प्रयागः ।**

गंगा-यमुनेचा संगम असलेलें प्रयाग हेंच सर्वश्रेष्ठ प्रयागतीर्थ आहे. प्रयागराज अलाहाबादपासून उत्तराखंडांतील टोकापर्यंत परमपवित्र असे एकूण सात प्रमुख व पुराणप्रसिद्ध (संगम) आहेत. त्या सर्वांमधे तीर्थराज प्रयाग हेंच अग्रगण्य आहे. हिंदूंच्या दृष्टीने गंगा-यमुना यांच्या संगमाच्या पावनतेला व रमणीयतेला सीमा नाही, आमच्या दृष्टीने तें स्थान म्हणजे परम मोक्षधाम आहे. शास्त्रग्रंथांमधे लिहिलेलें प्रयागमाहात्म्य पाहिलें म्हणजे वाटतें की मृत्युलोकावर त्याच्यासारखीं पवित्र क्षेत्रें फारच विरळ असावींत. अति प्राचीन कालापासून हिंदुमात्र ह्या त्रिलोकविख्यात प्रयागक्षेत्राची किती भक्तिभावाने व किती अलौकिक श्रद्धेने आराधना करीत आला आहे ह्या गोष्टीचा किंचित् नमुना म्हणून मत्स्यपुराणांतील दोन श्लोक खाली नमूद करतों—

श्रुतिः प्रमाणं स्मृतयः प्रमाणं पुराणमप्यत्र परं प्रमाणम् ।
यत्रास्ति गंगा यमुना प्रमाणं स तीर्थराजो जयति प्रयागः॥
न यत्र योगाचरणप्रतीक्षा न यत्र यज्ञेष्टिविशिष्टदीक्षा ।
न तारकज्ञानगुरोरपेक्षा स तीर्थराजो जयति प्रयागः ॥

प्रयागतीर्थ हिंदूंच्या किती आदराचें व श्रद्धेचें स्थान आहे हें वरील शास्त्रवाक्यांवरून स्पष्टपणें ध्यानांत येईल. गंगा व यमुना जिथे प्रमाण म्हणून उभ्या आहेत तिथे श्रुतीच्या, स्मृतीच्या व पुराणादि ग्रंथांच्या प्रामाण्याची काय आवश्यकता आहे? अहाहा! किती सुंदर विचार! इतर अनेक शेकडो प्रमाणें असूनहि स्वतः गंगा-यमुना संगम हाच स्वतःचें प्रमाण आहे. आणि यज्ञ, याग, योग, शिक्षा, दीक्षा इतकेंच काय पण, भवसागर तरून जाण्यास आवश्यक असलेलें ब्रह्मज्ञान देणाऱ्या श्रीगुरूंच्या शब्दांची

देखील ह्या ठिकाणीं अपेक्षा राहत नाही. असल्या स्वतःप्रमाण मोक्षधाम प्रयागाचें गभीर व असाधारण माहात्म्य प्राचीन हिंदूंच्या हाडामासांत भिनलें होतें हें केवळ पुराणादि ग्रंथांवरूनच आढळून येतें असें नाही, तर इतिहासांत देखील ह्याविषयीचे कितीतरी ज्वलंत दाखले आढळतात. हें असामान्य असें प्रयाग-माहात्म्य प्राचीन भारतांत इतकें प्रभावशाली झालें होतें व आर्य ऋषिमुनि त्याच्या पावित्र्याने इतके मोहून गेले होते की त्यांनी प्रफुल्लचित्ताने म्हटलें––"गंगायमुनाम् आसाद्य त्यजेत् प्राणान् प्रयत्नतः।" ज्या आर्यमहर्षिगणांनी अति प्राचीन काळापासून आत्महत्त्येची गणना महापापांत केली होती आणि प्राणिमात्राच्या कल्याणाकरिता ज्यांनी कितीतरी पोषक अशा निषेधाज्ञा देऊन ठेवल्या आहेत, त्यांनीच पुनः तीर्थराज प्रयागांत देह ठेवण्याचें विधान अंतःकरणापासून केलें आहे. तीर्थराज प्रयागाचें पौराणिक माहात्म्य व गंगा-यमुना संगमाचें दर्शन व त्याचा पवित्र स्पर्श, श्रद्धावान शुद्धचित्त भारतीयांच्या अंतःकरणांत ज्या आध्यात्मिक व दैवी भावना चेतवितात त्याची कल्पना कदाचित् सर्वांना येणार नाही, पण ह्या अतिप्राचीन व सुप्रसिद्ध प्रतिष्ठान नगराच्या असाधारण प्रतिष्ठेची अतुलनीय कथा सुवर्णाक्षरांनी इतिहासांत लिहिली गेली आहे ह्याविषयी संशय वाटावयास नको.

### प्रवृत्ति-निवृत्तीचें लीलाक्षेत्र

हें तीर्थक्षेत्र प्रयाग प्रवृत्ति व निवृत्ति यांचें अद्‌भुत असें लीलाक्षेत्र आहे. ह्या दोन परस्परविरोधी भावनांचा अत्युच्च उत्कर्ष जसा इथे एकाच वेळीं घडून आला तसा इतरत्र कुठेहि घडला नसेल. ह्या दोन भावनांचें अंतिम ध्येय व त्यांची अपूर्व पूर्ति ह्या एकाच ठिकाणीं घडून आलेली दिसत आहे. तीर्थराज प्रयाग

खरोखर जीवमात्राचा भुक्ति व मुक्ति-दाता आहे. प्रवृत्तिपरायण जीवांच्या बाबतींत तीर्थराज प्रयाग जसा कल्पतरु आहे, तसाच निवृत्तिपरायण मुमुक्षु जीवांच्या बाबतींत मुक्तिदाता गुरु आहे. स्मरणातीत कालापासून आतापर्यंत आपल्या पुण्यमय पवित्र भूमीमधे किती अद्भुत प्रकार त्याने जगाला करून दाखविले त्याचा पत्ता लागत नाही. प्रवृत्तीचा अद्भुत व अश्रुतपूर्ण विलास व निवृत्तीचा परम विकास, प्रवृत्तीचें भाग्यैश्वर्य व निवृत्तीचें योगैश्वर्य, प्रवृत्तीची आपातरमणीया, भोगैकपरा, अपार विषयाशया सुरासुरमनोमोहिनी, अंत:सारशून्या अशी चकाकणारी मूर्ति व निवृत्तीची नित्यमधुरा, सदाशया, अक्षयशांतिविधायिनी, मोक्षैकपरा, सारात्सारा चिन्मयी मूर्ति ह्या दोघींचें अभूतपूर्व मीलन व प्रतिष्ठा करून तीर्थराज प्रयागाने खरोखरच ह्या अति प्राचीन अशा प्रतिष्ठान नगराला अवनीतलावर गौरवशाली बनविलें आहे. भारतांतील इतर कोणत्याच तीर्थक्षेत्राने असा विरोधपूर्ण समन्वय साधून मला विस्मयाने मुग्ध केलें नाही. ह्या आश्चर्यकारक महापुण्यक्षेत्राबद्दल जितका विचार करतों तितका तितका मला जास्त चमत्कार वाटतो.

### पुरूरवा आणि प्रयाग

बुधनंदन राजर्षि पुरूरवा जेव्हा ह्या इंद्रलोकींच्या अमरावतीतुल्य नगरींतील रत्नजडित उंच प्रासादाच्या गच्चीवर बसून अमावास्येच्या घोर अंधकारांतहि आपल्या नवोदित भाग्यचंद्राच्या सुस्निग्ध किरणजालांनी ह्या नगरीला न्हाऊं घालीत असे, आणि ज्योत्स्नापिपासु चकोरगण जेव्हा झुंडीझुंडीने येथे येऊन महाराजांचें प्रमोदकानन कलरवांनी मुखरित करीत असत, तेव्हा ह्या प्रतिष्ठान नगरीच्या शोभेने सप्तभुवनेंहि मुग्ध होऊन जात

तुटलेल्या वल्लरीप्रमाणे स्वर्गच्युत झालेल्या देवांगना उर्वशीने येथे येऊन जेव्हा पुरूरव्याचा अंक सजविला व या प्रतिष्ठान नगरींत स्वर्गीय विलास विनोदाची धमाल उडवून दिली, आणि पुनः प्रियावियोगाने आर्त झालेला प्रेमोन्मूढ राजर्षि जेव्हा स्थलकालाचें भान हरपून इतस्ततः भटकूं लागला तेव्हा ह्या प्रयागांत प्रवृत्तीची किती पराकाष्ठेची लीला घडून आली असेल ह्याची कल्पनाहि करवत नाही. प्रवृत्ति-निवृत्तीचें उच्चतम लीलास्थल असणाऱ्या प्रयागाचें माहात्म्य साऱ्या जगाला संपूर्णपणें विदित व्हावें म्हणूनच मला वाटतें राजर्षि पुरूरव्यांनी ह्या नगरींत स्वर्गीय ऐश्वर्य व सुखोपभोग भोगून स्वर्गांतील देवांचा मत्सर ओढवून घेतला. राजर्षि पुरूरव्याचें प्रवृत्तिपर जीवन सार्थ करण्यासाठी, प्रयागाच्या अचिंत्यप्रभावसंपन्न माहात्म्याने हें ठिकाण एके वेळीं स्वर्गधाम बनलें होतें.

### मुनिश्रेष्ठ भरद्वाज आणि प्रयाग

ह्याउलट, जेव्हा धगधगीत निखाऱ्याप्रमाणे उज्ज्वल भासणारे शिष्यपरिवारांनी वेढलेले, मुनिश्रेष्ठ भरद्वाज आपल्या सुरम्य व पवित्र आश्रमांत महाकठोर तपश्चर्येंत निमग्न होऊन धर्मजगतांतील अश्रुतपूर्व सत्यें संशोधीत असत व जीवमात्रांच्या कल्याणासाठी त्या सत्यांचा अत्यंत तत्परतेने प्रचार करीत असत, जेव्हा जटावल्कलधारी श्रीराम-जानकीने नुकत्याच मिळालेल्या साम्राज्यपदाचा तत्क्षणीं त्याग करून अरण्यवास स्वीकारला व आपल्या धाकट्या भावासह मुनिश्रेष्ठांच्या ह्या रंगीबेरंगी पानांनी रचलेल्या कुटीमधे कंदमुळें व फळें खाऊन एक रात्र मोठ्या आनंदाने काढली त्या प्रसंगीं ह्या प्रयागधामाने किती प्रशान्त मुद्रा धारण केली असेल, ह्याची कल्पनाहि करणें कठीण आहे.

निवृत्तिमार्गाचा अवलंब करणाऱ्या विचारशाली पुरुषांना तेव्हां ह्या प्रयागधामीं किती परम शांति लाभली असेल हें सांगणें माझ्या शक्तीपलीकडचें आहे. आणखी जेव्हां श्रीरामांचा अनुज भरत अयोध्यावासी जनतेला सपरिवार घेऊन, ह्या अप्रतिम-शक्तिशाली महर्षि भरद्वाजांच्या आश्रमांत आला व त्यांचें आतिथ्य त्यानें स्वीकारलें, आणि जेव्हां सत्यसंकल्प महर्षींच्या केवळ इच्छेनें एका क्षणार्धांत ह्या पवित्र भूमीवर स्वर्गलोकींच्या व भूलोकींच्या अखिल ऐश्वर्याच्या राशी प्रादुर्भूत झाल्या आणि मुनिश्रेष्ठांच्या ह्या योगैश्वर्यानें अयोध्यावासी जनतेला अतिशय विस्मित व्हावें लागलें, तेव्हां तर ह्या प्रयागमाहात्म्याच्या वैचित्र्यानें सर्वांनाच मुग्ध करून टाकलें.

### शिलादित्य हर्षवर्धन आणि प्रयाग

कान्यकुब्जाधिपति शिलादित्य महाराज हर्षवर्धनांनी महामोक्ष नामक पंचवार्षिक महायज्ञाचें अनुष्ठान करून जेव्हां पांच वर्षांत जमा झालेलें आपलें सर्व ऐश्वर्यभांडार दारिद्र्यविमोचनार्थ ह्या पुण्यधाम प्रयागमधे लुटविलें, तेव्हां जाति, वर्ण, संप्रदाय इत्यादि भेदभाव न मानतां सर्वांनाच समानभावानें ह्या अचिन्त्य-प्रभावसंपन्न प्रयाग-माहात्म्याकडे आकृष्ट व्हावें लागलें. पौराणिक युगांतील गोष्टी वगळल्या तरी स्पष्ट कळून येतें की, बौद्ध युगांतहि प्रयागाचें माहात्म्य अक्षुण्ण असेंच होतें. इतकेंच नव्हे तर त्याच्या प्रसिद्धींत विशेष रूपानें भर पडली होती. शिलादित्यराज हर्षवर्धनांनी आपल्या अलौकिक महायज्ञाच्या अनुष्ठानासाठी एवढ्या सुविशाल साम्राज्यामधून प्रयागाचीच उपयुक्त क्षेत्र म्हणून निवड केली. त्यांच्या कारकीर्दींत त्यांनी जितके म्हणून महायज्ञ केलेत ते सर्व प्रयागांतच. शिलादित्य राजांच्या विशेष आग्रहा-

वरून एके वर्षीच्या महायज्ञाला चिनी यात्रेकरू ह्युएन्त्संग स्वतः ह्या प्रयाग नगरींत उपस्थित झाले होते, आणि महायज्ञाचा तो अद्‌भुत सोहळा स्वतःच्या डोळ्यांनी पाहून त्याचें संपूर्ण वर्णन आपल्या इतिवृत्तांत त्यांनी लिहून ठेवलेलें असल्यामुळेच आज आपणाला त्या अपूर्व अशा महायज्ञाची माहिती मिळू शकते. शिलादित्यराज हर्षवर्धनांनी आपली अपरिमित धनसंपत्ति किती मुक्तहस्ताने वितरण केली होती हें पाहिलें म्हणजे आश्चर्याला सीमा राहत नाही. तसल्या प्रकारचें असाधारण व अलौकिक दान मला वाटतें भारतांतील प्रयागक्षेत्रींच शक्य होत असावें. ह्युएन्त्संगांनी लिहून ठेवलें आहे की फक्त युद्धोपयोगी शस्त्रास्त्रें व लढाईचा साजसरंजाम याशिवाय इतर कोणतीच चीजवस्तु या यज्ञानंतर राजभांडारांत शिल्लक राहत नसे. इतकेंच काय पण राजाचीं दरबारी वस्त्रें व अलंकार हे देखील सर्वसाधारण लोकांना वांटून देण्यांत येत असत. कान्यकुब्जाधिपति हर्षवर्धन यांनी पांच सहा वेळां या प्रयागक्षेत्रांत असल्या महान् यज्ञांचें अनुष्ठान करून आपल्या असीम दातृत्वशक्तीचा परिचय करून दिला. राजा हर्षवर्धना, धन्य तुझी ! असंख्य प्राणिमात्रांचे कष्ट दूर करून त्यांना आनंदित करण्यासाठीच मला वाटतें तुझा जन्म झाला होता, व अखिल गौरव लुप्तप्राय झालेल्या आजच्या हतभागी भारताची एकेकाळची अतुल कीर्ति राखण्यासाठीच मला वाटतें तूं ह्या सुविशाल भारतसाम्राज्याचा राजदण्ड हातीं घेऊन भारताच्या सर्वोच्च आदर्शाची दिशा दाखविली होतीस.

### दानभूमि प्रयाग

महात्मा ह्युएन्त्संग यांचा अलौकिक त्याग, उद्यम व प्रतिभा यांच्यामुळे त्या अद्‌भुत महायज्ञाची विस्मयजनक कथा आजच्या

सुसंस्कृत जगाला माहीत झाली आहे. भारताच्या ह्या गौरवशाली सत्य घटनेचा अपलाप करण्याचें धाष्टर्य, पाश्चात्यधार्जिणी स्वार्थी माणसें वगळलीं, तर इतर कोणीहि करणार नाही. अशाच किती हिंदु व बौद्ध राजामहाराजांच्या विश्वजित् यज्ञांनी हें अलौकिक सुमहान् क्षेत्र आपल्या महिम्याने संपूर्ण जगतांत किती अतुलनीय झालें आहे ह्याचें मोजमाप कुणीं करावें ? घोर अशा दैन्यावस्थेला आलेला भारत अजूनहि प्रयागांतील कल्पनातीत दानमाहात्म्याची साक्ष देत आहे. अजूनहि ह्या प्रयागामधे दररोज किती शेकडो हजारो दानें, श्राद्धतर्पणादि क्रिया पार पाडल्या जातात. प्रयागाचें दानमाहात्म्य अगदी प्राचीन काळापासून चांगलेंच प्रतिष्ठित झालें आहे. गंगायमुनारूपी दोन महाशक्तींच्या सम्मीलनांतूनच प्रयागाचें हें अलौकिकत्व व ही विचित्रता निर्माण झाली आहे. ह्या सुप्रशस्त पुण्यक्षेत्राचें प्रभावसंपन्न होण्याचें कारणहि हेंच आहे.

### प्रयागांतील वेदान्तधर्माचें बीजारोपण

अखिल भारतांतील आणखी कांही प्रसिद्ध घटनांचा विचार करून ह्या प्रयागक्षेत्राचें वैचित्र्य व पावित्र्य खरोखरच कसें काय सिद्ध होतें तें पाहूं या. भारतामध्ये बौद्ध धर्माचा प्रभाव बऱ्याच काळपर्यंत टिकून राहिला व शेवटीं जेव्हा त्याचें पतन होणें आवश्यक ठरलें, तेव्हा वैदिक धर्माचा पुनरभ्युदय करण्याच्या बाबतींत अग्रेसर ठरलेले प्रतिभाशाली कुमारिल भट्ट यांनी आपलें अवतारकार्य पार पाडलें. त्यानंतर ह्या महान् पुण्यक्षेत्रांत येऊन भगवान् श्रीशंकराचार्यांसमक्ष त्यांनी तुषाग्निदहनाने देह विसर्जित केला. इतर अगणित स्थानें असतांना देखील, केवळ गंगा-यमुना संगमाच्या माहात्म्याने आकृष्ट होऊनच नाही का त्यांनी देहत्यागाला हें स्थान निवडलें ? कर्मकांडाची जिवंत मूर्ति असलेल्या

भट्टांचा अंत व मूर्तिमंत ज्ञानकांड असलेल्या भगवान शंकराचार्यांचा उदय, दोन्हीहि घटना ह्या प्रयागधामींच घडल्या. ह्या पवित्र धामाहूनच भट्टांच्या सांगण्यावरून भगवान् शंकराचार्य दिग्विजया-साठी बाहेर पडले आणि भट्टांचा प्रधान शिष्य कर्मश्रेष्ठ मंडनमिश्र याच्या दाराशीं जाऊन थडकले. वैदिक कर्मकांडाचे पुनरुद्धारकर्ते कुमारिल भट्ट साक्षात् ज्ञानाग्निस्वरूप भगवान शंकराचार्यां-समोर ह्या प्रयागामधे जसे एके दिवशीं लय पावून परा निवृत्तींत मिळाले, तद्वत् त्यांचे प्रधान शिष्य प्रबल-प्रवृत्ति-परायण मंडनमिश्र यांचेंहि संपूर्ण तर्कजाल त्याच (शंकराचार्यांच्या) ज्ञानाग्नींत भस्मसात् झालें. ज्या ज्ञानरूपी महासूर्याच्या दिव्य प्रकाशानें भारतांतील घोर अंधकार नाहीसा होऊन दशदिशा उजळून निघाल्या होत्या, उषेच्या आगमनाबरोबर निशेनें काढता पाय घ्यावा, तद्वत् ज्या प्रचंड ज्ञान-मार्तंडाच्या उदयामुळे शेकडो भ्रान्त मतमतांतरें नामशेष होऊन हें सुविशाल भारतीय आकाश अखंड शांतिदायक अनंत ज्योतीने परिपूर्ण झालें होतें, त्या महासूर्याचा (शंकराचार्यांचा) अरुणोदय ह्याच महाक्षेत्रांत झाला होता. कुमारिल भट्टांच्या अंताबरोबरच कर्मकांडाचा अंत व ज्ञानकांडाचा उदय झाला असें म्हणावें लागेल. भारतांतील ह्या महागौरवास्पद घटनेशीं या गंगा-यमुना-संगमक्षेत्राचा (प्रयागाचा) किती निकटचा, अपूर्व संबंध आहे! प्रवृत्तीची हेतुभूत असलेली यमुना, जणु आपली अपूर्व लीला संपवून शेवटीं निवृत्तिरूपिणी शाम्भवी भागीरथीच्या प्रवाहांत ज्याप्रमाणे विलीन होते त्याचप्रमाणे प्रवृत्तीचें हेतुभूत असलेलें कर्मकांडहि जणु येथेंच अगाध ज्ञानरूप महासमुद्रांत लय पावलें.

प्रयाग-माहात्म्य आठवतां आठवतां आपल्याला दिसून येतें की ह्याच परम महाक्षेत्रांत वेदान्ताचें बीजारोपण झाल्यानंतर

लवकरच त्याचा प्रचंड वृक्ष होऊन भारतावर सर्वत्र त्याची छाया पसरली. सुविशाल व अनंतविस्तीर्ण अशा महावृक्षाची जी सुशीतल छाया त्रितापदग्ध जीवांचें एकमेव आश्रयस्थान आहे, ज्या वेदान्त-डिंडिमाच्या महा विजय-निर्घोषाचा आज संपूर्ण जगांत प्रतिध्वनि गाजत आहे, वरील घटनांच्या पार्श्वभूमीवर ही गोष्ट निरखून पाहिली की कळून येतें की वेदान्त डिंडिमाचा डंका प्रथम ह्या प्रयागांतच दुमदुमला.

### प्रयागांत स्वेच्छामृत्यु

कुमारिल भट्ट यांनी आपलें जीवितकार्य यशस्वी झालें हें पाहून ज्याप्रमाणे ह्या अत्यद्‌भुत तीर्थक्षेत्रीं देह ठेवला, त्याचप्रमाणे केवढ्या तरी पुरातन काळापासून, ह्या महा-संगमावर येऊन मृत्यु पावण्याची वांच्छा प्रत्येक हिंदु अंतःकरणांत वसत असे. ज्या स्थानाच्या अपूर्व माहात्म्याच्या गोष्टी ऐकतांना प्राचीन भारतांतील अत्यंत गौरवास्पद अशा अगणित अद्‌भुत घटनावली आमच्या स्मृतिपटलावर उदय पावतात, त्या अपार महिमामय सुपवित्र क्षेत्रांत मृत्यूची वांच्छा करून प्राचीन हिंदुलोकांनी आपल्या सहृदयत्वाची छटाच दाखविली आहे. फार प्राचीन अशा पुराणादि शास्त्रग्रंथावरून दिसून येतें की प्रयागांत स्वेच्छेने देहत्याग करण्याची प्रथा फारच पुरातन कालापासून ह्या देशांत प्रचलित होती. अशा रीतीने येथे स्वेच्छेने मृत्यूला वरलेल्या व्यक्तींच्या अस्थींचे ढीगचे ढीग, ह्युएन्त्संग स्वतः येथून पाहून गेला. हिंदूंच्या ह्या आत्मविसर्जन-प्रथेला पुष्कळजण एक रानटी प्रथा म्हणून समजतात, पण हिंदूंच्या ह्या अलौकिक आचरणामागे कोणतें गूढ तत्त्व दडलेलें आहे, त्याबद्दल हे लोक किंचित् देखील विचार करीत नाहीत वा तें जाणून घेण्याचा प्रयत्नहि करीत नाहीत, ही

फार खेदाची गोष्ट आहे. शास्त्रग्रंथांतील प्रयाग-माहात्म्यांतील "यत्र स्नात्वा दिवं यान्ति ये मृतास्तेऽपुनर्भवा:"– "जे येथे स्नान करतात ते स्वर्गांत जातात, येथे जे मृत्यु पावतात ते पुन्हा जन्मास येत नाहीत"–असल्या शेकडो शास्त्रीय प्रामाण्य-वाक्यांनी हेंच सिद्ध होतें की मोक्षधाम प्रयाग येथे प्राणत्याग करण्यांत प्राचीन हिंदुजनतेला कसल्याहि प्रकारचा संदेह वाटत नव्हता.

**आम्ही रानटी आहोंत काय ?**

आर्यांच्या ज्या शास्त्रांमधे पानागणिक आत्मघातक्याला रौरव नरकवास मिळण्याचा गोष्टी आढळतात, त्याच शास्त्रांमधे पुन: विशिष्ट क्षेत्रीं आत्मविसर्जन हें जीवाला सद्गतिदायक होय असें स्पष्ट विधान केलेलें आहे. असल्या परस्पर विरोधी शास्त्रीय वाक्यांतील तात्पर्याचा विवेकपूर्ण विचार करतां येत नसल्यामुळेच आत्मज्ञानप्रवण प्राचीन आर्यजातीच्या आचारविचारांकडे बरेचजण दोषदृष्टीने पाहतात. पाश्चात्य शिक्षणाचा ज्ञानदीप मिळालेल्या सर्वसाधारण लोकांची धारणा अशी की ब्रिटिश सरकारने हिंदूंचे अनेक रानटी आचारव्यवहार बंद करून टाकल्याने, आता भारताच्या चारहि कोपऱ्यांत सभ्यतेचा, सुधारणेचा खूप प्रकाश पडला आहे. आणि ब्रिटिशांच्या ह्या करणीने आमच्यावर अतोनात उपकार झाले आहेत. पण विदेशीय व विजातीय संसर्गामुळे व शिक्षणामुळे आपल्या आचारविचारांविषयी अजाण असलेलीं व परकीयांच्या आचारव्यवहारांमधे मुरून गेलेलीं माणसें जेव्हा स्वकीयांप्रति अनास्था दाखवितात तेव्हा तीं आत्मघाताचें किती घोर पातक करतात ह्याची त्यांना मुळीच कल्पना नसते. जन्म, मृत्यु, पाप, पुण्य, व धर्म-अधर्म यांच्याविषयी विचार करून करून ज्या प्राचीन आर्य ऋषि-महर्षिगणांनी प्राणपणाने ह्या गोष्टींची

अनुक्रम २६३९२ वि: भू-प्रवास
क्रमांक १७४ नों: दि: २३/३/६०


अंतिम तत्त्वें उकलून काढलीं, तेच ऋषि-मुनि-महर्षि आत्महत्त्यारूपी महापापाला आधार देतील हें कधीहि शक्य नाही. धर्मप्राण हिंदूंची समग्र अनुष्ठानें धर्मावर प्रतिष्ठित आहेत ही मूलभूत गोष्ट समजून घेण्याची क्षमता सर्वांच्या ठिकाणीं नसल्यामुळेच असला गैरसमज निर्माण होतो.

### भारतीय संस्कृतीची चिरंजीविता

दुसऱ्यांचीं राज्यें जिंकण्यासाठी व स्वत:चें राज्य टिकविण्यासाठी ज्या दिग्विजयी महापराक्रमी महारथी राजांनी असंख्य मानवांचें रक्त सांडून ही पृथ्वी कलंकित केली, त्यांच्यापैकी कुणीहि मानवजातीला पोषक होईल असें जीवन दान करूं शकला नाही. उलट शांतिप्रिय प्राचीन हिंदूंनी धर्मासाठी आपलीं बायकापोरें, घरेंदारें, धनदौलत इतकेंच काय पण आपले प्राणदेखील मुळीसुद्धा न कचरतां विसर्जित करून आर्यजातीमधे ज्या अक्षय जीवनशक्तीचा संचार केला, त्याचा अक्षुण्ण प्रभाव आजहि सुधारलेल्या समग्र जगताला दिसून येत आहे. आज आम्ही कितीहि दुबळे, कितीहि गरीब व पराधीन असलों तरी आम्ही निष्कपटपणें म्हणूं शकतों की त्या असामान्य प्रभावसंपन्न आत्मज्ञानी महर्षिगणांनी प्रदान केलेल्या अमृताचे आम्ही वारसदार आहोंत. असलें सौभाग्य कोणत्याच प्राचीन साम्राज्यलोलुप समाजाच्या नशिबांत आढळत नाही. तऱ्हतऱ्हेच्या धूर्त वागणुकींमुळे आणि तरवारी परजण्यामुळे जीं समस्त सुधारलेलीं प्राचीन राष्ट्रें ह्या धरतीवर अजिंक्य होऊन बसलीं होतीं, त्यांचें अस्तित्व अनंत अशा कालसमुद्रांत आज गडप झालें आहे ! अचिन्त्य महिमायुक्त आर्य महर्षिगणांच्या कृपेने व त्यांच्या असाधारण धर्म व ज्ञान यांच्या बलामुळे, इतका काळ परकीयांच्या पायांखाली असूनहि

आम्ही जिवंत आहोंत. आमच्या समाज-जीवनाच्या मर्मस्थलाला आजहि कुणी हात लावूं शकत नाही.

### मृत्यु मरण पावला !

एके वर्षी गंगोत्रीच्या मार्गानें जात असतां भागीरथी-प्रवाहाच्या पुण्य-दर्शनानें विव्हल होऊन एका उडीसरशी त्या उद्दाम वेगवान प्रवाहांत स्वतःला फेकून देऊन आपली भवलीला संपवितांना एका साधूला मीं प्रत्यक्ष पाहिलें. असें करतांना त्या साधूच्या अंतःकरणांत ज्या स्वर्गीय भावनांच्या ऊर्मि उठल्या असतील त्याचें वर्णन कोण करूं शकेल बरें ? स्वेच्छेने देहत्याग केल्यामुळे त्या साधूला दुर्गति मिळाली की सद्गति मिळाली ह्याचा निर्णय कोण करूं शकेल ? तरी मी एवढें मात्र निश्चित म्हणूं शकतों की, आत्यंतिक भक्तिभावाने जर त्याने पतितपावनी भागीरथीमधे आत्म-विसर्जन केलें असेल तर हिंदूंच्या प्रचलित श्रद्धेनुसार, त्याच्या मृत्यूने खुद्द मृत्युच मरण पावला; आणि याप्रमाणे क्षणभंगुर देहाची असारता सिद्ध करून दाखवून, भारतीय आर्यांना सहजपणें मरून अमर होण्याचें तंत्र माहीत आहे ह्या महासत्याचा जगतांत प्रचार केल्यामुळे तो साधु धन्य झाला. प्रायोपवेशन करून व कृच्छ्रचांद्रायणादि व्रतें करून देहपात करण्याची प्रथा भारतांत अत्यंत प्राचीन कालापासून चालूं आहे याविषयी कितीतरी आधार आढळून येतात. अगदी अलीकडील गोष्ट ! श्रीकेदारनाथच्या पहाडावरील मार्गाने किती साधूंनी देहत्याग केला आहे याची कुणालाच गणना करतां यायची नाही. ह्या पहाडी मुलुखांत अशीं अनेक "भृगुपतनें" आहेत की जेथून उडी मारून कितीतरी जण मृत्यूला कवटाळीत. ह्या भारतवर्षांतील अनेक साधूंचे "जीवत् समाधि" स्तम्भ-समु-

दाय आजहि भारतांतील स्वेच्छामृत्यूची साक्ष जगाला पटवीत आहेत. तसेंच किती साधुमहापुरुष अगदी आपण होऊन जमीन खणून स्थलसमाधि घेतात तेंहि सांगवत नाही. अशा रीतीनें कोणत्या तरी एका उच्च आदर्शाने प्रेरित होऊन, ह्या क्षुल्लक भौतिक देहाची ममता दूर सारण्याचा हिंदूंचा स्वभाव कितीतरी अगोदरपासून चालत आला आहे. ब्रिटिश सरकारचा कडक राज्यकारभार असूनहि हिंदूंच्या ह्या स्वेच्छामृत्यूचा भारतांतून लोप झाला नाही. साधुसंप्रदायांतील कुणीं कुणीं अजूनहि प्रायोपवेशनाच्या द्वारें देहत्याग केल्याच्या गोष्टी ऐकूं येतात. पतिव्रता नारीला अजूनहि कुणी धरून ठेवूं शकत नाही. स्वकीय बंधुबांधवांनी घरांत बंद करून ठेवलें तरीहि आपल्या पतीच्या विशुद्ध मूर्तीचें ध्यान करीत करीत, सर्वांच्या डोळ्यांत धूळ टाकून सती पतिसहगामिनी होतेच.

अनंत कालापासून चालत आलेल्या आर्य जातींतील ह्या प्रथेचें मूळ कुठे आहे याचा जर कुणीं शोध करण्याचा प्रयत्न केला तर हिंदूंचें हें इच्छामरण रानटीपणाचें द्योतक आहे असें त्याला म्हणतां यावयाचें नाही. अर्थात् जीं माणसें कोणत्याहि उच्च आदर्शाने वा भावाने प्रेरित न होतां केवळ एखाद्या सांसारिक कष्टदायक घटनेने वा मनस्तापामुळे जीव देतात त्यांना आत्मघाती असेंच समजण्यांत येतें व आर्यांमधे अशांना पिंडोदक देखील कुणी देत नाही.

### मृत्युंजय हिंदुसमाज

मुद्रेवर किंचित्‌हि रडवेपणा दिसूं न देतां, प्राणाहून प्रिय असलेल्या पुत्राचा अतिथिसत्काराकरिता बळी देतांना ज्या हिंदूंना परम समाधान वाटतें, अनेक दिवसांचे उपवास घडले असतांनाहि

जो दरिद्री हिंदु गृहस्थ केवळ अतिथिसत्काराकरिता सपरिवार असा मृत्यूला सामोरा जातो, त्या निर्भय, मृत्युंजय हिंदुसमाजांतील सहगमनादि प्रचलित आचारांमधे किती अपूर्व धर्मभाव, किती ज्वलंत विश्वास, त्याग, वैराग्य, व मृत्यूविषयीचा बेदरकारपणा दडला आहे ह्याची जाणीव आत्मज्ञानशून्य, ऐहिक सुखलोलुप लोकांना कधीहि होणें शक्य नाही. मृत्यूच्या भीतीने थरथर कापणाऱ्या अज्ञानांध जीवांना, हिंदूंचें हें आचरण रानटीपणाचेंच वाटणार. ज्या ह्या सर्व आचारव्यवहारांकरिता ते हिंदूंना असभ्य व जंगली समजतात, त्यांतच हिंदूंच्या उज्ज्वल चारित्र्याची खुबी आहे. खऱ्या हिंदूंच्या दृष्टीला अखिलपापविमोचनी गंगामाई कशी दिसते, ह्याचें मर्म इतर साधारण माणसाला कसें कळणार? मोठमोठ्या ज्ञानी, भक्त, भावुक कविवृंदांनी ज्या गंगेचें माहात्म्य परोपरीने संकीर्तित केलें, ऐहिक व पारलौकिक सुखांविषयी अनासक्तचित्त असणारे प्राचीन बुद्धिमान मुनिगण ज्या पुण्य-सलिला भागीरथीच्या विमल तीरावर निवास करण्याची आकांक्षा बाळगीत असत, ज्या गंगेच्या तरंगांचे मधुमय स्वर हिंदुमात्राच्या हृदयवीणेवर आजहि झंकृत होतात, जिच्या दर्शनाने, स्पर्शाने व जिच्यामधे डुबी मारल्याने हिंदु पाप, ताप व मोह यांच्या पाशां-तून मुक्त होतो, अशा गंगामाईचें मर्म अनार्य अहिंदु लोकांना उलगडणें अशक्य कोटींतील गोष्ट आहे. जिच्या गौरवाच्या गोष्टींनी आर्यांचे प्राचीन शास्त्रग्रंथ परिपूर्ण आहेत, शेकडो वीणांच्या मंजुळ झंकाराप्रमाणे असणाऱ्या आपल्या गोड भाषेमधे "शम्भो-रम्भोमयी मूर्ति:" असें जिचें दिव्य माहात्म्य कविकुलगुरु कालि-दासाने जगतांत प्रचलित केलें आहे, भगवान् श्रीरामकृष्ण देवांच्या श्रीमुखांतून "ब्रह्मवारि" असें जिच्याबद्दल ऐकलें आहे, आणि

जिच्या पुण्यमय प्रवाहामधे मरण्याची हिंदुलोक जन्मापासून वांच्छा बाळगतात, अशा त्या 'स्वर्गारोहण वैजयंती' जान्हवीचें माहात्म्य ही आजच्या पोकळ सुधारणेचा दिमाख मिरविणाऱ्या जडवादी लोकांना काय सहज उमजण्यासारखी गोष्ट आहे ? पतितपावनी भागीरथी गंगामैय्याला जे लोक, एक सामान्य पाण्याचा ओहोळ असें समजत असतील, त्यांना हिंदूंचें हें अलौकिक आत्मसमर्पण रानटीपणाचेंच वाटेल. परंतु अस्सल हिंदूंच्या दृष्टीने "सर्वतीर्थमयी गंगे"चें माहात्म्य, तेव्हा जसें होतें तसें आजहि आहे. आजदेखील "अन्ते गंगानारायण ब्रह्म" हा मंत्र उच्चारून किती लोक गंगा-प्रवाहांत प्राण विसर्जित करतात ह्याची गणना करतां यायची नाही.

### इष्टदेवतेच्या पूजेसाठी

इष्टदेवतेच्या पूजेसाठी देतां येत नाही असें, हिंदु माणसाच्या दृष्टीने या जगांत कांहीच नाही. भगवंतासाठी प्राचीन हिंदु नर-नारींनी ज्या अमानवी त्यागाचा ज्वलंत आदर्श आमच्या पुढे ठेवला त्या गोष्टीला जगतांत इतरत्र कुठेच तुलना आढळणार नाही. अतिप्राचीन अशा सुसंस्कृत आर्यजातींतील प्रचलित आचार-व्यवहाराचें सम्यक् पर्यालोचन केल्यास हेंच दिसून येतें की केवळ धर्मासाठी, असाध्य गोष्टी करतांना आर्यलोक मुळीच विचलित होत नसत.

### आत्मसमर्पण कशासाठी

एखादी देवमूर्ति, एखादें तीर्थक्षेत्र वा पवित्र स्थान पाहिलें की भक्तिमान हिंदूला तेथे भगवंताच्या अस्तित्वाचा अनुभव येतो, आणि तसें झालें म्हणजे तत्क्षणीं ह्या क्षुद्र देहाविषयी त्याला कमालीची अनास्था वाटू लागते, आणि असल्या शुभक्षणीं जर त्याचा देह गळून पडला तर मग त्याच्या आनंदाला सीमा

राहत नाही. लहानमोठ्या स्त्रीपुरुषांना माहीत आहे की आत्मा विनाशी नाही. आणि म्हणूनच आत्मज्ञान-प्रवण असा हा आर्यवंश; पृथ्वीवरील इतर सर्व सुधारलेल्या जमातीच्या यथार्थ उत्थानाच्या अगोदरच, मृत्युभय-रहित झाला आहे. ज्या आत्मज्ञानसंपन्न जातीच्या बाबतींत मृत्यु ही एक क्षुल्लक गोष्ट आहे, ज्या समाजांतील लोक सापाच्या कातेप्रमाणे एक देह सोडून दुसरा धारण करण्यास अगदी सहजपणें तयार असतात, त्या आत्म-विज्ञानसंपन्न आर्यवंशांतील लोकांच्या दृष्टीने आपल्या इष्टदेवतेच्या आराधनेसाठी, यज्ञासाठी, जीवसेवेसाठी, एखादें महत्कार्य साधण्या-साठी, तीर्थक्षेत्र वा ऐश्वरीय भावोद्दीपक प्राकृतिक दृश्य पाहून तद्गतप्राण होऊन आत्मसमर्पण करणें ही एक अत्यंत स्वाभाविक अशी गोष्ट आहे. भारताच्या इतिहासांतील पानांपानांवर ह्या विधानाला पुष्टि देणाऱ्या अनेक घटना आपल्याला आढळून येतात.

मुसलमानांचें राज्य असतांना ह्या भारतांतील प्रातः-स्मरणीय पुण्यशील आर्यमहिला स्वधर्मरक्षणासाठी अग्निप्रवेश करून मृत्यूला कवटाळीत, हें आर्यजातीच्या मृत्युविषयक निर्भयतेचें प्रमाण नाही काय ? ज्या समाजांतील अत्यंत कोमल अशा नारी-वर्गामध्येहि असला मृत्युंजयी भाव आढळून येतो त्या संपूर्ण समाजाचें अद्भुत चारित्र्य आकलन करणें आधुनिक सभ्यतेचा अभिमान बाळगणाऱ्या, देह हाच आत्मा मानणाऱ्या, मूढ व्यक्तींना शक्य नाही. आर्यांच्या चारित्र्याचें खरें महत्त्व न कळल्यामुळे त्यांना भारतांत सर्वत्र रानटीपणाचेच आचार विखुरलेले दिसतात, आणि म्हणूनच मला वाटतें की एखाद्या बुजगावण्याला बुजून गेल्याप्रमाणे ते आर्यजातीच्या श्रद्धास्थानांवर कुऱ्हाडीचे घाव घालण्यास सर-

सावले असतात. परिणाम असा झाला की त्यांच्या कठोर राज्यशासनामुळे एक दोन प्रथा जरी निषिद्ध ठरल्या असल्या तरी हिंदूंच्या 'स्वेच्छामृत्यू'चा अजूनहि लोप झाला नाही. आत्मज्ञानरूपी महामंत्राची दीक्षा घेतलेली आर्यजाति आजहि मृत्युभयरहित होऊन पृथ्वीवरील इतर पुढारलेल्या लोकसमाजांना त्या सनातन मार्गाकडे नेत आहे. सर्वस्वाची लूट झालेली आर्यजाति आजहि जगतांत जन्ममृत्यूच्या खऱ्या रहस्याचा प्रचार करीत इतर अनेक सुधारलेल्या समाजांना उन्नतीकडे नेत आहे. निष्कांचन भारत आजहि आपल्या अमोल अशा ज्ञानभांडारांतील रत्नें मुक्तहस्ताने वांटून स्वतःच्या असीम उदारतेची ओळख देत आहे. प्रबळ व आक्रमी ब्रिटिश राज्यशासनामुळे, सहगमन करूं न शकणाऱ्या विधवेवर धाकदपटशा व जबरदस्ती होणें बंद झाल्यामुळे आमच्या देशावर पुष्कळ उपकार झाले आहेत हें खरें, पण पतिव्रता आर्यरमणीच्या संकल्पित कार्यामधे आजहि बाधा आणण्यास कुणीहि समर्थ झालेले नाही.

विदेशीय लोकांच्या वारंवार आक्रमणामुळे भारतीय आर्यसमाज जेव्हा अतिशय हीन दशेस प्राप्त झाला तेव्हा त्यामधे नानाप्रकारच्या खुळचट समजुती शिरल्या. अधिकारानुसार स्वधर्मानुष्ठानाऐवजी जुलुमजबरदस्तीचे प्रयोग होऊं लागले. ह्यामुळेच मला वाटतें हिंदुसमाजामधे कांही काळ अति निष्ठुरपणें सतींचें दहन करण्याचा दुराग्रह आढळून येत होता. ह्या दुराग्रहामुळेच अति प्राचीन सुसभ्य हिंदुसमाजाला आज बरेचजण अत्यंत घृणास्पद व टाकाऊ समजतात व तसा प्रचार करतात.

कोणतीहि आत्मज्ञानविहीन जाति हिंदूंच्याप्रमाणे ऐश्वरीय भावाने मत्त होऊन विनायास देह मोकलण्यास समर्थ झाली नाही.

सुप्रसिद्ध चिनी यात्रेकरू ह्युएन्त्संग याने जेव्हा भारतांत पाय ठेवला तेव्हा तर भारत विद्या, बुद्धि, ज्ञान, धर्म व ऐश्वर्य यांच्या बाबतींत सर्व जगतांत अग्रगण्य होता. तसें जर नसतें तर इतक्या दूरच्या सुसंस्कृत व सभ्य अशा प्राचीन चीन देशाहून, मानवी शक्तीच्या बाहेर असणारे अतोनात कष्ट सहन करून व अलौकिक त्याग करून तो भारतास यावयास निघाला असता ? ह्युएन्त्संगाने जेव्हा प्रयागधामीं देहपात करण्याची हिंदुसमाजांत प्रचलित असलेली प्रथा पाहिली तेव्हा काय भारतीय आर्यसमाज इतका निंदनीय व घृणास्पद होता ? आणि आताच काय इतक्या अल्पशा कालावधींत विलायती शिक्षणाच्या प्रकाशाने तोच रानटी समाज एकदम सुसभ्य होऊन गेला ?

### पूर्वीचे लोक इतके मूर्ख नव्हते

हतभागी भारतांत सध्या आता हिंदूंच्या घरोघरीं तें सहगमन नाही, हल्ली आता देहादिभावरहित हिंदूंचे इष्टदेवतेच्या मूर्तीसमोर बसून सहजासहजी निष्कपट भावाने केलेलें आत्मनिवेदन नाही. आणि आता चिन्मयी गंगेच्या व यमुनेच्या संगमावरील अपरूप लहरींच्या दर्शनाने विभोर होऊन, आत्मविसर्जन करण्याचीहि तितकी सोय नाही, हें सर्व खरें, परंतु मग आत्महत्येचें प्रमाण कमी न होतां दिवसेंदिवस वाढतच आहे, तें कां ? सांसारिक भांडणतंट्यामुळे, घरगुती बेबनावामुळे वा इतर कोणत्याहि क्षुल्लकशा कारणामुळे किंकर्तव्यमूढ होऊन हल्ली कितीतरी बायामाणसें गळफांस लावून, विष खाऊन वा इतर अन्य उपायांनी आत्महत्या करून सांसारिक क्लेशांपासून मोकळीक मिळविण्याचा प्रयत्न करतात. पूर्वीचे लोक मला वाटतें इतके मूर्ख नव्हते.

### संगमांतील असीम शक्ति

असो. घटनावैचित्र्याच्या दृष्टीने पाहिलें तर प्रयाग हें आमचें सर्वांत प्रमुख तीर्थस्थान आहे ह्यांत संदेह नाही. या प्रयागराजाच्या दर्शनाने किती अलौकिक घटना आमच्या स्मृतिपटलावर उदय पावतात, त्या सर्व लिहून या प्रबंधांत संपविणें माझ्या शक्तीबाहेरचें काम आहे. अजूनहि ही वैचित्र्यपूर्ण भूमि तितकीच मोहक आहे. प्रयागच्या प्राचीन कीर्तिगौरवाशीं तुलना केल्यास जरी हल्लीची अवस्था किंचित् अवनत झालेली वाटेल, तरी तीर्थमाहात्म्याच्या बाबतींत थोडेंहि उणेंपण आलेलें नाही. आजहि डोळस व्यक्तीला आढळून येईल की ह्या गंगा-यमुना संगमलहरींमधे किती असीम शक्ति भरलेली आहे, आणि त्या महाशक्तीच्या प्रभावामुळे अगदी हल्लीच्या काळापर्यंत ह्या विचित्र क्षेत्रांत कितीतरी लोकांनी मोठमोठीं पावन कार्यें अनुष्ठिलीं आहेत. ज्या शुभ मुहूर्तावर ही पवित्र भूमि गंगा-यमुना संगमाच्या लहरींनी प्रथम ओली झाली, त्या क्षणापासून हें अपूर्व क्षेत्र अनंत शक्तीने ओतप्रोत भरून गेलें आहे. आणि तेव्हापासून असंख्य अशा अलौकिक गौरवमय कथांची आधारभूमि होऊन पुण्यधाम प्रयाग आम्हांला रिझवीत आहे. गंगा-यमुनेचा संगम आहे म्हणूनच प्रयागांत इतकें वैचित्र्य, इतकी शक्ति आणि इतकें त्याचें महत्त्व. प्रयागाच्या ह्या वैचित्र्याचें मुख्य कारणहि गंगा-यमुनेचें एकत्र मीलन. अपराविद्यारूपिणी यमुना जणु पराविद्यारूपिणी भागीरथीच्या जलांत मिळून गेली आहे, प्रवृत्तिरूपा यमुना आपली लीला संपवून निवृत्तिरूपा भागीरथीच्या शांतिवारीमधे निमग्न झाली आहे. श्रीभगवंताची लीलासंगिनी असलेल्या यमुनेच्या दर्शनाने जशी आसन्नमुक्त पुरुषाच्याहि हृदयांत अनुपम मधुमयी

भगवल्लीलारसमाधुरी पान करण्याची बलवत्तर इच्छा होते, तद्वत् अनंतसलिला भागिरथीच्या दर्शनानेंहि जीवांच्या सकल वासनांची निवृत्ति होते. सद्गतिदायिनी भागीरथी जशी जीवमात्राची मोक्षदायिनी होऊन आपलें अपूर्व माहात्म्य आजहि अबाधितपणें राखीत आहे, आपल्या अंतिम दिवसांचें स्मरण करवून देऊन जीवमात्राला वैराग्यसाधनेकडे वळवीत आहे, त्याचप्रमाणे कालिंदी यमुनाहि श्रीभगवंताच्या अभूतपूर्व व्रजलीलेच्या कथांची आठवण देऊन मुक्तपुरुषांना जणु ह्या मर्त्यभूमीवर पुन: येण्यासाठी आवाहन करीत आहे; महावैराग्यवान पुरुषाच्या हृदयांतहि जणु पुन: ती दिव्य भगवल्लीला डोळे भरून पाहण्याची वासना चेतवीत आहे.

### गंगा-माहात्म्याचा प्रचार

विविध स्वभावसंपन्न गंगा व यमुना यांच्या माहात्म्यप्रभावामुळेच प्रयागराज अनंत ऐश्वर्थ व भोग आणि अपूर्व विवेकवैराग्य व त्याग ह्यांची लीलाभूमि होऊन हतभागी भारताच्या अपार महिम्याने अजूनहि सर्वांना आश्चर्यचकित करीत आहे. यमुनेने जणु आपलें अनंत ऐश्वर्यभांडार प्रयागांतील तीरांवर ओतून दिलें आहे आणि आपलें इष्ट कार्य सुसंपन्न करून कितीतरी दिवसांनी जान्हवीसंगिनी होऊन ती ह्या भूतलावर निवृत्तीची जयघोपणा करीत करीत गंगा-माहात्म्याचा प्रचार करीत आहे.

सृष्टींतील प्रत्येक वस्तूविषयी विचार केल्यास असें स्पष्टपणें आढळून येतें की, ह्या चराचर विश्वब्रह्माण्डांतील एखाद्या क्षुल्लक जीवाणूपासून तों अलौकिक शक्तिसंपन्न अशा देवकोटीपर्यंत आणि एखाद्या सामान्य परमाणूपासून तों अतिविशाल

तारामंडलापर्यंत कोणतीहि गोष्ट एखाद्या विशिष्ट उद्देशाशिवाय सृष्ट झालेली नाही. आणि सृष्ट झालेली प्रत्येक वस्तु आपापलें निर्दिष्ट कार्य पार पाडून विश्वसृष्टीचें हें विचित्र चक्र चालू ठेवीत आहे. ह्या सुविशाल विश्वराज्यांतील एखादा अतिसामान्य पदार्थहि जिथे विना प्रयोजन निर्मित झाला नाही, तिथे चिन्मयी गंगा व प्रेममयी यमुना यांचें ह्या मर्त्यलोकांतील अवतरण कोण्या एका विशिष्ट उद्देशानेच झालें असेल ह्यांत मुळीच संशय नाही. म्हणूनच गंगा व यमुना यांच्या माहात्म्याचा किंचित् का होईना उल्लेख केल्याशिवाय प्रस्तुतचें उत्तराखंडमाहात्म्यवर्णन अपुरें राहिलें असतें. म्हणूनच मला तीर्थराज प्रयागाविषयी थोडेसें सांगून, हिंदूंचीं तीर्थक्षेत्रें किती पवित्र आणि महान् असतात व त्यांच्यांतील ईश्वरी शक्ति हिंदुमात्रांत कसें चैतन्य निर्माण करते इत्यादि विषय निवेदन करणें भाग पडलें. हिंदूंची आध्यात्मिकता व त्यांचा चारित्र्यगरिमा हा सर्वांनाच कळण्यासारखा नाही, आणि विदेशी व विजातीय धर्मप्रचारक हे भारतीय आत्मज्ञानपरायण, श्रद्धावान आर्यांच्या चारित्र्याचें वास्तविक महत्त्व न समजू शकल्यामुळे सर्वासमोर त्याचें जें ओंगळ चित्र रंगवितात तें आधार-हीन असून वस्तुस्थितीशीं अत्यंत विसंगत असतें हें स्पष्ट करण्याचा मीं येथे प्रयत्न केला. पृथ्वीवरील पुरातन वेदविद् आर्यऋषिमुनि कधीच रानटी नव्हते आणि त्यांचे कोणतेच आचार-विचार रानवटपणाचे नव्हते. प्रस्तुत प्रबंधाचा हा प्रतिपाद्य विषय नसतांनाहि लिखाणाच्या ओघांत तो उपस्थित झाल्यामुळे त्याच्या-विषयी चार शब्द लिहावे लागले.

जाऊं द्या तें. आता तीर्थराज प्रयागाचे भोग-मोक्षदायक देवदुर्लभ पवित्र रेणु कपाळास लावून, श्रीकेदारनाथाच्या रस्त्या-

वरील त्या मंदाकिनी व कालीगंगा यांच्या संगमाहून पुढे चलूं या व पाहूं या श्रीकेदारनाथ कसे आहेत तें.

### गौरीकुंडाकडे

सकाळीं त्या सुपवित्र देवनदीसंगमांत यथेच्छ बुड्या मारून मी तेथून गौरीकुंडाकडे जावयास निघालों. गुप्तकाशी व त्रियुगी-नारायण यांच्या पलीकडे व श्रीकेदारनाथाच्या अलीकडे आपल्या माहात्म्याच्या प्रभावामुळे गौरीकुंड विशेष प्रसिद्ध आहे. त्रियुगी-नारायणापासूनच भक्तिमान् यात्रेकरूंचीं मनें गौरीकुंडाच्या दर्शनासाठी उत्सुक होतात आणि तेथे लवकर पोहोचण्यासाठी अंत:करणें अतिशय व्याकुळ होतात. असें होण्याचें मुख्य कारण हें की, गौरीकुंडापाशी येऊन पोहोचलें म्हणजे जवळजवळ श्रीकेदारनाथ गाठल्यासारखेंच होतें. शिवाय गौरीकुंडांतील उष्ण झऱ्यांविषयी ऐकलें म्हणजे थंडीमुळे गारठलेल्या यात्रेकरूंना केव्हा एकदा तेथे जाऊन स्नान करतों असें वाटणें स्वाभाविक आहे. केदारनाथ येथील दारुण थंडी न सोसणाऱ्या यात्रेकरूंना गौरी-कुंडांतील उष्ण पाण्याचा झरा अत्यंत सुखप्रद वाटावा यांत नवल तें काय ? गौरीकुंडाकडे जसा जसा जाऊं लागलों तशी तशी गिरिराजाची ती अभिनव अत्युज्ज्वल विराटमूर्ति पाहून मनांत येऊं लागलें की, गिरिराज वेगवेगळ्या स्तरांवर निरनिराळे विचित्र वेप परिधान करून सजला आहे. जसजसा वर चढूं लागलों आणि सभोवार अवलोकन करूं लागलों, तसतसें जणु हिमगिरीच्या अंगावरील एकेक वस्त्र बाजूला सारून त्याच्या कुशींत शिरत असल्यासारखें मला वाटूं लागलें. केदारनाथांच्या त्या अपरूप राज्यांत गिरिराजांची नित्य नवनवीन साजसज्जा आणि त्याची अधिकाधिक उज्ज्वल मूर्ति डोळे भरून पाहिल्यावर

माझें मन आणि प्राण यांची अवस्था काय झाली तें भाषेच्या द्वारें सांगणें अशक्य आहे. ज्या केदारनाथाच्या जवळील स्थानसमूहांच्या अपार सौंदर्यराशींनीच मी इतका दिङ्मूढ झालों, तर आता साक्षात् त्या केदारनाथाच्या दर्शनाने काय होईल ह्याचा विचार करीत करीत तिसऱ्या प्रहरीं मी गौरीकुंडाशीं येऊन थडकलों.

### मंदाकिनीचा मृदुमधुर भाव

रंगीबेरंगी पानांच्या घनदाट वृक्षराजींनी आच्छादिलेल्या, बर्फ सांकळलेल्या, सभोवार गिरिशृंगांनी वेढलेल्या एका निरुंद भूखंडावर पवित्र गौरीकुंड वसलेलें आहे. मंदाकिनीच्या निर्मल जलराशींनी गौरीकुंड सदाचेंच पाणावलेलें व उसळत्या प्रवाह्याच्या शीतळ तुषारांनी सदाचेंच न्हालेलें असतें. गौरीकुंडाच्या मंदिरामधे जगन्माता गौरीची एक दिव्य प्रतिमा प्रतिष्ठित आहे. मंदिराचा पायथा धुऊन प्रबल वेगवती मंदाकिनी पुढे वाहत गेली आहे. गौरीकुंडाच्या अल्पशा सपाट क्षेत्रांत जगज्जननीच्या मंदिराच्या जवळपास आल्यावर तिने ( मंदाकिनीने ) जणु थोडासा शांतभाव धारण केला आहे. दुसऱ्या इतर ठिकाणीं मंदाकिनी-प्रवाहाची जी भैरव गर्जना ऐकायला येते ती जणु येथे महामायेच्या स्तोत्रगानामधे परिणत होऊन तिने अपेक्षेबाहेर मृदुमधुर भाव धारण केला आहे असें वाटूं लागतें. त्यानंतर एका गरम झऱ्याच्या धारेमुळे सुखोष्ण झालेलें हें देवदुर्लभ, परम रमणीय गौरीकुंड, दूरदूरच्या प्रदेशांहून आलेल्या यात्रेकरूंच्या दृष्टीने विशेष सुखदायक झालेलें आहे आणि त्यांना केदारनाथाची कडक थंडी सहन करण्याची क्षमता देऊन त्यांचीं हृदयें सबळ करीत आहे. या गरम झऱ्याचें उष्ण पाणी कृत्रिम उपायांनी वाहवत आणलें असून एकसारखा झर्र झर्र शब्द करीत तें एका

दगडी कुंडामधे सारखें पडत असतें. ह्याच कुंडाला गौरीकुंड म्हणतात. हा उष्णजलप्रवाह ह्या कुंडामधेच न थांबता एकदम पुढे मंदाकिनीच्या वितळलेल्या हिमाच्या अतिशीतल स्वच्छ प्रवाहांत मिसळून जातो. ह्या उष्ण झऱ्यांतील पाणी गंधकमिश्रित असल्यामुळे त्यांत कित्येक वेळां स्नान केलें की सर्व प्रकारचें त्वचारोग बरे होतात. श्रीकेदारनाथाच्या मार्गावर अन्यत्र असा उष्ण झरा कुठे पाहण्यांत आला नाही. सतत हिमाच्छादित प्रदेशांतील अंगास झोंबणाऱ्या तीव्र थंड वाऱ्यामुळे थरथर कांपणाऱ्या यात्रेकरूंना या उष्ण प्रवाहांत स्नान केलें म्हणजे अतोनात सुख वाटतें आणि कांही काळ का होईना केदारनाथाच्या असह्य थंडीची विस्मृति होते.

### केदारनाथाच्या रस्त्यावरील शेवटची वस्ती

मी गौरीकुंडाला येऊन पोहोचलों. सभोवार पाहतों तों जागा निरनिराळ्या प्रांतांतील यात्रेकरूंनी खच्चून भरलेली. यात्रीगणांचा कोलाहल आणि देवनदी मंदाकिनी हिचा कलकल निनाद ह्यांच्या मिलाफांतून एक वेगळाच मोहक ध्वनि वातावरणांत घुमत होता. श्रीकेदारनाथाच्या रस्त्याने अगस्त्यमुनि, गुप्तकाशी व त्रियुगीनारायण ह्यांच्याशिवाय इतकी निसर्गसुंदर व जनमानवपूर्ण चट्टी व परम रमणीय सुप्रशस्त ठिकाण इतर कोणतेंच आढळलें नव्हतें. येथे बरींच दुकानें आहेत. येथे यात्रेकरूंना आवश्यक असलेल्या सर्वच जिनसा, डाळ, तांदूळ वगैरे विकत मिळतात. राहावयाच्या जागेचाहि विशेष अभाव नाही. श्री केदारनाथाच्या रस्त्यावरील गौरीकुंड हीच शेवटची वस्ती आहे. पुढे बाबा केदारनाथांचें मंदिर सोडलें तर अशी पक्की दगडामातीचीं वा विटबंदीचीं घरें व मंदिरें पुढे नाहीत. थंडीच्या दिवसांत बर्फ वगैरे बरेच पडत असल्या-

मुळे ह्या गौरीकुंडांतहि कुणी राहूं शकत नाही. येथील लोक तेव्हा आसपासच्या खेड्यापाड्यांमधे जाऊन राहतात.

### हर-पार्वतीची लीलाभूमि

गौरीकुंडाबद्दल वर जी कांही माहिती सांगितली आहे तेवढ्यानेच संपलें नाही. हिमालयांतील इतर अनेक ठिकाणांप्रमाणे केवळ निसर्गसौंदर्याकरिताच गौरीकुंड प्रसिद्ध नाही. भूतकालांतील ज्या अपूर्व व परमपावन स्मृति ह्या ठिकाणाच्या दर्शनाने आमच्या हृदयांत चाळविल्या जातात, आणि ज्या विस्मयजनक घटनावलीशीं हें गौरीकुंड व श्री केदारनाथांचा हा शैल संबद्ध आहे त्या घटना येथे सांगणें योग्य होईल. अर्थातच सतत चार वर्षेपर्यंत उत्तराखंडांतील सांदीकोपऱ्यांतील घळीं व दुर्गम ठिकाणें पाहून मला जेवढें कांही समजलें व लोकांच्या तोंडून कळलें, तेवढ्यावरून मी आता इतकें निश्चित सांगूं शकतों की हर-पार्वतीची समस्त लीला ह्या केदार-राज्यांत घडून आली. हर-पार्वतीच्या लीला-माहात्म्याने हें अद्भुत असें केदार-राज्यमंडळ परिपूर्ण असें आहे, आणि म्हणूनच मला वाटतें की तें इतकें वैचित्र्यवान् व गौरवशाली आहे. संपूर्ण उत्तराखंडांत जेवढीं म्हणून प्रसिद्ध तीर्थें आहेत त्यांच्याशीं तुलना केल्यास चटकन् आढळून येतें की हा केदारनाथांचा परिसर म्हणजे उमापति शंभूराजांचा खास महाल. आणि म्हणूनच मला वाटतें या स्थानाचा एवढा प्रभाव व महिमा.

### तपस्येला अनुकूल ठिकाण

असो, आता गौरीकुंडाविषयी थोडासा विचार करून पाहूं या की त्याचें एवढें माहात्म्य कशामुळे वाढलें. येथील रमणीय नैसर्गिक दृश्य व आल्हादकारक वातावरण पाहिलें म्हणजे मनांत येतें की यासारखें तपस्येला सर्वतोपरी अनुकूल असें स्थान हेंच.

साक्षात् गिरिराजनंदिनी गौरी या परम पवित्र महाक्षेत्राची अधिष्ठात्री देवता असल्यामुळे तिच्याच नांवाने हें ठिकाण पुरातन कालापासून प्रसिद्धीस आलें. ह्या सुरम्य स्थानाच्या नुसत्या दर्शनाने माझें मन व प्राण इतके हरखून गेले की ह्याच्या पंचक्रोशींतील इतर दर्शनीय स्थळांचें विशेष लक्षपूर्वक निरीक्षण केलें असतें तर माझी काय अद्‌भुत अवस्था झाली असती तें सांगवत नाही. आद्याशक्ति महामाया हिने जणु खरोखरच स्वतः ह्या निर्जन प्रदेशांत आपल्या महाकठोर तपाचरणासाठी हें देवदुर्लभ ठिकाण निर्माण केलें आणि तपस्येला आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींनी व सोयींनी ही जागा सिद्ध केली. गिरिराजनंदिनी उमेने ह्याच परम रमणीय व गहन ठिकाणीं अत्यंत कठोर तपस्या करून भोलानाथ सदाशिवाचें मन जिंकून घेतलें. आई जगदंबा ह्याच ठिकाणीं जगत्पिता जगदीश्वराशीं एकरूप झाली आणि देवगणांची आशा सफळ करून तिने अवघ्या विश्वांतील लोकांना मुग्ध केलें. या घटनेच्या खाणाखुणाहि इथे अनेक सापडतात. ह्या केदारशैलावरच महातपस्येंत निमग्न असलेले भूतभावन भोलानाथ जगज्जननी पार्वतीच्या सेवेमुळे परम संतुष्ट झाले होते ह्यांत मुळीच संशय नाही. कारण केदार येथील सुरम्य, महान् व अपार वैभवाचें भव्य दृश्य पाहिलें की हें स्थान म्हणजे दुसरें कैलासच आहे असें वाटतें. गिरिराजांची अमरावतीतुल्य नगरी, पार्वतीचें जन्मस्थान ह्या केदारशैलाजवळ आहे असें पाहून, आणि जणु भगवती गौरीचा येथे सहज समागम घडावा म्हणून जगज्जनक सदाशिवांनी कैलास सोडून दिला व येथे जगन्मातेची जन्मभूमि असलेल्या या महापवित्र क्षेत्राच्या पुण्याईने आकृष्ट होऊन ते तपाचरणांत निमग्न झाले. अथवा सासुरवाडींतील लोकांच्या जिव्हा-

ळ्यामुळे आकृष्ट होऊन आमचे देवबाप्पा आपल्या आजोळाच्या इतक्या जवळपास येऊन ध्यानधारणेंत गढून गेले. मग हर-कोपानलांत मदनदेव भस्मीभूत झाला आणि मा जगदंबा हताश होऊन घरीं परतली. त्यानंतर गुरुजनांच्या सांगण्यावरून देवाधिदेव महादेवाची अर्धांगी होण्याच्या मनीषेने, पुनः तिनें ज्या गौरीशिखर नामक ठिकाणीं खडतर तपस्या केली, ती परमपवित्र तपोभूमि ह्या गौरीकुंडाच्याच आसपास आहे ह्यांत मुळीच संशय नाही. पुराणादि ग्रंथांत आणि महाकवि कालिदास याने रचलेल्या 'कुमारसंभव' ह्या महाकाव्यांत गौरीशिखराविषयीचें वर्णन आढळून येतें. त्या वर्णनांशीं पडताळून पाहतां ह्या ठिकाणाची विशेषपणें ओळख पटते. या गौरीकुंडालगतच गौरीशिखर होतें त्याची साक्ष देण्यासाठी बाबा केदारनाथ जवळच उपस्थित आहेत. आणि विश्वजननी भगवती अंबेने स्वतःच्या कमलासारख्या कोमल हातांनी लावलेलीं रोपें व आईच्या हृदयांतून स्रवणाऱ्या अमृतधारांनी परिपुष्ट झालेले अमर लताकुंज आणि फोफावलेले मोठमोठे वृक्ष अजूनहि त्या मर्त्यधामाला स्वर्गापेक्षाहि श्रेष्ठ बनवीत आहेत. संपूर्ण उत्तराखंडांचें माहात्म्य हें केदारखंडांतच आहे. आणि म्हणून इतर कांही आधार पाहण्याची आवश्यकता मला वाटत नाही.

### योगियांचा राजा ढळविला

जगन्माता गौरीने ह्या ठिकाणीं इतकी तपस्या केली म्हणून ह्या जागेचें एवढें महत्त्व आणि म्हणूनच ह्या ठिकाणाला मिळालेली कायमची ख्याति संपूर्ण हिमालयाचा व उत्तराखंडाचा महिमा व त्यांची रमणीयता व पवित्रता ह्या गोष्टी जरी अतुलनीय असल्या तरी नैसर्गिक सृष्टिशोभेमधे, संपत्तीमधे आणि गांभीर्यामधे श्रीकेदारनाथ सर्वापेक्षा श्रेष्ठ व

वरचढ आहे हें निःसंशय. हर-पार्वतीची लीलाभूमि असलेलें हें केदारराज्य विधात्याच्या एका विशिष्टि इच्छेने सृष्ट झालें आहे असें मला वाटतें. विधात्याचें सगळें कलाकौशल्य व त्याचें अनंत रत्नें असलेलें भांडारघर हें पार खर्च करून, मला वाटतें हें निरुपम असें केदारराज्य निर्माण झालें. असो. याच ठिकाणीं एके दिवशीं आपल्या कठोर आणि अलौकिक तपश्चर्येने महाकाल रुद्राला देखील उमेने विस्मित करून टाकलें होतें. याच ठिकाणीं एके दिवशीं सती पार्वतीनें त्रिभुवनांतील लोकांना आश्चर्यचकित करून सोडणाऱ्या तपस्येने, योगियांचा राजा शंभु भोलानाथ याचें मन ढळविलें होतें. याच ठिकाणीं एके दिवशीं तपोनुष्ठानांत गढलेल्या जगज्जननी गौरीच्या रूपलावण्याच्या पवित्र दर्शनाने चंद्रमौलि सदाशिवाचें भान हरपलें होतें आणि ब्रह्मचाऱ्याच्या वेशांत येथे येऊन आद्याशक्ति महामायेच्या आंतरहेतूची दृढता अजमावण्याकरिता त्यांनी अगोदर यथेच्छ शिवनिंदा केली व नंतर महामायेची मनोवांच्छा पूर्ण केली. ह्याच ठिकाणीं एके दिवशीं हरगौरीचें मीलन झालें होतें. हर-पार्वतीच्या तपोभूमीचें, आणि त्यांच्या संजीवक महामीलनाच्या विलासभूमीचें अपूर्व माहात्म्य, विस्तृतपणें लिहिण्याची शक्ति माझ्यांत नाही. तरी त्यांच्या ठिकाणीं असलेल्या एकनिष्ठ श्रद्धेच्या प्रभावामुळे, आणि मनामधे ह्या समयीं उसळणाऱ्या भावनांच्या प्रबळ आवेगामुळे, जमेल तसें माझ्या कुवतीप्रमाणे लिहिण्याचा मी प्रयत्न करीत आहें. तें कितपत साधेल तें मला माहीत नाही.

ह्या गौरीकुंडापासून श्रीकेदारनाथपर्यंतच्या भप्रदेशांत ज्या असंख्य अद्‌भुत व विस्मयजनक दृश्यांची रेलचेल आहे त्या सर्वांचें वर्णन मी बापडा कसें बरें करणार ! माझ्यांतील सर्व

प्रतिभा एकवटून खर्च केली, तरी, ह्या माझ्या दुबळ्या लेखणी-द्वारें, त्या अलौकिक दृश्याचा किंचित् अंशहि मी प्रकट करूं शकणार नाहीं.

गौरीकुंडासारख्या अतुल प्रभावसंपन्न व परम रमणीय ठिकाणीं केवळ एका रात्रीचें वास्तव्य केल्याने माझें समाधान होत नव्हतें, पण त्याचबरोबर बाबा केदारनाथाच्या चरणांशीं पोहोचण्यासाठीहि माझें मन व्याकुल होत होतें. अर्थातच् दुसऱ्या दिवशीं पहाटेस मीं गौरीकुंड सोडलें व केदारनाथाची वाट चालूं लागलों. माझ्या सोबत ते फलाहारी उदासी महाराजहि होते. कधी ते पुढे, तर कधी मी पुढे अशी आमची वाटचाल बऱ्याच दिवसांपासून चालूं होती. जेथे आमचा रात्रीचा मुक्काम होई तेथेच मग बोलणें चालणें व गप्पागोष्टी होत असत.

### केदारनाथाकडे

गौरीकुंडाहून बाबा केदारनाथांचें मंदिर सहा कोस वर आहे. चढावाचा रस्ता एकसारखा वर वर गेला आहे. पहाडाला वळसे घेऊन जाणारी वाट हळूहळू पायाखाली घातली की आपण उंच उंच जात आहोंत असें स्पष्टपणें जाणवतें. हवेंतील गारठा गौरीकुंडापेक्षा आता जरा जास्त भासूं लागला. त्यानंतर जसजसा वर चढूं लागलों आणि बाबांच्या सुविशाल विश्वमंदिराच्या परिसरांत येऊं लागलों तसतसें त्या दारुण थंडीचें प्रमाण वाढूं लागलें. पण साऱ्या जीवनांत जें कधी पाहिलें नव्हतें व जें पाहा-वयास मिळेल अशी कल्पनाहि कधी करूं शकलों नव्हतों, तें चारहि बाजूंनी सर्वत्र दृष्टीस पडूं लागलें. निसर्गदेवतेच्या ज्या जिवंत भुवनमोहिनी मूर्तीचें मला दर्शन घडलें त्या दर्शनामुळे ह्या क्षण-भंगुर जीवनांतील सारें सारें दुःख मी अजीबात विसरून गेलों.

### दिव्य वनश्रीचें दर्शन

अहाहा, काय त्या रम्य घनदाट वृक्षांनी झाकलेल्या व नव्या कोमल पालवीने व सुगंधी फुलांनी बहरणाऱ्या लतावेलींच्या वस्त्रांनी आच्छादिलेल्या एकापेक्षा एक उंच अशा थरावरील पर्णकुटींच्या रांगा; काय तें बहरलेल्या फुलांच्या सुगंधी राशींतून स्रवणारें मत्त मधुमक्षिकांचें मधुर गुंजन, काय तें वनकुसुमांच्या सौरभाने तर्र झालेल्या वायूचें मृदुमंद वाहणें! आणखी पुन: त्या असंख्य-रंगीबेरंगी पक्ष्यांचे संगीतमय असे अनेक विचित्र ध्वनि आणि अक्लान्तपणें निनाद करणारा, कुठे सरळ, कुठे वक्र रेषे-प्रमाणे वाहणारा त्या मनोहारिणी निर्झरणीचा चांदीसारखा चकाकणारा द्रवमय प्रवाह व त्याचा अखंड असा हर हर जयघोष! रानफुलांच्या गालिच्यांवर निर्धास्तपणें पसरलेल्या लता, वेली-वल्लरी आणि सोन्यामोत्यांनी नि हिऱ्यामाणकांनीच बनवलेलीं व बर्फाच्या राशींनी सजलेलीं तीं विराट गिरिशिखरें! मला हजारों मुखें असतीं तरी ब्रह्मदेवाच्या त्या अचाट शिल्पचातुर्याचें आणि प्रकृतिदेवीच्या त्या विश्वमोहिनी सौंदर्यश्रीचें हुबेहूब वर्णन करण्याच्या बाबतींत माझी भाषा, माझी प्रतिभा, माझी शक्ति तोकडी पडली असती.

### महामायेचें सुविशाल उद्यान

महामायेचें असलें स्वरचित विचित्र मनोहर सुविशाल उद्यान व तपोवन, आणि त्यांतील जगज्जननी भवानीने पोटच्या पोराप्रमाणे प्रतिपाळ केलेलीं डेरेदार डौलदार झाडें व लता-गुल्मे, यांच्या अचिंतनीय प्रभावाने व सौंदर्यशाली दर्शनाने मी अतोनात विस्मित झालों, व माझ्या अंतःकरणाच्या तळकातळाचा भेद करून एका अपूर्व अशा मधुर रसाचीं कारंजीं उफाळूं लागलीं! मग मी

मनांत ह्याच विचार करूं लागलों की फळाफुलांनी लदबदलेल्या रंगीबेरंगी लतावेली आणि सुंदर सुंदर झाडें ह्या हिमालयांत तर आतापर्यंत कितीक ठिकाणीं पाहिलीं, पण त्यांच्या सौंदर्याचा माझ्यावर इतका प्रभाव कधी पडला नाही ? जमिनींतून वर येणारें रोपटें तें काय, पण त्याच्यामुळे माझ्या हृदयांत असल्या विभिन्न वृत्तिलहरी कधी तरंगित झाल्या नाहीत ? त्यांनी कधी आतापर्यंत माझ्या मनाला, हृदयाला, प्राणांना असा हात घातला नाही? आणि ह्याअगोदर मीं कधी कुठे असलें विचित्र स्वभावसंपन्न, असामान्य प्रभावशाली, परमानंद-दायक, महागौरवास्पद, पवित्र उपवन पाहिलें नाही ? त्यानंतर जसजसा मी मग त्या त्रिलोकपूज्य महापवित्र वनामधून हळूहळू बाबा केदारनाथांकडे जाऊं लागलों तसतसे मला हें ठिकाण इतकें प्रभावसंपन्न होण्याचें वेगळेंच कारण जाणवूं लागलें आणि माझ्या शंका समूळ नाहीशा झाल्या. ह्या विश्वराज्याची एकमेव साम्राज्ञी गिरिराजनंदिनी गौरी हिच्या अलौकिक तप:सामर्थ्याच्या प्रभावानेच हें ठिकाण संपूर्णत: भारून गेलें आहे अशी माझी पक्की खात्री झाली. षडानन कुमार कार्तिकेयाच्या अगोदर जन्मलेली ही वृक्षराजी जगदंबेच्या अपार स्नेहरसावर बालपणापासून पोसली गेल्यामुळे जणु अमर झाली आहे आणि आजहि ती पुत्रोचित नम्रभावानें फुलांच्या राशींच्या राशी मातृचरणीं वाहून मातृपूजेमधे मग्न झाली आहे. जगदंबेच्या असामान्य तपोभूमीचें अलौकिकत्व व माहात्म्य अक्षुण्ण ठेवून आजहि ही वृक्षराजी सर्वाभीष्टदायिनी महामायेच्या त्या विचित्र अमानवीय तपस्या-लीलेच्या अति पावन स्मृति आमच्या हृदयांत जागवीत आहे, आणि अत्यंत दूरच्या भूतकालांत घडलेल्या घटनांना जणु सजीव करून, आमच्या

डोळ्यासमोर मांडून, मातेच्या भक्तिमान संततीने वागावें तशीच वागत आहे.

### रामबाडा चट्टींत

असो. त्यानंतर मग मी असल्या कितीतरी पवित्रतम विचार-तरंगांच्या आघातप्रत्याघातांनी विव्हल होत होत गौरीकुंडाहून जवळजवळ तीन चार कोस रस्ता पार करून रामबाडा नांवाच्या एका चट्टींत येऊन दाखल झालों. गौरीकुंडांतल्याप्रमाणे पक्कीं मजबूत मकानें येथे अजीबात नाहीत. जे यात्रेकरू केदारनाथ येथील कडाक्याच्या थंडीने कांकडून जातात आणि एखादी रात्रहि तेथे काढूं शकत नाहीत, अशांच्याचकरिता फक्त, येथे कसेतरी मोठेमोठे धोंडेदगड रचून आणि झाडझाडोरा नि गवत यांचा उपयोग करून कांही झोपड्या बांधल्या आहेत. यात्रेकरूंना लागणाऱ्या अत्यंत गरजेच्या वस्तूंचीं म्हणजे खाण्यापिण्याचीं एक दोन दुकानेंहि पाहाडी लोकांनी चालविलीं आहेत. केदारदर्शनानंतर यात्रेकरू फक्त एखादीच रात्र येथे काढतील या हेतूने हें ठिकाण तयार केलें असल्यामुळे कोणतीहि वस्तु मोठ्या प्रमाणांत येथे विकत मिळूं शकत नाही. समतल भूप्रदेशांतील लोक येथेदेखील मोठ्या कष्टानेच एखादी रात्र काढूं शकतात. रामबाडा हीच केदारनाथच्या मार्गावरील अखेरची चट्टी आहे. येथून बाबा केदारनाथांचें मंदिर अंदाजें तीन कोस असेल. म्हणून येथील गोष्टहि वेगळीच ! थंडीच्या दिवसांत अमाप वर्फ पडून हें ठिकाण संपूर्णपणें झांकलें जात असल्यामुळे येथे पक्कीं घरें बांधतां येत नाहीत. कितीहि मजबूत घर असलें तरी हिमवर्षावाच्या भाराखाली तें खचून जमीनदोस्त होतें. पावसाळ्याचे कित्येक महिने, गरम कपडे व विस्तव यांच्यावर सर्व मदार ठेवून फक्त पाहाडी लोकच

येथे साध्या गवताच्या खोपटांत काढूं शकतात. पहाडी लोक सोडले तर इतर प्रांतांतल्या लोकांना येथे एखादी रात्र काढतां येणें म्हणजे त्यांची मोठी तपस्या फळाला येणें असेंच येथील लोक समजतात.

### हिमालयाच्या कटीवर अभ्रांचें कडें

असो. त्या चट्टीमधे मीं विश्रांति घेतली नाही. उभ्याउभ्या एकवार आंतून चक्कर मारून आलों, माझें मन सारखें बाबा केदारनाथांच्या दर्शनासाठी उतावीळ होऊन पुढे पळत होतें. केदारनाथांच्या अधिराज्याच्या सीमाप्रान्तीं प्रवेश करतांच जीं नवलाईचीं दृश्यें पुन:पुन: पाहून मी विस्मयाने मुग्ध झालों होतों त्या दिव्यभूमीच्या सम्राटाचें निवासस्थान किती वैचित्र्यपूर्ण असेल, तेथे गेल्यावर हृदयांत उच्चतम भावभावनांचा किती कल्लोल उठेल व त्या ठिकाणीं पोहोचल्यावर माझ्या मनाची काय अवस्था होईल इत्यादि विविध कल्पनांत मी दंग होऊन गेलों होतों. कदाचित् परमानंदाच्या त्या चिन्मय सागरांत माझा कायमचा विलयहि होऊन जाईल असें मला वाटूं लागलें. त्या कल्पनांच्या अपार्थिव आनंदाने वेडा होऊन मीं रामबाडा सोडलें आणि झपाट्याने केदारनाथ बाबांच्या मंदिराकडे जावयास निघालों. रामबाडा चट्टीपासून डोंगरांचें दृश्य व त्यांचा स्वभावधर्म अजीबात पालटून गेला आहे. नगाधिराज हिमालयाच्या पायथ्यापासून इतके दिवस त्याला घनदाट अरण्यांनी सजलेला पाहत आलों होतों. गौरीकुंडापासून जसजसा वर चढूं लागलों तसतसे हें वनवस्त्र विरळ झालेलें दिसून येत होतें. हिमालयाच्या शुभ्र सुविशाल वक्षस्थळावर साल व देवदार यांची जी घनदाट रोमराजी आतापर्यंत शोभायमान दिसत होती आणि मनोहर

लतांकुजांनी आच्छादिलेलीं व पक्ष्यांच्या किलबिलाटांनी बोलकीं झालेलीं गिरिशिखरें नजरेसमोर येत होतीं, तीं आता दिसेनाशीं झालीं. येथे आता फक्त गगनचुंबी, अत्युच्च, अलंध्य, अगाध, हिममय-शिखरांच्या असंख्य रांगा माझ्या नजरेसमोर उभ्या ठाकल्या होत्या. आणि खळखळ वाहणाऱ्या गिरिप्रवाहांचा कलकल ध्वनि माझ्या कर्णसंपुटांत शिरत होता. आणि येथून सभोवार नजर फेकली तेव्हा दिसलें की खरोखरच शुभ्र अभ्रांचें कडें एखाद्या मेखलेप्रमाणे धरणीधर हिमालयाच्या कटिप्रदेशावर रुळत होतें !

## निरुपाधिक ब्रह्माचें साकार रूप

केदारनाथाच्या खालील भूखंडाहूनच डोंगरांच्या कमरे-भोवती स्वच्छ ढगांचें पडलेलें एक कडें मोठें सुंदर दिसत होतें. त्यांत पुन: उंचीवरच्या शिखराहून खाली नजर फेकली की तेथे कधी मुसळधार पाऊस पडत असलेला पाहून मोठें आश्चर्य वाटत होतें. गिरिश्रेष्ठाच्या ह्या एकेका उत्तुंग शिखरावर विभिन्न भावांचा एकत्र समावेश पाहून मला मोठाच चमत्कार वाटला. एकच डोंगरमाथा कुठे अखंड जलवर्षावाने धुऊन निघाला आहे तर कुठे सूर्याच्या प्रखर किरणांनी संतप्त नि परिश्रान्त झालेला आहे. कुठे असंख्य संतत वाहणाऱ्या पर्वतप्रवाहांनी व झऱ्यांनी जलमय झाला आहे तर कुठे कोरड्या खडकांमुळे ओकाबोका असा उजाड पडला आहे. कुठे कुठे सदासर्वदा वसंत फुललेला असून वाऱ्यावर वाहणाऱ्या रानफुलांच्या सुगंधाने वातावरण धुंद झालें आहे. कुठे आकुलतेने गाणें गाणाऱ्या पक्ष्यांच्या सुमधुर संगी-ताने वातावरण भारून गेलें आहे. कुठे चंद्राच्या सुस्निग्ध विमल ज्योत्स्नेने आसमंत पुलकित झालें आहे आणि कुठे खोल खोल

दऱ्या आणि मोठमोठ्या गुहा काळ्याकुट्ट अंधकाराने समस्त भावभावनांना आणि दृश्यांना झांकाळून टाकत आहेत, तर कुठे अफाट हिमराशींनी धवळून निघालेलीं, व अगम्य, अचिंत्य अपरंपार भावनांनी भारलेलीं शिखरें वेगवेगळ्या प्रकारांनी विविध भावभावनांचीं कारंजीं माझ्या हृदयांत उफाळून देत आहेत. एकाच गिरिशिखरावर मूर्तिमंत सहा ऋतु प्रकट होऊन अनंत भाव-भावनांची समष्टि तेथे प्रादुर्भूत होते. आणि त्याशिवाय तें शिखर स्वत: भावातीत अवस्थेमधे राहून विश्वस्रष्ट्याच्या अपूर्व अवस्थांचा आपल्या व्यक्तिमत्वामधे एक अपूर्व समन्वय घडवीत असतें. अल्पबुद्धि व अल्पज्ञान यांनी मर्यादित असलेल्या मानवाच्या उद्धारकामनेने प्रेरित होऊनच की काय नामरूप नसलेलें निरुपाधिक ब्रह्म स्वतः जणु हे विराट गिरिराजरूप धारण करून आपल्या विचित्र स्वभावाच्या व प्रचंड शक्तीच्या रहस्याचें उद्‌घाटन करून त्याचे ज्ञानचक्षु लीलया उघडून देत आहे.

**ढगाआड दिसेनासा झालों**

जाऊं द्या. हळूहळू वर वर चढीत मी स्वत:च ढगाआड दिसेनासा झालों. मग मी विचार करूं लागलों की सपाट जमिनी-पासून मी किती उंचीवर आलों बरे ? ते अपरंपार ढगांचे ढीग मागे टाकीत मी आणखी वर चढूं लागलों आणि आता इतक्या उंच आल्यावर विरळ हवेमुळे श्वासोच्छ्‌वास जरा कठीण जाऊं लागला. त्यानंतर मग पुनः पाहिलें की कवेंत न येणाऱ्या त्या दुरधिगम्य महीधराला विळखा घालतांता मेघमालेचीं शेकडो शिप्तरें झालींत व कशीतरीच तीं त्या गिरिनितंबावरून निस्पंदपणें लोंबकळत राहिलीं. सौदामिनीच्या लखलखाटामुळे क्षणभर उजळणाऱ्या त्या चंचल ओल्या ढगांच्या अगणित ठिकऱ्या उडाल्या

व जीवनांतील शेवटची आस सोडूं न शकल्यामुळे व कडेकपारां-वरून कडेलोट होण्याच्या धास्तीने मरगळलेलीं तीं ढगाचीं लक्तरें गिरिगात्रांना अगदी चिकटून राहिलीं. आणि पुनः कुठे कुठे आभाळांत परिभ्रमण करणाऱ्या मेघांशांकडे पाहून वाटूं लागलें की जगत्पित्याच्या ह्या विश्वमंदिराची प्रदक्षिणा करण्यासाठीच हे मेघखंड जणु एकाग्रतेने आपला मार्ग आक्रमीत आहेत. अखंड मेघजाल ह्या नगाधिराजाच्या सतत तैनातींत असून कुठे त्याचीं चरणें निरंतर धूत आहे, कुठे त्याचें मनोहर उद्यान विमल जलाच्या यथोचित वर्षावाने फलपुष्पयुक्त करीत असल्यामुळे आपलें 'जलद' हें नांव सार्थ करीत आहे. कांही मेघखंड अनत. भावसमन्वित अशा हिमालयाच्या अपार महिम्याने मुग्ध होऊन, त्याच्या विशाल कटिप्रदेशाचा अंदाज न घेतां आल्यामुळे खजिल झालेले असे इतर सर्व देशांचा त्याग करून केवल तपानुष्ठानाच्या कामनेने येथील घळीं कपारींतील गुहा बंद करून अनंतकाळा-करिता समाधिस्थ झाले आहेत. किंवा असेंहि वाटतें की लोक-पावन प्राचीन महर्षिगण जणु अजून हिमालयांतील गिरिकंदरांत अनंताच्या ध्यानांत निमग्न असल्यामुळे त्यांच्या ध्यानांत विघ्न येऊं नये म्हणून व सामान्यांच्या नजरा त्यांच्यावर पडूं नये म्हणून एक एक ढग शांतपणें एक एक गुहा बंद करून निश्चल असा पहारा देत आहे. प्रचुर ऐश्वर्य व प्रचंड क्षमता असणाऱ्या नगाधिराजाचा अचिन्त्य प्रभाव पेलूं न शकल्यामुळे गगनविहारी असलेले हे मेघराज लाजेने खाली मान घालून एकेका गिरिगुहेमधे शिरून लपत आहेत. गिरिराजाचें हें उत्तरांग मेघावृत असलेलें पाहून मला असेंहि वाटलें की आपल्या कठीण पाषाणमय अशा कमरेखालील शरीराकरिता घनदाट व भीषण अरण्यांचीं अधोवस्त्रें

महाराजांनी वापरलीं; आता तीं बदलून येथील कोमल हिममय मुलायम अवयवांकरिता स्वच्छ अशा जलदजालाचें तलम वस्त्र त्यांनी निवडलें आहे; हा मृदु मेघांचा दिव्यवेश धारण करून नगराज विराजमान झाले आहेत व मधूनच होत असलेल्या विद्युलतेच्या लखलखाटांत त्यांच्या ह्या अमूल्य वस्त्राची प्रभा प्रस्फुटित होत आहे.

### श्रावणांतील केदारनाथाचा कल्पवास

केदारनाथाकडे वाहत जाणाऱ्या मंदाकिनीला कधी उजवीकडे तर कधी डावीकडे टाकीत मी बरोबर तिच्या काठाकाठानें रुद्रप्रयागापासून येत होतों. त्यानंतर मला वाटतें रामबाडचापासून मंदाकिनी माझ्या उजवीकडूनच वाहत होती व मी निरुंद अशा हिममय वाटेने वर चढूं लागलों होतों. पायामधे कांहीहि नव्हतें तरी त्रास असा कांही वाटला नाही. माझ्या आठवणीप्रमाणे अगदी ऐन आषाढांत (दुसरा किंवा तिसरा आठवडा असेल) मी केदारनाथ येथे पोहोचलों होतों. म्हणूनच वाटेने जास्त बर्फ तुडवावा लागला नाही. जे अगदी यात्रेच्या प्रारंभींच म्हणजे ज्येष्ठाच्या सुरुवातीस केदारनाथाला येतात, त्यांच्या वाटेवर जितका बर्फ आढळतो व मंदाकिनीचा प्रवाह जसा गोठून घट्ट झालेला दिसतो, तसें आषाढांत दिसत नाही. अर्धाअधिक आषाढ झाला की केदारनाथाचा रस्ता बराच स्वच्छ झालेला असतो. दरवर्षी हिवाळ्यांत अगदी अपरिमितपणें पडलेलें बर्फ गोठून त्याचें जे मोठमोठे खडक बनतात त्यांच्यामुळे केदारनाथाचें मंदिर आणि रस्ता संपूर्णपणें बंद होतो. हे खडक उन्हाळ्यांतील सूर्याच्या प्रखर किरणांमुळे वितळूं लागतात व पावसाळा येईपर्यंत त्या सर्वांचें पाणी होऊन जातें व मग मंदाकिनीचा जलमय देह

चांगलाच आडवातिडवा सुटतो.आषाढाच्या अखेरपासून श्रावणाच्या अखेरपर्यंतच केदारनाथाच्या दर्शनाचा यथोचित समय म्हटला पाहिजे. ह्याच वेळीं केदारनाथाचा प्रस्फुट विकसित भाव पाहावयास मिळतो. ह्याच वेळीं केदारराज्यांतील अलौकिक शोभासंपदेचा अपूर्व प्रकाश व लावण्य जितकें नजरेस पडतें तितकें इतर वेळीं पडत नाही. पावसाळ्यांत पावसाचा त्रास होईल ह्या भीतीमुळे जे यात्रेकरू तांतडीने ज्येष्ठांतच केदारबद्रीनाथ यात्रा आटोपून परत फिरतात ते खरोखर बद्रीकेदार यात्रेच्या सुखास्वादाला आंचवतात. केदार-बद्रीनाथाच्या सर्वांगसुंदर अपरूप विचित्र दृश्यांचें संपूर्ण चमत्कृतियुक्त दर्शन त्यांना मुळीच घडत नाही. ऐन पावसाळ्यांत केदारनाथ येथे थंडी कमी असते आणि निरनिराळ्या फुलवेलींना अमाप बहर आलेला असतो व त्या कधी नव्हेत इतक्या आकर्षक दिसतात. केदारनाथाचें संपूर्ण माहात्म्य अनुभवतां यावें म्हणूनच मला वाटतें तेथे संपूर्ण श्रावणमास निवास करण्याची प्रथा फार पुरातन कालापासून प्रचलित आहे.

### हिमालयाचें शब्दातीत दर्शन

असो. मी ज्या त्रिभुवनमोहन विचित्र स्वर्गीय ज्योतिर्मय राज्यामधे येऊन दाखल झालों होतों आणि केदारनाथाच्या ज्या असामान्य, महान्, अपूर्व विस्मयजनक दृश्याचा पट माझ्या डोळ्यांसमोर उलगडला होता, त्याचें अत्यंत ढोबळ वर्णनदेखील शब्दांकित करण्यास मी असमर्थ आहे. त्या अनिर्वचनीय-स्वभावसंपन्न केदारनाथाच्या अनंत महिम्याचें वर्णन, प्रयत्नांची पराकाष्ठा करूनहि मला करतां येत नाही. केदारनाथांचें वस्तुगत माहात्म्य सर्वसाधारण लोकांना आकलतां येईल अशा रीतीने सांगणें माझ्या

शक्तीबाहेरचें काम आहे. जी विराट परमसुंदर मूर्ति मी ह्या माझ्या चर्मचक्षूंनी तेथें प्रत्यक्ष बघितली त्या सर्व घटनेचें वास्तविक मर्म जाणावयाची इच्छा असल्यास, मी सर्व सहृदय वाचकांना थोडा त्रास सहन करून एकवेळ तें अमरधाम स्वत:च्या डोळ्यांनी पाहून येण्याची विनवणी करतों.

मला जें हिमालयाचें अद्‌भुत व विशाल दर्शन घडलें, त्याचें हें अत्यंत ढोबळ स्वरूपाचें संक्षिप्त वर्णन माझ्या पुसट स्मृतींमुळ अत्यंत अस्पष्ट व असंपूर्ण वाटेल याची मला तीव्र जाणीव आहे. हिमालयांतील प्रत्येक गोष्टीचा अत्यंत चिकित्सकपणें अभ्यास करून मग त्याविषयीचें सांगोपांग विवरण लिहिणें हें कांही मला जमायचें नाही. त्यांत पुन: माझ्या ह्या असल्या थिटचा नि दुबळचा भाषेमधें विश्वविख्यात केदारनाथाचें मीं कितीहि वर्णन केलें तरी तें माझें मला देखील समाधान देणार नाही. आणि प्रस्तुत विषयाच्या सुरम्य गौरवामुळे आकर्षित होऊन जर कुणी एखाद्यानें चुकून माझा हा नीरस भ्रमणवृत्तान्त हातीं घेतला तर केदार-नाथाच्या विस्मयजनक व लोकोत्तर स्वरूपाची खरीखुरी कल्पना त्याला येऊं शकेल असेंहि मला वाटत नाही. फार वर्षांपूर्वी जो प्रवास केला व जें पाहिलें त्याचें इतक्या दिवसांनंतर हुबेहुब चित्र रेखाटायचें म्हणजे त्या दिव्यभूमीमधें आता पुन: एकदा फिरून येणें आवश्यक होतें. प्रत्येक गोष्ट चांगल्या रीतीनें नजरेखाली घालून तिचें संपूर्ण विवरण लिहिलें असतें व मग प्रसिद्ध केलें असतें तर सर्वच प्रकारच्या वाचकांना कांही ना कांही माहिती मिळाली असती व त्यांना समाधान वाटलें असतें. एखादी गोष्ट नुकतीच पाहिली असली पण ती जर विशेष आवडीची नसली वा तिचें सुस्पष्ट चित्रण हृदयपटलावर झालें नसलें तर अगदी

थोड्या दिवसांतच ती विस्मृतीच्या तळाशीं जाऊन बसते. एवढ्या प्रदीर्घ कालावधीनंतर मी कांही कशाचें साहाय्य नसतांना ह्या परमपवित्र विषयाला हात घालण्याचें धाडस करीत आहें. हिमालयाच्या ज्या अपार चैतन्यघन अद्‌भुत जिवंत मूर्तीनें एकेकाळीं माझ्या हृदयाचा संपूर्ण ताबा घेतला होता त्या मूर्तीचें ध्यान चिरकाल माझ्यासमोर राहावें हाच ह्या साऱ्या खटाटोपाचा उद्देश. विस्मृतीच्या अगाध सागरांत सारें विश्वब्रह्माण्ड संपूर्णपणें बुडालें तरी माझ्या डोळ्यांसमोर ऐश्वर्यशाली हिमालयाची ती चिन्मय मूर्ति सदा तरळत राहील. प्रस्तुतच्या ह्या पुस्तकांत त्या मूर्तीचेंच आभासमात्र दर्शन घडविण्याचा माझा प्रयत्न आहे. म्हणूनच आठवून आठवून प्रत्येक घटनेबद्दल पुरेपूर विचार केल्यावर मला हें सगळें लिहावें लागत आहे. हें प्रवासवर्णन लिहिण्याच्या बाबतींतील माझ्या अडचणी सुरुवातीलाच मीं प्रेमळ वाचकांपुढे मांडल्या होत्या. लिहितांना त्या अडचणींची पदोपदीं जाणीव व्हायला लागली आणि आतापर्यंतच्या लिखाणांतील उणीवा पाहून मन पुनः पुनः व्यथित व ओशाळवाणें होत आहे.

**केदारनाथाच्या पायथ्याशीं**

जाऊं द्या तें. आता आपल्या विषयाकडे वळूं या आणि पाहूं या, कथानकाच्या ओघांत मी कुठे येऊन पोहोचलों तें. केदारनाथाचा त्या प्रचंड, विशाल, उज्ज्वलतम, आमूलाग्र हिममय अशा शिखराचें दर्शन थोड्या दुरूनच जेव्हा मला घडलें तेव्हा मी विस्मयानें एकदम स्तंभित झालों. एवढा वेळपर्यंत मी मोठ्या झपाट्यानें वाट चढत होतों, पण आता पावलें एकाएकी अवघडलीं. एखाद्या मंत्रमुग्धाप्रमाणे मला न कळत एक एक पाऊल सावकाशपणें पुढे पडत होतें. ज्या महान् उत्तुंग, नित्य-

हिममय शिखराच्या ओटीवर अखिल ब्रह्माण्डाचें अधीश्वर असलेल्या केदारनाथ बाप्पाचें विश्वमंदिर उभें होतें त्या शिखराची संपूर्ण आकृति सुस्पष्टपणें माझ्या दृष्टिपथांत येत होती. दिनमणि सूर्यनारायणाच्या बिंबाकडे एकसारखें टक लावून पाहिलें म्हणजे त्या प्रखर प्रकाशाने डोळे जसे दिपून जातात तसें अपारदर्शन श्रीकेदारनाथाचें तें ज्योतिर्मय शुभ्र, उज्ज्वल, विराट, विशालकाय स्वरूप बघून माझें झालें. गिरिराजाच्या दीप्तिमय अंगामधून अनंत तेजःपुंज ज्योति प्रसृत होत होत्या नि माझ्या दृष्टिशक्तीला पार पराभूत करीत होत्या. वाटूं लागलें–कुण्या एका घनघोर काळोखांतून एकाएकी ह्या दिव्य प्रभामय स्वयंप्रकाश अशा विचित्र अद्‌भुत प्रदेशांत येऊन पडलों आहें ! त्या अत्युज्ज्वल गिरिशिखराकडे खरोखरच एकटक असा फार वेळ पाहूं शकलों नाहीं. हें गिरिशिखर म्हणजे जगद्‌गुरु देवाधिदेव महादेवाचें अनादि असें ज्योतिर्मय स्वयंभू लिंग आहे हें जणु दिव्यचक्षूंच्या द्वारा मला दिसलें. हा कल्पनाविलास नव्हता, सत्य जिवंत जागृत अशी ही प्रतिमा आहे हें मला स्पष्टच उमजूं शकलें. हिमाद्रीच्या अतिशुभ्र ज्योतिर्मय विराट कायेचें बाधाहीन दर्शन सारखें केदारनाथ येथे जसें घडतें तसें साऱ्या उत्तराखंडांत कुठेहि घडत नाही. उत्तराखंडांतील कितीतरी दुर्गम स्थळीं मीं प्रवास करून पाहिला, पण केदारनाथासारखें सुप्रशस्त, परम रमणीय, पावन क्षेत्र मला क्वचितच आढळून आलें. दुर्गम, दुर्लंघ्य व सदाचें बर्फ केदारनाथला जसें सगळ्यांना सहज व संपूर्णपणें दिसतें तसें इतरत्र कुठेहि दिसत नसावें. केदार सर्वच बाबतींत कैलासा-प्रमाणे आहे. एक कैलास सोडला तर हिमालयांतील आणखी कोणत्याच ठिकाणाशीं केदारनाथाची तुलना होऊं शकत नाही.

## गिरिराजाच्या कुशींत

श्रीकेदारशैलाच्या चरणांशीं येऊन पोहोचल्यावर जें परम अद्भुत महान् विराट मूर्तीचें दर्शन मला घडलें, तसें इतके दिवस हिमालयांत भटकत असतांना कुठेच घडलें नाही. हरगौरीचें प्रिय विलासनिकेतन असलेल्या श्रीकेदारशैलाच्या गौरवाने व चमत्कृति-पूर्ण दर्शनाने मी जितका विस्मित नि मुग्ध झालों, आणि केदार-नाथला येतांबरोबर सहजपणाने उघड उघड गिरिराज हिमालयाला मिठी मारतांना व त्याच्या कुशीमधे तोंड खुपसतांना मला जसा आनंद झाला तसा आणिक कुठेच झाला नाही. गंगोत्री व जम्नोत्री-पर्यंत जाऊनहि हिमालयाचें असलें अपरंपार व अत्यंत विलक्षण दर्शन मला घडलें नव्हतें. हिमालय-दर्शन ही कांही साधीसुधी सहजासहजी पदरांत पडणारी गोष्ट नाही किंवा हिमालयांतील दोनचार तीर्थक्षेत्रें वा प्रसिद्ध ठिकाणें पाहून हिमालय-दर्शन साधतां येणारें नाही ह्याची तीव्र जाणीव केदारनाथला येऊन पोहोचल्यावर मला क्षणाक्षणाला होऊं लागली. हिमालयाविषयी सांगोपांग माहिती मिळवावयाची असल्यास तेथे बरेच दिवस काढले पाहिजेत व आंत दडलेलीं अत्यंत दुर्गम स्थळें जाऊन पाहावयास पाहिजेत. माझी हिमालयाबद्दल आतापर्यंत झालेली कितीतरी दिवसांची धारणा केदारनाथला पोहोचल्यावर संपूर्णपणें पालटून गेली. माझ्या धारणेच्या पलीकडील अशा अनंत तत्त्वांनी हिमालय परिपूर्ण आहे, आणि त्याचें वैचित्र्य व गौरव केदार-नाथला मला अशा रीतीने आढळेल याची मला कल्पना नव्हती. हिमालयाचें विविध दर्शन घेऊन इतके दिवस त्याच्या गौरवाचें जें मोजमाप मीं कल्पनेने केलें होतें त्यापेक्षा तो कितीतरी पट श्रेष्ठ व मोठा आहे, आणि त्याच्या खरोखरच्या महिम्याची

अनुक्रम क्रमांक २५३९२ वि: भू-प्रवास.. नों. दि: २३.३.५९



व्यापकता माझ्या कल्पनाशक्तीच्या आटोक्याबाहेर आहे हें मला आता श्रीकेदारशैलाच्या तळाशीं आल्यावर पुरेपूर पटूं लागलें व पदोपदीं ह्या गोष्टीचें प्रत्यंतरहि येऊं लागलें. आणखी हेंहि समजलें की, हा महामहिमामय महीधर मानवांना अज्ञात असलेल्या पुष्कळ अद्भुत तत्त्वांनी सदा परिपूर्ण आहे व कल्पनाशक्तीपलीकडील अनिर्वचनीय प्रभावसंपन्न अत्यंत अद्भुत अशा दिव्यधामाची रचना करून कायमचा मर्त्य मानवांना अगम्य व अगोचर असा अवस्थित आहे. मनुष्यांना अगम्य अशीं अद्भुत दिव्य धामें हिमालयांत किती आहेत ह्याची गणना कुणीं करावी ? आद्या-शक्ति महामाया स्वत: ज्या पवित्र दिव्यधामीं परमपुरुष सदा-शिवाशीं सदा विहार करते त्या ठिकाणाचा महिमा जोखणें हें मनुष्याला जमणारें काम नाही. हरगौरीची महान् मीलनभूमि असलेला हिमालय व पुरुष-प्रकृतीचें पूर्ण विकासस्थल असलेला हिमगिरि याच्या अपार व अनंत महिम्याने संपूर्णत: भारावून गेलेला मी हाच विचार करूं लागलों की, त्या एका अखंड सच्चिदानंदाची जशी 'इति' होऊं शकत नाही तद्वतच ह्या महान् गिरिराजाचीहि 'इति' करतां येत नाही. अनंत रूपांचा व भावसमष्टींचा आधार व असंख्य विस्मयजनक वस्तूंनी परिपूर्ण असलेला हिमालय माझ्या दृष्टीला नित्यनूतन असा भासू लागला, व त्याच्या अंतरंगांत प्रवेश करून आणखी आणखी अद्भुत व अदृष्टपूर्व दृश्यें पाहण्यासाठी माझें मन व प्राण व्याकुळ होऊं लागले. मनांत विचार आला की, हें परमधाम सोडून कधीच पुन: त्या घोर, अशान्त, कोलाहलपूर्ण लोकवस्तीच्या जगांत जावें लागूं नये. वाटूं लागलें—गिरिराजाच्या अनंत रूपामधे व अपार

महिम्यामधे आपल्या ह्या क्षुद्र अस्तित्वाचा विलोप करून कायमचें परमानंदांत डुंबत राहावें.

### हिमशिखरांची वीरश्री

श्रीकेदारशैलशृंगाची ती अपूर्व महान् विराट मूर्ति पाहून माझ्या मनांत आलें की, महाशक्तिशाली हिमालयाचीं हीं उत्तुंग हिममय शिखरें म्हणजे चक्राच्या एकेका तीक्ष्ण दात्यांना धार लावून सज्ज केलेल्या अमोघ अस्त्राप्रमाणे असून त्यांनी समुद्र-वलयांकित पृथ्वीला दुभंगून टाकलें आहे आणि अनंत कोटी योजनें विस्तीर्ण व मर्त्य लोकांना अगोचर असलेल्या गगनमंडल-व्यापी स्वर्गलोकाला आपला अतुल पराक्रम दाखविण्यासाठी रसातळाचा पार भेद करून मोठ्या गर्वाने खूप उंच उसळी मारली आहे. शिवाय मानवी शक्तीची सीमा ओलांडून स्वर्गलोकींच्या व मृत्यूलोकींच्या अंतराळांत ह्या अति अद्‌भुत दिव्य राज्याची त्यांनी संस्थापना केली आहे. स्वर्गलोकांत वा मृत्युलोकांत आणखी कोठे असलें अद्‌भुत व चमत्कारिक दृश्य आढळेल की नाही सांगतां येंत नाही. ज्या महान् अत्युच्च गिरिशृंगाच्या ओटीपोटावर बाप्पा केदारनाथाचें मंदिर सुप्रतिष्ठित आहे तें शिखर, संपूर्ण हिमाच्छादित असूनहि, ग्रीष्माच्या कडक उन्हामुळे त्याचा जो जो भाग बर्फ वितळून उघडा पडतो तो सारा दुरून कांचनमय असा दिसतो. गिरिराजाची ती दिव्योज्ज्वल, परमसुंदर, निर्मल, सुविशाल काया अवलोकन करून वाटतें की ती विविध प्रकारच्या हिऱ्यामाणकांनी निर्मिलेली आहे.

### विराटरूप दर्शन

तें जाऊं द्या. श्रीकेदारनाथाच्या सुप्रशस्त, महान् दिव्यधामीं उपस्थित होऊन गिरिश्रेष्ठाच्या प्रकृत महिम्याचा थोडासा आभास

प्राप्त झाला आणि मन परम आनंदित झालें. इतके दिवस हिमालयाचें बाह्य आवरणच तेवढें मीं पाहिलें आहे व त्याच्या खऱ्याखुऱ्या अंतरंगाचें ज्ञान मला आजपर्यंत झालें नाही हें आता मला स्पष्टपणें उमजूं लागलें. भगवान् श्रीकृष्णाची परम अद्भुत व अचिंतनीय विराट मूर्ति पाहून एके दिवशीं महाभाग अर्जुनाची जी अवस्था झाली होती, जवळ जवळ तशीच अवस्था केदारनाथ येथील नगराजाच्या त्या अनंत भावमय, दिव्य, सुविशाल मूर्तीच्या पुढ्यांत आल्यावर माझी झाली. दिव्यदर्शन गिरिराज येथें अगदी यथार्थपणें त्या एका अनादि अनंत महान् चैतन्यशाली सत्तेच्या प्रचंड, स्थूल, व्यक्त प्रतीकाप्रमाणे भासतो. तोच सर्वेन्द्रियातीत, सर्वनियंता, सर्वांतर्यामी परमात्मा अल्पज्ञ व मोहग्रस्त मानवाला असीम व अनंताच्या भावनेने प्रेरित करण्यासाठी आणि त्याला स्वतःचा अपार महिमा व अनंत विभूति दाखविण्यासाठी धरणीतलावर त्या मोठ्या पर्वतराजाच्या रूपांत अवतीर्ण झाला आहे आणि आपल्या अपार कारुण्याच्या अजस्र धारांनी दिग्दिगंत परिपूर्ण करीत आहे ह्याबद्दल माझ्या मनांत तिळमात्र संदेह उरला नाही. अर्जुनाचा मोह दूर करण्यासाठी व त्याला स्वधर्माच्या ठिकाणीं नियुक्त करण्यासाठी करुणार्द्रचित्तानें भक्तवत्सल श्रीभगवानांनी जसें एके दिवशीं विश्वरूप धारण करून त्याला दिव्य ज्ञान प्रदान केलें, तसेंच असीम व अनंताच्या भावभावनांनी भारून टाकून मानवात्म्याचें परम कल्याण साधण्यासाठी त्याच सूक्ष्मातिसूक्ष्म परम गुह्य सनातनब्रह्माने ही अत्यंत आश्चर्यकारक परमाद्भुत महान् स्थूल विराट मूर्ति धारण करून आम्हांला विस्मित व कृतार्थ केलें आहे ! जगन्मयी महामायेची मृण्मयी मूर्ति पाहिली की जसा आम्हांला तिच्या चिन्मयी मूर्तीचा

आभास होतो, तद्वतच महीधराची ती दिगंतव्यापी सुविराट मूर्ति पाहून मला वाटलें की ती जणु त्या सर्वशक्तिमान भूमानंदाचीच स्थूल प्रतिमा आहे.

### जडावाचें सिंहासन

थोड्या अंतराहूनच श्रीकेदारशैलाचें अपरंपार गांभीर्य व व अनंत महिमा अवलोकन करून मी स्वत:ला पूर्णपणें विसरलों होतों म्हणून इतका वेळ माझें आजूबाजूला कुठेच लक्ष गेलें नव्हतें. एवढा वेळ मी कुठे कसा बसलों आहें ह्याचेंहि मला भान नव्हतें. अतुलप्रभावसंपन्न नगाधिराजाच्या अनंत महिम्यामधे माझा 'मी' पणा हरपला होता. त्या अवस्थेंत आतापर्यंत ज्या परमानंदाचा मी आस्वाद घेत होतों त्याची कल्पना भाषेच्या द्वारें देतां येण्यासारखी नाही. तो दिव्य देखावा पाहून जणु त्रिभुवनांतील पाहण्यासारखें सर्व पाहून झालें असें मला वाटूं लागलें. त्यानंतर हळूहळू मी भानावर आलों आणि एका अत्यंत मनोहर परमरमणीय अशा चित्रविचित्र, नुकत्याच उमललेल्या फुलांच्या गालिच्यावर स्वत:ला बसलेला पाहून माझा विस्मय शेकडोपटींनी वाढला. आता मला विषाद इतकाच वाटतो की ह्या माझ्या चर्मचक्षूंनी मीं जें जें म्हणून प्रत्यक्ष पाहिलें त्याचा किंचित् आभासदेखील माझ्या लेखणीद्वारें प्रकट करतां येण्यासारखा नाही. त्यानंतर मग मीं अत्यंत विस्मयाने विस्फारित झालेले डोळे चोहीकडे फिरविले आणि माझ्या लक्षांत आलें की केदारनाथ येथील सारी सपाट भूमि आणि चारहि बाजूंनी असलेला चिरशुभ्र उत्तुंग गिरिशिखराचा अधोभाग हिममुक्त होऊन ह्या वेळीं कितीतरी असंख्य जाती-वर्णांच्या रंगीबेरंगी सुंदर अशा विविध फुलांच्या ताटव्यांनी, सुकोमल, सुशोभन अशा हिरवळीने आणि

लतावितानांनी झाकलेला आहे. त्या महान्, अद्‌भुत, चिरप्रफुल्ल, अतिमनोरम कुसुमोद्यानाच्या अपार सुषमेने इंद्राची अमरावतीहि म्लान होऊन गेली असेल ह्यांत मुळीच शंका नाही. अगदी अनिमेष नेत्रांनी मी तें परमाद्‌भुत चमत्कारिक दृश्य जसजसें पाहूं लागलों तसतशी माझी दर्शनलालसा वाढूं लागली. माझ्या चारहि बाजूंनी पसरलेल्या त्या विस्तीर्ण नवविकसित अम्लान कुसुमराशींच्या तऱ्हतऱ्हेच्या रंगांनी माझे डोळे अगदी दिपून गेले. जणु कितीतरी असंख्य मूल्यवान हिऱ्यामाणकांनी जडवलेल्या एका देवदुर्लभ अशा रत्नखचित सिंहासनावर सुखासीन झालेला मी एखाद्या भाग्यवंताप्रमाणे शोभिवंत दिसत असावा ! धनाधिपति कुबेराचें संपूर्ण भांडार खर्च केलें असतें तरीहि तसलें अद्‌भुत व मौल्यवान सिंहासन होणारें नव्हतें ! अहाहा ! काय त्या सिंहासनाचा चमत्कार व त्याची असली अतुलनीय प्रभा ! किती विश्वकर्म्यांचें शिल्पकौशल्य खर्ची पडून विश्वपतीचें तें महान्, अपूर्व रत्नसिंहासन निर्माण झालें, सांगतां येत नाही.

### उमा-महेश्वर

जिच्या डोळ्यांच्या उघडझापीमधून अनंतकोटी विश्वब्रह्माण्डांचा उदयास्त होतो व जिच्या केवळ कटाक्षाने चराचर सृष्टीचा सगळा कारभार सुरळीत चालतो त्या अनंतशक्तिमयी विश्वजननी महामायेने स्वतःच्या विपुल ऐश्वर्याचा उत्तमांश देऊन निर्माण केलेल्या ह्या जडावाच्या सिंहासनावर आरूढ झालेला परमशिव भोलानाथ मला वाटतें आपला आवडता श्मशानवास व आपलें प्रिय शवासन पार विसरून गेला आणि मा जगदंबेची मनोवाञ्छा तृप्त करण्यास सिद्ध झाला. आमचे बाबा भोलानाथ सर्वत्यागी असूनहि अनंत अपरंपार ऐश्वर्याचे एकमात्र अधीश्वर

आहेत आणि चिरवैरागी असूनहि कमालीचे अनुरागी आहेत हें जणु इच्छामयीच्या इच्छेनेंच ह्या अमरधामीं स्पष्टतया सिद्ध झालें आहे. गिरिराजाची नयनतारा व मेनकेची प्राणप्रतिमा असलेली उमा ज्याची अंकशायिनी, तो एखादा सामान्य भिकारी नाही हें लोकांच्या लक्षांत आणून देण्यासाठी सर्वसौभाग्य-आरोग्यदायिनि जगदंबामाईने हें अद्‌भुतरम्य ठिकाण केवल अपार ऐश्वर्य व अनंत सौंदर्य यांची खाण बनवून टाकलें आहे. विश्वनाथाच्या ह्या विश्वमंदिरांतील प्रत्येक अणुपरमाणूंमधे विश्व रचणारीच्या अद्‌भुत व अलौकिक रचनाकौशल्याची पराकाष्ठा व अत्युत्कृष्ट कसब पूर्णपणें विकसित स्वरूपांत आढळतें. मा सर्व-मंगलेच्या इच्छेमुळेच भोळ्या दिगंबराचा हा एवढा सौभाग्योदय ! सदानंदमयी महामायेच्या अतुल अनुरागामुळेच परमयोगी सदा-शिवाचें आजचें हें एवढें ऐश्वर्य ! विश्वविमोहिनी भवानीने यांचा थाट पाहून आपली एक भुवई किंचित् वर चढवितांच स्वारी एकदम तटस्थ झाली. तपःपूत गौरीची हौस पुरविण्यासाठी म्हणूनच जणु त्यांनी आपला जटा-जिन-भस्म-भुजंगम-अस्थिनिचय दूर फेकला व त्याऐवजी देवदुर्लभ अशा चित्रविचित्र भूषणांनी विभूषित होऊन आपल्या अपूर्व दिव्य रूपलावण्याने त्यांनी चारहि दिशा उजळून टाकल्या. गिरिराजनंदिनी गौरीला आपल्या विशाल वक्षावर सुखवितांना भोलानाथाचा त्याग नि वैराग्य जणु दूर कुठेतरी पळून गेलें. जगदंबा पार्वतीच्या निव्वळ इशाऱ्यामुळे आमच्या उघड्याबंब दिगंबर बाबांचा एवढा गौरव व इतका मोठेपणा ! आद्याशक्ति महामायेच्या प्रेमालिंगनामुळे तो त्रिगुणा-तीत, सर्वत्यागी, निर्गुण, निष्क्रिय परमपुरुष महादेव, महाराज-राजेश्वराच्या गौरवाने विभूषित झालेला ह्या विश्वराज्याचा

१७४ २३

एकमात्र अधिपति, अपार करुणामयी जगदंबेशीं सदा संमीलित होऊन ह्या विश्वराज्याचें सुशासन करीत आहे आणि आपल्या असीम कर्मनिष्ठेची व शक्तिमत्तेची ओळख देत देत हा अपूर्व लीलाभिनय पार पाडीत आहे.

### ह्यांत अतिशयोक्ति नाही.

समग्र उत्तराखंडामधे श्रीकेदारनाथाचें जें महत्त्व व विशेषत्व मीं प्रत्यक्ष पाहिलें त्याचें हुबेहुब रेखाटलेलें सर्वांगसंपूर्ण चित्र सर्वसाधारण लोकांच्या दृष्टीसमोर ठेवणें मला अगदीच अशक्य आहे. परंतु एवढें मात्र मी छातीठोकपणें सांगूं शकतों की श्रीकेदारनाथाची माहात्म्य-कथा सांगून संपवितां येण्यासारखी नाही. श्रीकेदारनाथचें राज्य हें सत्याचें राज्य आहे, कल्पनेचें राज्य नाही. आजन्म कल्पना करून करून ज्या गोष्टींची कधीहि कल्पना करतां यावयाची नाही अशा कितीतरी अलौकिक व अद्भुत गोष्टींनी तें दिव्यधाम सदा परिपूर्ण आहे. त्या स्वर्गापेक्षाहि परम रमणीय, परम पवित्र नित्यधामीं उपस्थित होऊन मीं जें प्रत्यक्ष पाहिलें त्याचा किंचित् आभास तरी देतां यावा यासाठी माझा हा मनापासूनचा खटाटोप आहे. ह्या उद्योगांत मी कितपत यशस्वी होईन याचा अंदाज केदारमाहात्म्य जाणणारी व्यक्तिच केवळ बांधूं शकेल. पावसाळ्यासुरवातीस केदारनाथला जे पोहोचले व निरुद्विग्नचित्ताने तेथील अलौकिक वैचित्र्य पाहून जे मुग्ध झाले त्यांनाच केदारसंबंधी लिहिलेल्या प्रस्तुत वर्णनांतील माझा एकहि शब्द स्वकपोलकल्पित वा अतिरंजित नाही हें पटेल. यात्रेमधे बदरिकाश्रमाचें स्वरूप व तत्त्व जाणण्यासाठी येथे येऊन आत्यंतिक तन्मयतेने ह्या ठिकाणाच्या व्यक्तिमत्त्वांत मग्न होण्याचा ज्यांचा प्रयत्न सफल झाला, असल्या निष्कपट

निरागस, श्रद्धावान व संयतचित्त लोकांना हें माझें बदरिकाश्रम-माहात्म्य वाचून आनंद होईल व ह्या माझ्या वर्णनांतील एकहि शब्द खोटा नाही अशी त्यांना सहजपणें प्रचीति येईल. ह्याउलट तीर्थयात्रेसाठी मोठ्या कष्टाने जे लोक बाहेर पडले व कशीतरी यात्रा आटोपून घराच्या ओढीने व्यग्र झाले, अशीं माणसें कोण-त्याहि तीर्थाचें माहात्म्य उमजूं शकत नाहीत असें मीं म्हटल्यास कुणालाहि तें पटावें. केदारनाथला पोहोचलें म्हणजे त्याचें खरो-खरचें दर्शन घडेलच असें भाग्य सर्वांचेंच नसतें ! स्वतःचें घरदार व बायकापोरें यांच्या मायापाशांत सर्वस्वी गुंतलेलीं जीं माणसें फक्त पुण्य सांठवावें म्हणून डोळे व कान बंद केलेल्या अवस्थेंत कशीतरी दूरच्या अमरधाम-केदारनाथला जाऊन हजर होतात, तीं प्रकृतिदेवीच्या पूर्णाभिव्यक्तीला व हरपार्वतीच्या नित्यप्रकट अशा लीलाभिनयाच्या प्रत्यक्ष दर्शनांतून उत्पन्न होणाऱ्या ताज्या आनंदाला मुकतात, आणि केवळ भावी सुखाला कारणीभूत होणारा पुण्याचा बोजा शिरावर घेऊन त्वरेने घराकडे परत येतात. असलीं माणसें परत आल्यावर केदार-यात्रेचें पुण्य आता कधी, कुठे, कसें फळाला येईल व मग कसकसें सुख मिळेल या आशेनेच फुलून जातात व बिचारे त्या क्षणांची वाट पाहत बसतात. परंतु याचा एकदाहि तीं विचार करीत नाहीत की केदारदर्शनाचा जो अगदी ताजा परमानंदमय अनुभव असतो त्याच्या तुलनेने त्यांची ही आशा अगदीच क्षुद्र असते. केदारनाथ-सारख्या दुर्गम, बहुकष्टसाध्य, सुपवित्र क्षेत्रीं येऊन, तीर्थयात्रेच्या पुण्यामुळे मिळणाऱ्या भावी सुखाच्या आशेंतच मश्गुल राहतात आणि त्यामुळे केदारनाथचा खराखुरा महिमा आकलन करूं शकत नाहीत, अशीं माणसें म्हणजे हस्तामलकवत् मिळालेलें सुख फुका-

फुकी गमावून करंट्यासारखीं कपाळावर हात देऊन बसतात ह्यांत मुळीच संदेह नाही.

अथवा अडाण्याप्रमाणे भलभलत्या गप्पा ऐकून वा स्वत:च्या स्वैर कल्पनेने कांहीतरी समजूत करून घेऊन, हजार हजार वर्षांचें जुने चिरसमाधिस्त महात्मा लोक किंवा आणखी असलेच विलक्षण नानाविध असंभवनीय अनैसर्गिक प्रकार पाहण्याच्या इच्छेने जीं माणसें बदरिकाश्रम-यात्रेस येतात व तसलें कांही दिसलें नाही म्हणजे एकदम खिन्न, मलूल व निरुत्साह होऊन घराकडे परत फिरतात आणि मग बदरिकाश्रम-माहात्म्याचा क्षुद्रपणा सांगत स्वत:च्या ज्ञानाचे दिवे पाजळतांना ज्यांना किंचितहि लाज वाटत नाही तीं तर त्याहूनहि फुटक्या नशिबाचीं म्हटलीं पाहिजेत.

वंध्यापुत्राने आकाशफुलें वेचण्यासारख्या अत्यंत कल्पित व भ्रामक खोट्या वस्तूंच्या दर्शनाकांक्षेने बदरिकाश्रमीं जाऊन जे लोक अघटनघटनापटीयसी महामायेच्या अपूर्व लीलाविलासाकड वा तिच्या अपारसौंदर्यमाधुर्याच्या रसास्वादनाकडे पाठ फिरवितात ते इतके मूढ व भ्रमिष्ट असतात की ही बदरिकाश्रम-माहात्म्याची खरोखरची कथा त्यांना अजीबात मिथ्या वाटते ! कल्पनेच्या राज्यांतील नितान्त खोट्या गोष्टी हिमालयांत खरोखर पाहावयास मिळतील ह्या एकाच खुळचा आशेने ते बदरिकाश्रमीं जातात व तेथे गेल्यावर आपलें सर्व बळ त्या कपोलकल्पित गोष्टी शोधून काढण्यांत खर्च करतात. मग शेवटीं तसल्या गोष्टींचा कांहीएक मागमूस न मिळाल्यामुळे ही तीर्थयात्रा म्हणजे नुसती पायपीट आहे असें ते मनांत म्हणू लागतात.

अशाच एका भ्रान्तचित्त साधूशीं प्रसंगवशात् कर्णप्रयाग येथे माझी भेट झाली. त्या गोष्टीचा उल्लेख करून माझें हें कथन

तूर्त आटोपतें घेतों. त्या साधूची गोष्ट ऐकून सर्वांनाच विस्मयाचा धक्का बसेल व माझ्या आतापर्यंतच्या सांगण्याचें मर्म वाचकांच्या चटकन् ध्यानांत येईल. माझ्या उत्तराखंडांतील भ्रमन्तीच्या दुसऱ्या वर्षी पौषांत वा माघ महिन्यांत मी एकदा कर्णप्रयाग येथे गेलों होतों. तेव्हा वायव्य प्रांताकडील एक कोणी वैष्णव साधु सर्वांगावर विभूति फासून तिथे उघडचावर बसला होता. थंडी कडाक्याची होती व साधूचें सर्व अंग कुडकुडत होतें. बाबाजीचे कष्ट पाहून मीहि मनांतल्या मनांत दुःखी झालों व उघडचावर असे बसण्याचा त्यांचा उद्देश जाणण्याच्या कुतूहलाने मी त्यांच्या जवळ जाऊन बसलों. मी जवळ जातांच त्यांनी आपलें मनोगत सांगून मला न भूतो न भविष्यति आश्चर्यचकित केलें. उत्तराखंडांत मीं बराच काळ कंठला आहे हें ऐकून त्यांनी, "तुम्हांला कोठे स्पर्शमणि (परिसाचा दगड) सापडला काय" म्हणून विचारलें. त्यांनी असें ऐकलें होतें की फक्त बदरिकाश्रमांतच स्पर्शमणि सापडतों आणि त्या अमूल्य रत्नाच्या लोभाने इतके कष्ट स्वीकारूनहि बाबाजी बदरिकाश्रमाकडे आले होते. परंतु त्यांचा हातांतील लोखंडाचा लांब चिमटा डोंगरपठारावरील इतक्या दगडांवर ठोकूनहि स्पर्शमण्याच्या अभावीं सोन्याचा झाला नाही हें पाहून बाबाजीच्या दुःखाला सीमा राहिली नाही. त्यांच्या फुटक्या नशिबामुळे त्यांच्या चिमटचाचा लोहजन्म सुटला नाही असें म्हणत ते हळहळूं लागले व बदरिकाश्रमाची सारी यात्रा निष्फळ झाल्यामुळे त्यांना मरणप्राय दुःख झालें ! अनंत-लीलामयी प्रकृतीचें पूर्ण विकासस्थल असलेल्या हिमालयाच्या दर्शनाने त्याचा वास्तविक महिमा जाणतां आल्यामुळे मनुष्याला जी देवत्वप्राप्ति होते व जो अपार आनंद उपभोगावयास मिळतो

त्याच्या तुलनेने स्पर्शमणि म्हणजे एक अति तुच्छ वस्तु आहे. हें कांही मी त्या बाबाजींना पटवूं शकलों नाहीं. उलट त्यांच्या अभीष्ट वस्तूंचें संधान त्यांना मी न देऊं शकल्यामुळे बाबाजी माझ्यावरच रागावले व त्यानंतर माझ्याशीं एक शब्दहि बोलले नाहीत ! साधूची अंतरंगांतील इच्छा कळल्यावर मी तर अतिशय स्तंभित झालों आणि बदरिकाश्रमाच्या यात्रेकरूंमधे असे अज्ञ व कांचनासक्त साधु असतात हें पाहून मला अतोनात विषाद वाटला. असो. शिकल्यासवरलेल्या लोकांतहि असल्या भरमसाट गोष्टींवर विश्वास ठेवणाऱ्यांचा अभाव नाही. म्हणून मग माझी ही साधीसुधी भ्रमणकथा वाचून सर्वच तऱ्हेच्या लोकांना संतोष वाटेल अशी आशा तरी मीं कां म्हणून बाळगावी ?

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम २६३९२ वि: भू-प्रवास
क्रमांक ७०४ नों. दि. २३।३।६०
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०७६४

# आमचें अन्य प्रकाशन

## मराठी विभाग

| | | |
|---|---|---|
| | | रु. न. पै. |
| १-२. **श्रीरामकृष्ण चरित्र**—प्रथम भाग (चवथी आवृत्ति) | पृ. सं. ३५४+३० | ४–२५ |
| द्वितीय भाग (दुसरी आवृत्ति) | पृ. सं. ३४२+१२ | ४–३७ |
| ३. **श्रीरामकृष्ण वचनामृत**—(अंतरंग शिष्यांशीं व भक्तांशीं झालेलीं भगवान श्रीरामकृष्णांचीं संभाषणें) प्रथम भाग–(द्वितीय आवृत्ति) | पृ. सं. ५८१ | ५–५० |
| ४. **विवेकानंद-चरित्र**— | पृ. सं. ५७३+१८ | ५–२५ |
| ५. **स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत**—संकलक–श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती, | पृ. सं. ३९६ | ४–५० |
| ६. **पूर्व आणि पश्चिम**—स्वामी विवेकानंद. | | १–२५ |
| ७. **कर्मयोग**—(दुसरी आवृत्ति)–स्वामी विवेकानंद. | | १–६२ |
| ८. **महापुरुषांच्या जीवनकथा**-(सातवी आवृत्ति) स्वामी विवेकानंद | | १–६२ |
| ९. **भक्तियोग**—स्वामी विवेकानंद. | | १–२५ |
| १०. **वेदान्त आणि जीवन**—स्वामी विवेकानंद. | | १–२५ |
| ११. **माझे गुरुदेव**—(तिसरी आवृत्ति)–स्वामी विवेकानंद | | ०–६२ |
| १२. **हिंदुधर्माचें नव-जागरण**–(दुसरी आवृत्ति)–स्वामी विवेकानंद | | ०–५६ |
| १३. **शिक्षण**—(दुसरी आवृत्ति)–स्वामी विवेकानंद | | ०–५६ |
| १४. **पवहारीबाबा**—(दुसरी आवृत्ति)–स्वामी विवेकानंद | | ०–५० |
| १५. **शिकागो-व्याख्यानें**—(तिसरी आवृत्ति)–स्वामी विवेकानंद | | ०–६२ |
| १६. **स्वामी विवेकानंदांच्या आठवणी** | | १–२५ |
| १७. **विवेकानंद-वाणी**—(तिसरी आवृत्ति) | | ०–९० |
| १८. **श्रीरामकृष्ण-वाक्सुधा**–(चवथी आवृत्ति)–(भगवान् श्रीरामकृष्णांच्या निवडक उपदेशांचें त्यांच्याच एका अंतरंग शिष्यानें केलेलें संकलन) | | ०-६२ |
| १९. **साधु नागमहाशय-चरित्र**–(दुसरी आवृत्ति) (भगवान् श्रीरामकृष्णांचे सुप्रसिद्ध शिष्य) | | २–० |

याशिवाय आमच्या आश्रमाने **हिंदी भाषेंतूनहि** समग्र रामकृष्ण. विवेकानंद साहित्य प्रकाशित केलें आहे. त्यासाठी विस्तृत सूचीपत्र मागवावें-

**श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर–१.**

REFBK-0010784